म. ग्रं. सं. ठाणें

विषय धर्म

संग्रहालय क्रमांक ४५

१८०/२

लेखक वासुदेव नरहर उपाध्ये

सन

पुस्तकाचें नांव प्रत्यंतदेशागमनमो

धर्म: प्रत्यन्तदेशगमन मीमांसा
सन १८९२

ओद्क्रमांक
१६०/२

रा० रा०

वि० वि० आपलेकडे प्रत्यंतदेशगमनमीमांसानामक पुस्तक अवलोकनार्थ पाठविलें आहे. तरी वाचून कृपापूर्वक अभिप्राय देण्याची मेहेरबानी होईल. चिकागो संबंधानें त्वरित अभिप्रायाची जरूर आहे. लोभ असावा हे विनंति.

आपला

**वासुदेव नरहर उपाध्ये**

हे. मा. म. शा. नं. १.

धर्म प्रत्यन्तदेशग
१८८२ मीमांस

VIRAJ VAIBHAV PRESS
विराज वैभव प्रेस
वाई
WAI, D. SATARA

सं.ध. १०

# प्रत्यंतदेशगमनमीमांसा

अथवा

यूरोप, अमेरिका वगैरे खंडांतील देशांत ब्राह्मणादिक समुद्रयानानें गेल्यास अधर्म होतो कीं काय ? याचा विचार.

हें पुस्तक

वासुदेव नरहर उपाध्ये,
हे. मा. म. शा. नं १ बडोदें

यांनीं

तयार केलें

तें

बडोदें येथें

" फत्तेसिंह " छापखान्यांत छापिलें.

---

सन १८९२

ह्या पुस्तकासंबंधानें सर्व हक्क पुस्तककर्त्यानें स्वाधीन ठेविले आहेत

किंमत आठ आणे.

# अनुक्रमणिका.


द्विजांनीं आर्यावर्त्ताबाहेर राहू नये याच्या खऱ्या अर्थाचें निरुपण.... १–३

पूर्वी अनेक क्षत्रिय राजे भरतखंडाबाहेरील सर्व पृथ्वीवरील देशांत गेले होते तें कथन.... ३

आर्यावर्त्त व म्लेंच्छ देश याचा खरा शास्त्रोक्त अर्थ काय? त्याचें निरुपण.... ५–६–७

द्विजस्याब्धौ या निषेधाभासाचें विवेचन.... ८–१५

वशिष्ठादिऋषि नावेंत बसून समुद्रांत फिरत होते तें कथन. १५

म्लेंच्छ यवन यांचा वैदिक धर्मीयांशीं खरा संबंध कसा होता त्याचें कथन.... १७–१८

भरतखंडाच्या बाहेरचे देश पुराणाप्रमाणें पाहतां निंद्य नाहींत त्याचें कथन.... १९–२०

सागर शब्दार्थ निरुपण.... २१

इंग्लिश फ्रेंच वगैरे शास्त्रतःपाहतां पूर्वीचे क्षत्रिय होते याविषयीं.... २३–२४

वैदिकधर्माचें रक्षणासाठीं म्लेंच्छ देशांत जाणें जरूर आहे, याचें निरुपण २४–२५–२६

आपत्कालीं अधर्म हाच धर्म होतो याविषयीं..२६-२७-२८

म्लेंच्छ देशांत प्राचीन लोकांपासून अनेक हिंदु लोक जात असत याविषयीं.... २८–२९

हल्लींच्या आपत्प्रसंगीं म्लेंच्छ देशांत कलाकौशल्य संपादनार्थ जाणें हा ब्राह्मणांचाच धर्म आहे, याचें निरुपण..२९–३०

म्लेंच्छ देशांत जाण्यास निषेध करणें हें स्वराज्यविघातक व पुरुषार्थ चतुष्ट्यनाशक आहे याविषयीं .... ३१–३२–३३

समुद्र अपवित्र नाहीं याविषयीं ३३–३४

प्रवसांत स्पर्शास्पर्श दोष नाहीं त्याचें कथन.... ३४–३५

समुद्रयानकृत प्रवासांत संध्यालोप होतो ह्मणतात त्याचा परिहार.... ३५–३६

कलाकौशल्यसंपादन धर्मांतरावांचून होणें अशक्य वगैरे ह्मणतात त्याचा परिहार.... ३७
३८—३९—४०
कामंदकादिनीतिशास्त्राधार पृथ्वीवरील सर्वराष्ट्रांची माहिती मिळालीच पाहिजे याविषयीं आधार. ४०—४१—४२
प्राचीन क्षत्रिय राजे सर्व पृथ्वी जिंकून येत असत याविषयीं ........४३—४४—४५—४६
म्लेंच्छलोकांविषयीं ४६—४७
वशिष्ठादिऋषि नावेंत बसून समुद्रांत फिरत असत याविषयीं व ऋग्वेदांत अनेक ठिकाणीं नौका शद्बाचा उल्लेख आहे त्याविषयीं .... ४७—४८—४९—५०
म्लेंच्छराजे राजसूययज्ञांत आले होते त्याविषयीं.... ५०
म्लेंच्छ व यवन यांचे उत्पत्तीविषयीं.... ५१—५२
भरतखंड बाह्यदेशांत भगवान् अनेक रूपानें राहतो, याविषयीं पुराणाचे आधार.... ५३—५४
म्लेंच्छ यवन हे क्षत्रिय व वैदिकधर्मी होत याविषयीं ....
५५—५६—५७—५८
सर्वथा शरीराचें रक्षण करावें याविषयीं..५९-६०-६१-६२
याचविषयीं विश्वामित्राची गोष्ट मूळ संस्कृत व भाषांतर तात्पर्य.... ६३—८५
राजपुरोहित विद्वान् व राजनीतिज्ञाता असावा याविषयीं
८६—८७—८८
दूरदेशांत दूत आणि चर पाठविण्याविषयीं मूळ संस्कृत व भाषांतर सारांश. ८८—९७

# प्रस्तावना.

सांप्रत कालीं भरतखंडांत सर्वत्र समुद्रयानासंबंधानें चळवळ सुरू आहे. अलाहाबादेंतील सामाजिक सुधारणेच्या मेळ्यामध्यें जे अनेक प्रश्न यावयाचे आहेत, त्यापैकीं समुद्रयानाचा प्रश्न पाहिला आहे.

बंगाल इलाख्यांत मोठमोठ्या पंडितांची सभा भरून समुद्रयान अ-निषिद्ध आहे, असा पंडितांनीं ठराव केल्याचें ऐकिवांत आहे. आज भरत-खंडांत सर्वत्र जी एक प्रकारची चळवळ दृष्टीस पडते, तो सर्व; इंग्रजी विद्येचा प्रभाव आहे, हें आपणास निःपक्षपातानें कबूल केलें पाहिजे. हल्लीं जे लोक मोठमोठ्या राष्ट्रीय गोष्टी सांगतात, सामाजिक सुधारणे-चें अग्रेसरत्व पत्करतात, इतकेंच नव्हे पण कित्येक "स्नेहं दयां च सौ-रव्यं च यदि वा जानकीमपि ॥ अर्थ—रामचंद्र ह्मणतात " लोकांच्या संतोषासाठीं स्नेह, दया सौख्य फार तर काय पण जानकीला जरी सोडलें, तरी मला त्यापासून दुःख होणार नाहीं " या प्रसिद्ध कविवचनाप्रमाणें केवळ लोककल्याणास्तव अत्यंत लोकनिंदा, धिक्कार, उपहास, द्वेष इत्यादि जे अनेक कष्ट सोशीत आहेत; त्यांनाच जर विचारलें कीं, हल्लीं लोककल्याणास्तव इतका त्रास सोसण्याविषयीं तुमच्या मनाची जी प्रवृत्ति झाली, ती तुह्मी इंग्रजी न शिकते व केवळ जुन्या रीतिरिवाजांत व संस्कारांतच असते तर तुमचें मन तशा प्रकारचें झालें असतें काय?

माझे मताप्रमाणें याचें उत्तर नसतें, असेंच त्यांला द्यावें लागेल; तेव्हां आतां हल्लींची चळवळ व सुधारणेविषयींचा अभिनिवेश, यांस नवीन शिक्षण जर कारणीभूत मानिलें तर तें ज्यांना मिळालें नाहीं, त्यांचीं मतें अगदीं विरुद्ध असणारच हें उघड आहे. अज्ञान हें स्वाभाविका आहे, ज्ञान हें यत्नसाध्य आहे. तेव्हां अर्थातच जुने लोक, शास्त्री, पंडित, पुराणिक, कथेकरी, साधुसंत यांचीं मतें नवीन शिक्षणाच्या अभावामुळें स्वाभाविकच सुधारणेस अत्यंत प्रतिबंधक असावयाचीं, हें उघडच आहे. आमच्यांतील मोठमोठे सुधारक, आपल्या मनांतील विचारामध्यें जी जमीन अस्मानाची तफावत झाली आहे; ती एका तऱ्हेच्या नवीन शिक्षणामुळें आहे. हें अगदीं विसरून जाऊन, आपल्या शिक्षणाचा मोठा भपका करून, गरीब बिचाऱ्या जुन्या संप्रदायाच्या लोकांवर यथेच्छ तोंडसुख घेतात, व नाहीं नाहीं त्या शद्बांनीं त्यांची निर्भर्त्सना करितात हें माझें मतें अत्यंत निंद्य होय; वास्तविक पाहतां सुधारकांनीं प्रार्थनासमाज, ब्रह्मसमाज, स्त्रियांचें हायस्कूल वगैरे अनेक संस्थानांत जशी अमूल्य उत्साहशक्ति खर्च केली, इतकेंच नव्हें, पण कित्येकांनीं पुरंदरचें बंड मोडून पाद्रीलोकांचें शिष्यत्व पत्करून शास्त्री, पंडित, भटें वगैरेंवर सारखे प्रहार करून कमींत कमी ४, ५ हजार वर्षांपेक्षां जास्त काळापासून चालत आलेल्या ब्राह्मणसंस्थेस मूर्छित व मुमुर्ष करून सोडिलें. त्या लोकांनीं पाद्रीलोक ब्राह्मणांनां भटांनां कां शिव्या देतात ? त्यांतला खरा अंतस्थ हेतु काय आहे, याचा विचार करून त्यांतलें खरें मर्म समजून घेऊन, त्या ब्राह्मणसंस्थेचें समुन्मूलन करण्याची इच्छा न करितां, त्या संस्थेची सुधारणा

करण्याचें मनांत आणलें असतें आणि त्या दिशेनेंच यत्न केले असते, तर त्याच ह्मणजे दरेक शहरांतील, खेडेगांवांतील वेदाच्या व शास्त्राच्या शाळांमध्यें शास्त्राभ्यास पूर्ववत् चालवून, त्याच बरोबर हळूं हळूं थोडथोडें अर्वाचीन शिक्षण दिलें असतें, तर १२ वर्षांच्या शास्त्राच्या व वेदाच्या अभ्यासाबरोबर जुन्या लोकांना सहज नवीन शिक्षण मिळालें असतें, इतकेंच नव्हे; परंतु आमचे गरीब बिचारे शास्त्री, पंडित, वैदिक वगैरे भिक्षुक लोक, धनैषणेपासून अलिप्त असल्या कारणानें शास्त्राभ्यासाबरोबर थोड थोडा इंग्रजी अभ्यास सुरू असता तर तो सुद्धां तितक्या मुदतींत पूर्ण होता. ( नुसता भाषेचा ) अशा तऱ्हेनें प्राचीनसंस्थेंत नवीन शिक्षणाचें मिश्रण केलें असतें, तर त्या गंगायमुनेच्या संगमजन्यप्रवाहाच्या पाण्यानें पुष्ट झालेल्या किती तरी सुधारणावृक्षांच्या फलांचा भारतीयांस लाभ झाला असतां ! तात्पर्य आमच्या सुधारकांच्या हातून ही अत्यंत महत्वाची गोष्ट न झाल्यामुळें आमच्या समाजाची फार भयंकर स्थिती झाली आहे. धर्मावर दृढ श्रद्धा असल्या कारणानें शास्त्री, पंडित कोठें ना कोठें, कोणी तरी शास्त्री गांठून, कसा तरी निर्वाह करून, कांहीं तरी विषयाचें अध्ययन करितात. असे विपन्न स्थितींत तयार झालेले मोडके तोडके वैयाकरण, नैयायिक किंवा पुराणिक किंवा वैदिक, आमचे समाजाचे धर्मशास्त्री बनतात. अज्ञान गृहस्थ, अफाट समाज, नवीन शिक्षणाच्या अभावामुळें नैतिक धैर्याचा अभाव स्वतः वेदशास्त्र, स्मृति, पुराणें वगैरेंचें अवलोकनही वर सांगितलेल्या स्थितीप्रमाणें, तेव्हां; एकंदर याचा परिणाम काय व्हावयाचा तो डोळ्यासमोर स्पष्टच दिसत आहे. लोकांत जे काय आचारविचार त्यांच्या ज्या धर्म समजती तोच आज श्रुतिस्मृतिपुराणोक्त धर्म बनला आहे ! शास्त्री

असें मला वाटत नाहीं. परदेशांत लोक जात नाहींत. याचें कारण अंशतः धर्मशास्त्राची अडचण हें जरी खरें आहे. तरी इंग्लंदादि देशांत जाण्या येण्यास अतोनात खर्च पडतो, हें परदेशगमनास जबरदस्त प्रतिबंधक आहे. ऐकीव गोष्टीप्रमाणें जसे श्रीमंत जयाजीराव शिंद्यानीं २० लक्ष रुपये ब्राह्मण भोजनांत खर्च केले. श्रीमंत खंडेरावांनीं याजसारख्या कृत्यांत ३० । ४० लक्ष रुपये खर्च केले. त्याचप्रमाणें कोणी महात्म्या राजानें किंवा अनेक राजांनीं मिळून अशाच तऱ्हेचे धर्म कृत्य समजून शिकागो सारख्या प्रदर्शन समयीं कांहीं आगबोटी भाड्यानें घेऊन हिंदुस्थानांतून निघाल्यापासून परत येई पर्यंत २०० । २५० रुपयांत आटपेल अशी व्यवस्था केली, तर लक्षावधि लोक तिकडे जातील व मग अर्थातच पुनः या प्रश्नाचा विचार करण्याची जरूर पडणार नाहीं.

लंडन अगर न्युयार्क शहरामध्यें ३ । ४ महिने राहिल्यापासून मनांवर जो एक विशिष्ट संस्कार घडतो व जें शिक्षण मिळतें तें कालेजामध्यें सेक्सपीयरचीं कितीही नाटकें तोंडपाठ केलीं, किंवा पोलिटिकल एकॉनमीची कितीही पारायणें केलीं तथापि मिळणार नाहीं ही गोष्ट आतां स्पष्ट झाल्या सारखी आहे. तेव्हां आमचे राजे, सरदार सावकार व श्रीमान् लोकांनीं प्रथमतःच यूरोप अमेरिकेंत २००–४०० रुपये दरमहा, जाण्या येण्याचा खर्च वगैरे करून, कलाकौशल्य शिकण्यास लोक पाठविण्याचा विचार करण्यापेक्षां, प्रथमतः त्या देशामध्यें धंदा करण्यास किंवा दुकानें वगैरे द्वारां व्यापार करण्यास जे लोक जातील, त्यांना जाण्या येण्याचा व तेथें धंदा रोजगार

लोकांचा अभ्यास नाइलाजास्तव वर प्रकारचा, त्यांतूनही त्यांना कित्येक गोष्टी जरी सशास्त्र वाटल्या, तरी आपण लोकांच्यासमजा-विरुद्ध खरा शास्त्रार्थ सांगितला तर, लोक आपणालाच महा-मूर्खांत व नास्तिकांत काढणार, ही भीति असल्या कारणानें, त्यांना नाईलाजास्तव खऱ्या गोष्टीही सांगतां येत नाहींत. या शिवाय पुनः हल्लींच्या एकंदर सरकारी शाळांतील शिक्षण पद्धतीमध्यें धर्म-संबंधी अंकुराचें पोषण होण्यास साधन नसल्यामुळें व अजूनपर्यंत आमच्यांतील सनातन वैदिक धर्माभिमानी ह्मणविणाऱ्या गृहस्थांकडून मिशनरी लोकांच्या शाळांप्रमाणें वैदिक धर्मशिक्षणाची सोय न झाल्यामुळें शाळांतून व कालेजातून जी मुलें बाहेर पडतात, त्यांची वैदिक धर्मावर बिलकुल श्रद्धा नसून,ते धर्म बाह्य आहेत, अशी त्या लोकांविषयीं सामन्यजन समूहाची समजूत असल्या कारणानें अशा मनुष्यांनीं वैदिक धर्मसंबधानें कित्येक वेळां जरी ऊहापोह केलें व खऱ्या धर्म शास्त्राचे लोकांना ज्ञान करून देण्यास यत्न केला, तरी जुन्यापैकीं हजारांतून १० सुद्धां लोक त्यांचे अनुया-यी होत नाहींत. तात्पर्य या पुस्तकामध्यें वाटेल तितकी मेहनत करून जरी खरें धर्मशास्त्र दाखविलें असलें, तरी त्यापासून शास्त्री लोकांचे मनाचें समाधान झालें, तरी स्पष्टपणें निःपक्षपातानें ते कितपत कबूल करतील याची मला शंकाच आहे. ज्यांना आपले धर्मशास्त्राचें या बाबतींत खरें मत तरी काय आहे? अशी जिज्ञासा असेल त्यांना मात्र या पुस्तकापासून बराच फायदा होईल. या व अशा सारख्या अनेक सामाजिक गोष्टीमध्यें लोकांचें मत एकदम केवळ शास्त्रार्थानें बदलेल

## या ग्रंथास ज्या अनेक ग्रंथांचें सहाय घेतलें त्या ग्रंथांचीं नांवें.

ऋग्वेद ( सभाष्य. )

षड्विंशब्राह्मण.

नं. ९८-१९०

यजुर्वेद.

ऐतरेयब्राह्मण.

वेदांतसूत्र शांकरभाष्य.

भागवत.

महाभारत.

श्रीवाल्मीकि रामायण.

मत्स्यपुराण.

विष्णुपुराण.

मनुस्मृति ( सात्ही टीका सहित. )

अष्टादशस्मृतिसंग्रह.

कामदंकनीति वगैरे.

लागेपर्यंत महिना १९ दिवसांच्या खर्चापुरती मदत केली तर पुष्कळ लोक तिकडे जाऊं लागतील, व एकदां जाऊ लागले ह्मणजे त्यांतून कित्येक तेथील माहिती मिळवितील, कांहीं कलाकौशल्य शिकतील. व त्यांना साहजिकच तेथील अनेक संस्था वगैरेची माहिती होऊन येथील कालेजांतून कधींही न प्राप्त होणारे शिक्षण मिळेल. व त्यापासून भारतीय लोकांस पुष्कळ फायदे होतील, इतकेंच सुचवून ही लांबलेली प्रस्तावना पुरी करितों.

वासुदेव नरहर उपाध्ये.

हे. मा. म. शा. नं. १

# प्रत्यन्तदेशगमनमीमांसा.

अलीकडे युरोपांत यंत्रविद्या व कलाकौशल्यादिकांस अत्यंत उपयुक्त अशीं जीं रसायन–सृष्टि–विद्युत् इत्यादि शास्त्रें, यांचा प्रसार झाल्यापासून ज्या देशांतील लोकांस या कलांचें व शास्त्रांचें ज्ञान नाहीं, त्या देशांतील कारागिरांचे धंदे बंद पडून त्यांना निर्वाहापुरतें मिळण्याची सुद्धां मारामार पडूं लागली आहे. आमचें भरतखंड प्राचीन कालापासून कलाकौशल्याचें माहेरघर होतें खरें, व बऱ्याच काळापूर्वी भरतखंडांतील अत्यंत विख्यात अशीं जीं डाका इ० शहरें, तेथून युरोपखंडांत कोट्यावधि रुपयांचा माल दरवर्षीं जात असे; परंतु युरोपखंडांत वर सांगितलेलीं शास्त्रें जेव्हां उदयास आलीं; व त्यांचा उपयोग तेथील पंडित लोक व्यवहारांत करूं लागले, तेव्हांपासून पृथ्वींतील इतर तत्सदृश देशांप्रमाणें आमचे भरतखंडांतील कारागिरांचेही परंपरागत धंदे बसून त्यांचे निर्वाहापुरतें देखील त्यांना मिळेनासें झालें आहे. तेव्हां अर्थात् अशी देशस्थिति झाली असतां, परदेशांत जाऊन कलाकौशल्य व व्यवहारोपयोगी शास्त्रें शिकणें हें हल्लींच्या काळचें भारतीयजनांचें मुख्य कर्तव्यकर्म होय; हें उघडच आहे, आणि अशासाठीं कित्येक बुद्धिमान् व हुषार लोक युरोपखंडांत गेले, जात आहेत व जातीलही; परंतु यासंबंधानें यूरोप अमेरिका वगैरे खंडांत जाणारे कित्येक लोकांस अनेक अडचणी येतात, त्याचपैकीं युरोपीयदेश ह्मणजे कित्येक शास्त्री लोकांचे मताप्रमाणें म्लेंच्छ-

देश, तेव्हां अर्थातच त्या देशांत समुद्रांतून गेलें असतां, तो ज्ञातिबाह्य होय; सबब, त्यास जातींत घेऊं नये, वगैरे प्रकारचे कांहीं आक्षेप काढण्यांत येतात; तर अशा प्रसंगीं परदेशगमनासंबंधानें आमच्या धर्मशास्त्रकारांचें काय मत आहे हें लोकांस कळविणें योग्य वाटल्यावरून त्याविषयीं आह्मी थोडासा विचार करण्यास आरंभ करितों.

पाश्चिमात्य राष्ट्रांमध्यें ब्राह्मणादिकांस जाण्यास धर्मसंबंधीं काय हरकत आहे? अशा तऱ्हेचा प्रश्न कित्येक शास्त्रिजनांस विचारला असतां, ते आधार दाखवितात तो हा:—"आसमुद्रात्तु वै पूर्वमासमुद्रात्तु पश्चिमात्, तयोरेवान्तरं गिर्योरार्यावर्तं विदुर्बुधाः । कृष्णसारस्तु चरति मृगो यत्र स्वभावतः, स ज्ञेयो यज्ञियो देशो म्लेंच्छदेशस्त्वतः परः। एतान् द्विजातयो देशान् संश्रयेरन् प्रयत्नतः, शूद्रस्तु यस्मिन् कस्मिंश्चिन्निवसेद्वृत्तिकार्षितः" अर्थ—पूर्वसमुद्रापासून पश्चिमसमुद्रापर्यंत, आणि उत्तरेस हिमालय व दक्षिणेस विंध्याचल यामधील जो देश, त्याचें नांव आर्यावर्त; तसेंच, कृष्णसार ( काळें हरिण ) मृग जेथें स्वभावतः फिरतो तो यज्ञिय देश; त्यावांचून बाकीचा म्लेंच्छदेश; द्विजांनीं याच देशाचा प्रयत्नकरून आश्रय करावा. शूद्रांनीं आपणांस निर्वाहाची पंचाईत पडली तर पाहिजे तेथें जाऊन रहावें. या श्लोकांचा आधार दाखवून कित्येक शास्त्री लोक ह्मणतात कीं, द्विजांनीं ह्मणजे ब्राह्मणक्षत्रियवैश्यांनीं परदेशांत जाऊं नये. या श्लोकाचा वास्तविक जो अर्थ पाहील त्याला हें कित्येक शास्त्री लोकांचें ह्मणणें खरें वाटेल; परंतु जो अंमळ जास्त विचार करील त्याची, या ठिकाणीं द्विजाति शब्दाच्या अर्थाचा संकोच करून सर्व संसा-

राचा त्याग करून केवळ मोक्षपरायण बनलेल्या वर्णत्रयांलाच हें वचन लागूं आहे, अशी तेव्हांच खात्री होईल. आतां या श्लोकांतील द्विजाति शद्बाच्या अर्थाचा संकोच कां करावा? यास आमचें मतें जें गमक आहे तें याप्रमाणें:—जर द्विजाति शद्बाचा अर्थ सामान्य वर्णत्रय घेतला, तर रघुवंशामध्यें दशरथ राजास " अष्टादशद्वीपनिखातयूपः " ह्मणजे १८ द्वीपांत ज्यानें यज्ञ करून खांब रोविले, असें जें विशेषण दिलें आहे, तें धर्मशास्त्रविरुद्ध दिसतें; कारण दशरथ हा क्षत्रिय ह्मणजे द्विजांतर्गत, तेव्हां तो आर्यावर्त सोडून १८ द्वीपांत गेला कसा? याप्रमाणें केवळ दशरथाचीच गोष्ट नाहीं; × भरतखंडांतील क्षत्रिय राजे सर्वयच्चयावत् पृथ्वींतील राजांस पादाक्रांत करून त्यांचेकडून खंडणी घेऊन राजसूयादि यज्ञ करणें आपलें कर्तव्यकर्म समजत. जो राजा असें न करील त्याची योग्यता कमी, त्यानें क्षात्रधर्म बजाविला नाहीं; असा आमच्या क्षत्रिय राजांचा समज होता. व त्याप्रमाणें × रन्तिदेव, नाभाग, यौवनाश्व, वैन्य, मांधाता, भगिरथ, ययाति, नहुष, पृथु इत्याद्यनेक अत्यंत धर्मपरायण राजांनीं सर्व पृथ्वीवरचे, समुद्रांतील बेटांतील चीन, बर्बरक, शक, तुखार वगैरे शेंकडों राजांस पादाक्रांत करून त्यांच्याशीं लढाया करून त्यांच्याकडून खंडणी घेऊन, राजसूय यज्ञ केले. अशा तऱ्हेनें सर्व पृथ्वींतील देशांमध्यें जाऊन तेथील राजांचा पराभव करणें हें ज्याअर्थीं आमचे प्राचीन राजे परम पुण्य समजत, त्याअर्थीं वरील श्लोकीं द्विजाति शद्बाचा अर्थ संसारत्याग करून केवळ निवृत्तिपर वर्णत्रय असाच केला पाहिजे; तरच वरील सांगितलेल्या प्रवृत्तिपर महापुण्यवान् राजांचीं कृत्यें धर्म्य होतील. आतां ही एक क्षत्रियांची

---

× पहा परिशिष्ट नं. १ × पहा परिशिष्ट नं. २

गोष्ट झाली. वैश्यांसंबंधानें पाहिलें तरी महाभारतांत व रामायणांत पुष्कळ ठिकाणीं 'सामुद्रिकाः वणिजः, ह्मणजे समुद्रांतून प्रवास करणारे वैश्य लोक असें ह्मटलें आहे. क्षत्रियाप्रमाणें वैश्यांचाही सर्व पृथ्वींतील राष्ट्रांशीं व्यापार करून धन संपादन करावयाचें हा धर्म, व त्यासच अनुसरून ते समुद्रांतून व्यापारार्थ परदेशीं जात येत असत. तेथेंही द्विजाति शब्दाचा सामान्य अर्थ घेतल्यास धर्मविरुद्ध होईल. आतां आमचे मताप्रमाणें त्या शब्दाच्या अर्थाचा संकोच करून केवळ निवृत्तिपर असा अर्थ घेतला तर मात्र तें धर्मविरुद्ध होत नाहीं. फार लांब कशाला, द्विजांनीं आर्यावर्तींच रहावें असें ह्मटलें तर हल्लीं महाराष्ट्र, म्हैसूर, कर्नाटक, द्रविड, तैलंगण वगैरे देशांत जे ब्राह्मण वस्ती करितात, ते सर्व धर्मविरुद्धच काय? आमचे मताप्रमाणें हें धर्मविरुद्ध नाहीं. कारण, निवृत्तिपर वर्णत्रयांनीं मात्र तेथेंच राहिलें पाहिजे, इतरांनीं कोठेंही राहाणें केलें तरी हरकत नाहीं, तेव्हां, आमचे मताप्रमाणें तैलंगणादिक देशांमधील ब्राह्मणांचा निवास धर्मविरुद्ध नाहीं हें उघडच आहे. याप्रमाणें आह्मी एक तऱ्हेनें समाधान केलें. वास्तविक पहातां, आजची आमची स्थिति आहे, त्या स्थितीप्रमाणें आज आमची, 'एतान् द्विजातयो देशान् संश्रयेरन् प्रयत्नतः' या श्लोकाचे विषयभूत होण्याची मुळींच योग्यता नाहीं; कारण, मनुस्मृतीवरील सर्व टीकाकारांत अत्यंत श्रेष्ठ, ऋषिकल्प, व सर्वमान्य जो मेधातिथि, त्यानें आर्यावर्त ह्मणजे काय व म्लेंच्छदेश ह्मणजे काय याचा विचार करतेवेळीं असें ह्मटलें आहे कीं, 'अर्थद्वारेणायं शब्दः प्रवृत्तोम्लेंच्छानां देश इति, तत्र यदि कथंचित् ब्रह्मावर्तादि-

देशमपि म्लेंच्छा आक्रमेयुः तत्रैव अवस्थानं कुर्युः भवेदेव असौ म्लेंच्छदेशः तथा यदि कश्चित् क्षत्रियादिजातीयो राजा साध्वाचरणो म्लेंछान् पराजयेत चातुर्वर्ण्यं वासयेत् म्लेंच्छांश्च आर्यावर्त इव चाण्डालान् व्यवस्थापयेत् तदा सोपि स्यात् यज्ञियो देशः यतो न भूमिः स्वतो दुष्टा संसर्गात् हि सा दुष्यति अमेध्योपहतेव प्रागुक्तदेशव्यीतरेकेणापि सति सामग्र्ये त्रैवर्णिकेन अकृष्णमृगचरणेऽपि देशे यष्टव्यमेव तस्मादनुवादोऽयम् स ज्ञेयो यज्ञियो देशः म्लेंच्छदेशः स्वतःपर इति.' तसेंच, मेधातिथीनें आर्यावर्त याचा अर्थ करतेवेळीं म्हटलें आहे कीं, " आर्याः वर्तन्ते भ्रमन्ति यत्र स आर्यावर्तः अत्राहि म्लेंछाः आक्रम्य आक्रम्यापि न चिरस्थातारो भवन्ति " मेधातिथीनें आर्य येथें रहातात म्हणून यास आर्यावर्त म्हणतात असा आर्यावर्त शद्बाचा अर्थ केला आहे. मेधातिथीच्या वेळेस भरतखंडांत क्षत्रिय राजे बलाढ्य असून मुसलमानांच्या स्वाऱ्यांस सिंधप्रांताकडे थोडासा आरंभ झाला होता; परंतु क्षत्रियांपुढें त्यांचें कांहीं चालत नव्हतें असें दिसतें. तेव्हां अर्थातच आर्यावर्तामध्यें क्षत्रियादिक राजे अत्यंत क्षात्रधर्मपरायण असल्याकारणानें व त्यावेळेस आर्यावर्तांतील लोकांमध्यें राजांचेठायीं आर्यावर्ताबद्दल अभिमान अत्यंत जागृत असल्याकारणानें मुसलमानांचें कांहीं एक चालणार नाहीं, उलटें, आमचेच क्षत्रिय राजे त्यांच्या देशावर स्वाऱ्या करून त्यांचें राज्य काबीज करतील, असा त्यांचा दृढ समज असल्या कारणानें, आपल्या समजानुरूप 'आर्या वर्तन्ते भ्रमन्ति यत्र स आर्यावर्तः' म्हणजे आर्य लोक जेथें राहतात किंवा फिरतात तो आर्यावर्त अशी व्याख्या करून, ज्या प्रदेशाचे आर्य लोक स्वामी तो आर्यावर्त असा अर्थ मनांत आणून " अहो खरें, पण

मुसलमान लोक एकसारखे आर्यावर्तावर स्वाऱ्या करीत आहेत, तेही आर्यावर्तांत येतात राहतात, तेव्हां हा आर्यावर्त कसा?" अशी शंका घेऊन "जरी म्लेंच्छ पुनः पुनः स्वाऱ्या करीत आहेत, तरी ते आर्यावर्तांत चिरस्थायीं राहणारे नव्हेत व रहाणार नाहींत, असें समाधान केलें आहे. तसेंच दुसरे श्लोकाचे टीकेंत "तत्र यदि म्लेच्छाः ब्राम्हावर्तादि" वगैरे जे ह्मटलें आहे त्याचा भावार्थ असा :- कीं, म्लेंच्छ देश ह्मणजे म्लेंच्छ लोक ज्या देशाचे स्वामी तो म्लेंच्छ देश आणि आर्यावर्त ह्मणजे तरी काय कीं, ज्या देशाचे स्वामी आर्य लोक तो देश. या अर्थाचें त्यानें सोदाहरण स्पष्टीकरण केलें आहे, तें असें:— जर म्लेंच्छादिकांनीं ब्रह्मावर्तादि देशांवर स्वाऱ्या करून तो जिंकून तेथें आपला चिरकाल वास केला, तर ब्रह्मावर्तादि जो आर्यावर्त, त्याचें आर्यावर्तत्व नष्ट होऊन तो सुद्धां म्लेंच्छ देश होईल. बरें, त्याचे उलट जर कोणी धर्माभिमानी क्षत्रिय राजानें म्लेंच्छ देशावर स्वारी करून त्यांचा पराभव करून तेथील म्लेंच्छांना आर्यावर्तातील चाण्डालप्रमाणें ठेऊन तेथें चातुर्वर्णाची व्यवस्थापना केली तर तो म्लेंच्छ देशसुद्धां आर्यावर्तच होईल. तात्पर्य, म्लेंच्छस्वामिक तो म्लेंच्छदेश व आर्यस्वामिक जो देश तो आर्यावर्त; असें मेधातिथीचें ह्मणणें दिसतें; परंतु तो आर्यावर्ताचा अभिमान पुढें नष्ट झाला, तेव्हां अर्थातच रजपुतांचे तत्व्यामध्यें महंमद गोरी शिरून थोड्याच दिवसांनीं जी मेधातिथीच्या स्वप्नींही नव्हती, ती अत्यंत दुःखद गोष्ट घडून आली ती कोणती ह्मणाल तर मुसलमानांनीं आर्यावर्तावर स्वाऱ्या करून तेथें आपला कायम अंमल बसावला, आणि 'मुसलमान आले ह्मणून काय झालें, आमच्या

आर्यावर्तावर ते चिरस्थायीं कसचे होतात असें जें मेधातिथी मोठ्या अभिमानानें ह्मणे, त्याचे उलट मुसलमानांनीं भरतखंडांत मोठमोठे वाडे, किल्ले वगैरे बांधून भरतखंड आपली चिरनिवासभूमि करून टाकली. आतां मधील कांहीं वर्षे मराठ्यांनीं कांहीं दिवस आर्यावर्ताचें नेलेलें आर्यावर्तत्व पुनः आणलें होतें, परंतु ते रक्षण करण्यास जितका धर्माभिमान व ऐक्य पाहिजे होतें, तितकें त्यांच्यांत नसल्या कारणानें पुनः आर्यवर्ताचें आर्यावर्तत्व मुसलमानापेक्षां बलाढ्य व विद्याचारसंपन्न अशा इंग्रज लोकांचे ताब्यांत जाऊन, पुनरपि भरतखंड मेधातिथीचे ह्मणण्याप्रमाणें म्लेंच्छ झाला ! आतां इंग्रज लोक हे उदार आणि विद्याचारसंपन्न असल्या कारणानें त्यांच्यापासन मुसलमानांप्रमाणें त्रास होत नाहीं; व त्यांवर प्रजा फार खुष आहे, ही गोष्ट निराळी पण एतावता भरतखंडाचें पुण्यभूमित्व जाऊन त्यास म्लेंच्छदेशत्व आलें हें निर्विवाद आहे. तेव्हां आतां न म्लेंच्छदेशे गच्छेत हा निषेध भरतखंडबाह्य देशीं जाणारासच लागू होऊन ते प्रायश्चित्तार्ह कसे होतात हें आम्हास समजत नाहीं. त्याचप्रमाणें हैद्राबाद अलाहाबाद, दिल्ली, मुंबई, कलकत्ता वगैरे शहरांमध्यें कीं जेथें मुसलमान व यूरेशियन वगैरे लोक वरेंदारें करून पिढ्यान्‌पिढ्या राहिले आहेत तो देश मेधातिथीचे ह्मणण्याप्रमाणें म्लेंच्छदेश झाला, तेव्हां त्याठिकाणीं जाणें व यूरोप अमेरिकेंत जाणें यामध्यें शास्त्रीयरीत्या मुळींच भेद नाहीं हें उघड आहे.

**विलायत, अमेरिका** इत्यादि ठिकाणा न जाण्याबद्दल कित्येक शास्त्रिजन जो एक दुसरा आधार सांगत असतात, त्याचा आतां विचार करूं.

" द्विजस्याब्धौ तु नौयातुः शोधितस्याप्यसंग्रहः "

हा श्लोक **आदित्यपुराणां**तील आहे. समुद्रामध्यें नावेंतून बसून जाणारे द्विजाचें प्रायश्चित्तादिकानें जरी शोधन झालें तरी तो असंग्राह्य होय, असा कित्येक शास्त्री लोक याचा अर्थ करून हल्लीं जर कोणी राष्ट्रीय कामासाठीं किंवा कांहीं आपत्तीचे निवारणार्थ पाश्चात्य राष्ट्रांत गेला तर त्यास बहिष्कार टाकण्यास प्रवृत्त होतात; परंतु आमचे मतें हा श्लोक पाश्चात्य राष्ट्रांत जाऊन येणारास मुळींच बाधक होऊं शकत नाहीं. या श्लोकाची अनेक तऱ्हेनें बाधकता विचारांतीं नाहींशी करितां येते.

एक तर समुद्रांतून नावेंतून जाऊन आला कीं, तो द्विज असंग्राह्य असाच निवळ अर्थ केला तर कोकणांतील हजारों ब्राह्मणांस अपंक्त ठरवावें लागेल; तसेंच, हजारो यात्रेकरू जे आगबोटींत बसून द्वारका वगैरेस जातात ते या श्लोकांप्रमाणें अपंक्त होतील. एक ग्रंथकार तर ज्याला समुद्र अतिशय लांब होता तो—या श्लोकाचा निवळ असाच अर्थ करतो; परंतु **संस्कार कौस्तुभ** कर्ता जो कोंकणाचे आसपास रहात असे, त्याला निवळ असा अर्थ करणें योग्य न वाटून त्यानें समुद्रांत नावेंतून प्रत्यन्त [ म्लेंच्छ ] देशास जाणारा द्विज असंग्राह्य असा अर्थ त्यानें केला आहे. तात्पर्य, नावेंत बसून म्लेंच्छ देशास जाणारा द्विज असंग्राह्य हें आह्मीही कबूल करूं; परंतु तो असंग्राह्य कोणत्या कर्माचे ठायीं व केव्हां, याविषयीं मात्र सप्रमाण आमचा मतभेद आहे; तो कसा तें सांगतों.

राष्ट्र तो अश्वमेध होय व या वाक्यप्रमाणें अश्वमेध यज्ञाचें रक्षण करणें हें राष्ट्ररक्षणाप्रमाणें होय, इत्यादि श्रुतिवचनानें राष्ट्रीय कामासाठीं जर समुद्रयान केलें, तर ज्याप्रमाणें सामान्य पशुहिंसे-मध्यें जरी अत्यंत पाप आहे, तरी अश्वमेधादि यज्ञोद्देशे करून जर हिंसा असेल तर तींत पातक नसून पुण्यच आहे, तद्वत्, सामान्य दृष्ट्या जे अधर्म ते जर राष्ट्रीय कामासाठीं असतील, तर पापावह न होतां, पुण्यावहच होतात हें स्पष्ट आहे. येथें राष्ट्रीय कामा साठीं नसलेले समुद्रयान पापावह असे आम्ही म्हटले आहे तें केवळ अलीकडच्या कलिवर्ज्य प्रकरणातील पुराणवचनानुरोधानें. वास्तविक पुराणवचनापेक्षां व स्मृतिवचनापेक्षां ही बलत्तर जो वेद तो ही सामान्य नव्हे, पण सर्व वेदामध्यें श्रेष्ठ जो ऋग्वेद त्यातील मंडळ ७ वर्ग २९ सूक्त ८८ च्या तिसऱ्या व चौथ्या ऋचेंत वरुण व वसिष्ट नावेंत बसून समुद्रांत फिरत होते व नाव लाटांच्या जोरानें खालीवर होत होती, या विषयीं जो उल्लेख आहे त्यारून वेद वचनानें ब्राम्हणास नावेत बसून समुद्रांत प्रवास करण्यास बिलकूल निर्बंध नाहीं हें निर्विवाद सिध्द होतें.

**५ वी उपपत्ति**—हल्लींचा देश, काल पहातां ब्राह्मणांनाच विशेषें करून उपजीविकेची मोठी अडचण पडली आहे. कित्येक ह्मणतील कीं, ब्राह्मणांनीं दुकानें घालावींत, कृषिकर्म करावें, परंतु अशा रीतीनें उपजीवन करण्यामध्यें अन्यांच्या उपजीविकेचा नाश केल्याचें पाप माथीं येतें. तस्मात् अशा तऱ्हेची उपजीविका करण्या-पेक्षां कलाकौशल्यासंबंधानें जे परकीय लोक आपले हरण करीत आहेत, त्याचें रक्षण करण्यासाठीं जरी कितीही अधर्म झाला तरी

हरकत नाहीं. हरएक तऱ्हेनें व अनेक यत्नानें स्वरक्षण करणें हाच परम धर्म होय हें उघडच आहे. वेद वचन स्पष्ट सांगतें कीं " सर्वत: आत्मानं गोपायेत " ह्मणजे हरतऱ्हेनें आपलें रक्षण करावें. श्रुति इतकेंच सांगून रहात नाहीं. श्रुति सांगते कीं, " असूर्या नाम ते लोका: अंधेन तमसा वृता:; तांस्ते प्रेत्याभिगच्छंति ये के चात्मह जना: " ह्मणजे जे लोक आपला आपण नाश करून घेतात ते, जेथें प्रकाश नाहीं व जेथें सर्व अंध:कार भरला आहे, अशा लोकांत मरणानंतर जातात. तेव्हां हरएक तऱ्हेनें व होईल तितकें संभवत् धर्म पाळून आपण आपलें व राष्ट्राचें रक्षण करणें हाच वेद प्रतिपाद्य धर्म होय हें उघड आहे.

अलीकडचे शास्त्री मंडळ वगैरे ÷ म्लेंच्छयवन इत्यादिकांस अत्यंत निंद्य व स्पर्शानर्ह समजते, व त्यांनीं " न नीचो यवनात्पर: " व " न वदेत् यावनीं भाषां प्राणैः कण्ठगतैरपि " अशा प्रकारचे कांहीं श्लोकहीं आधारासाठीं काढलेलें असतात. माझ्या लहानपणापासून ज्या ज्या वेळीं शास्त्री लोकांचे तोंडांतून हे श्लोक मी ऐकत असे, तेव्हां असें शास्त्र आहे असें माझें ऐकिवांत होतें; परंतु नंतर यासाठीं मी मुद्दाम अष्टादश स्मृति, मनु, याज्ञवल्क्य वगैरे ४।५ वेळां वाचल्या, पण त्यांत ते कोठें सांपडले नाहींत. तेव्हां अर्थातच ज्या वेळीं मुसलमान बादशहा धर्मांध होऊन गोवध करूं लागले व ब्राह्मणांना छळूं लागले तेव्हां ' न नीचो यवनात्पर: ' असा आमच्या देशांतील लोकांचा समज होण्यास कारणें झालीं असावींत. त्याच प्रमाणें देशी भाषेंत एकावर एक उर्दू व फार्शी शद्ब जेव्हां येऊं लागले तेव्हां हल्लीं

÷ परिशिष्ट नंबर ३ पहा.

रहाणें अशक्य झालें आहे. नेहमीं यवन, म्लेंच्छ संपर्क होतच आहे **पंजाब, काश्मीर, दिल्ली, हैद्राबाद, मुंबई** वगैरें शहरामध्यें तर आचाराची वार्ता सुध्दां पुसता कामा नयें; तेंव्हां सामान्य ब्राह्मणाविषयीं तर स्वाचार शब्दाचा अर्थ संभवत्स्वाचार ह्मणजे ठेववेल तितका ( जो आचार ठेविला असतां कांहीं दिवसांनीं सुद्धां त्यांच्यांत मिळून जाऊन तत्साम्य न येईल ) असाच केला पाहिजे. अर्थातच **फ्रान्स, जर्मनी** इत्यादि देशांत स्वाचार रहाणें अशक्य. हें ह्मणणें कितपत रास्त आहे याचा वाचकांनींच विचार करावा.

**चौथी उपपत्ति**—वर जें लिहिलें तें स्मृतिपुराणमतें लिहिलें आहे; परंतु स्मृतिपुराणवाक्यापेक्षां बलवत्तर जो वेद त्यामध्यें पहातां अमका भूमीचा भाग पवित्र व अमका अपवित्र असें नसून सर्व यावत् पृथ्वीस यज्ञ भूमि जी वेदी तीप्रमाणें पवित्र मानिलें आहे; " एष उर्वैव स भूम्यन्तः यद्वेद्यन्तः " असें ऐतरेयब्राह्मण-भाष्य, आद्यकांड, ९ वा प्रपाठक, १० वा अनुवाक, पान २४८ या मध्यें सांगितलें आहे. यावरचें भाष्य " यो ऽयं वेदेः अवसान देशः सो ऽयं भूमेरवसान भागः=एतावती वै पृथिवी यावती वेदिः इति भूमित्वं वेदे राम्नातम् " ह्मणजे यज्ञांतील वेदीचा जो शेवट तो पृथ्वीचा शेवट. कारण वेदामध्यें असें सांगितलें आहे कीं, जेवढी वेदी तेवढी पृथ्वी होय. या वचनावरून वेदीचें व पृथ्वीचें तुल्यत्व आहे हें उघडच आहे. षड्विंश ब्राह्मणामध्यें देव यजनप्रदेश कोणता हें सांगतांना ह्मटलें आहे कीं, ' यस्मिन्ननेव कस्मिंश्चिदेशे श्रद्दधानो यजते ऋध्नोत्येवेति ( सामावेद षड्विंशब्राह्मण द्वितीय प्रपाठक पान १९ भाष्य ) यस्मिन् कस्मिंश्चिदेशे श्रध्दधानः अत्र अत्र फलंभवत्येव इति आस्तिकः सन् यजते सऋध्नोति यथोक्त-फलं प्राप्नोत्येव ( साम भाष्यपान ५१ ) " ह्मणजे श्रध्दापूर्वक

आस्तिक्यभावानें मला यापासून फल मिळेल अशी भावना धरून कोठेंही याग केला असतां, त्याला यथोक्त फल मिळतेंच मिळतें. याप्रमाणें स्मृतिपुराणवाक्यापेक्षां वेदवचन धर्म शास्त्रांत विशेष प्रमाण असल्या कारणानें वेद वाक्यावरून सर्व यच्चावत् पृथ्वी ही पवित्र आहे; हें याच प्रमाणावरून नव्हे, पण या अर्थाचीं वेदांतील शेकडों वाक्यें देतां येतील, परतु या लहानशा निबधांत इतका विस्तार करणें अनुचित ह्मणून करीत नाहीं. ज्याप्रमाणें वेदांमध्यें सर्व पृथ्वी पवित्र, वेदीस्वरूप, विष्णुपाद स्वरूप, गणली असून भरतखंडबाह्य देश अपवित्र, असा लोकांचा वेदविरुद्ध समज आहे. त्याच प्रमाणें समुद्र ओलांडून जाणें ह्मणजे पापकर्म इत्यादि समजही वेदविरुद्ध होत. कारण समुद्र ओलांडणें जर पाप कर्म अतएव प्रायश्चितार्ह असते, तर वेद मंत्रामध्यें " एषवावसमुद्रः यच्चात्वालः " ह्मणजे जोतिष्टोम यज्ञामधील वेदी पलीकडचें जें एक कुंड असतें त्यास चात्वाल ह्मणतात. त्या चात्वालास वेदमंत्राध्यें समुद्र मानलें आहे. आतां हें उघडच आहे कीं, यज्ञ चालला असतां शेंकडों वेळां ऋत्विजांना चात्वालोल्लंघनाचा प्रसंग येणार, तेंव्हां प्रत्येक वेळेस " समुद्रयातुः स्वीस्कारः इत्यादि वचनाप्रमाणें त्या ऋत्विजांना असंग्राह्य ठरवून दुसरे ऋत्विज आणावयाचें कीं काय ? नव्हें हें उघडच आहे. त्याचप्रमाणें " समुद्रोऽवभृथः " ह्मणजे समुद्राला अवभृथ म्हणजे यज्ञांगभूत पवित्र स्नान असा दृष्टांत दिला आहे; इत्यादि अनेक स्मृतिपुराणवचनापेक्षां बलवत्तर वेदवचनानें समुद्रयान निषिद्ध नव्हे, इतकेंच नाहीं पण " राष्ट्रं वा अश्वमेधः " ह्मणजे जें

देशांत जाऊं नये, व पराशर स्मृति सांगते कीं, कोठेंही राहून आचार सोडूं नये, आणि षट्कर्मे करावींत. असाच धर्माचा निश्चय समजावा. तेव्हां अर्थातच या उभय परस्पर विरोधी वाक्यामध्यें "आचार न सोडतां पट्कर्मे करून पाहिजे तेथें राहिलें असतां धर्महानि होत नाहीं" हें स्मृति वाक्य असल्या कारणानें पुराणवाक्यापेक्षां बलवत्तर होय. आतां यावरही कित्येक शास्त्री लोक जर अशी शंका काढतील कीं, पुराण वाक्यास वैयर्थ्य येईल, परंतु तेंही ह्मणणें बरोबर नाहीं; कारण स्वाचारत्याग करणाऱ्या म्लेंच्छ देशास गेलेल्या द्विजाविषयीं तें चरितार्थ होईल. तेव्हां " द्विजस्याब्धौ " या आदित्यपुराणस्थ वचनाचा व " वसन् वा यत्र तत्रापि या पराशर वचनाचा विचार करितां पुराणवाक्यापेक्षां स्मृतिवाक्य प्रबल असल्या कारणानें स्वाचार पाळून पाहिजे त्या ठिकाणीं षट्कर्मे करावींत असें सिद्ध होतें. त्याप्रमाणें इंग्लंड, अमेरिका, जर्मनी, फ्रान्स, वगैरे देशांत सुद्धां स्वाचार बाळगून रहाण्यास हरकत नाहीं, हें उघडच आहे. शिवाय " संभवत्प्रत्यक्षकल्पनायामदृष्टकल्पनाया अन्याय्यत्वम् " ह्मणजे कोणत्याही शास्त्रवचनासंबंधानें तें शास्त्रवचन कोणत्या हेतुस्तव लिहिलें, या विषयीं प्रत्यक्ष कल्पना होत असतां, अदृष्ट कल्पना करणें सर्वथा अयोग्य होय. सबब ज्यावेळीं नौका गमनकला अप्रौढ दशेंत होती; त्यावेळीं नावेंतून समुद्रयान केलें असतां नाव बुडून प्राण जाण्याची भीति म्हणून स्मृतिकारांनीं लोकहितार्थ हें वचन लिहिलें आहे. " नाकारणोहि शास्त्रेऽस्ति धर्मः सूक्ष्मोऽपि जाजले; कारणाद्धर्ममान्विच्छन् सलोकानाप्नुते शुभान् ॥ यस्तर्केणानुसंधत्ते सधर्मं वेदनेतरः; प्रयोजनमविज्ञाय न मंदोऽपि प्रवर्तते ॥ म्हणजे शास्त्रामध्यें यत्किंचित् जरी धर्मवचन असलें तरी तें सकारण असतें. धर्माज्ञेचा सोपपत्तिक जो शोध करितो, तो शुभ लो-

कांत प्राप्त होतो. धर्मवचनांची तर्कानें जो व्यवस्था लावितो, त्यालाच धर्म समजला इतरांना नाहीं. प्रयोजनावांचून अगदीं मंद सुद्धां कोणत्याही कार्यास प्रवृत्त होत नाहीं; इत्यादि वचनानुरोधें समुद्रयानाचा निषेध करण्याचें कारण प्राणभयावांचून संभवत नाहीं. दुसऱ्या एका ग्रंथकारानें समुद्रयानानें म्लेंच्छ देशांत जाऊ नये, असें म्हटलें आहे; आणि " चातुर्वर्ण्यव्यवस्थानं यस्मिन्देशे न विद्यते; स म्लेच्छदेशो विज्ञेय; × × ×॥ जेथें चातुर्वर्ण्य म्हणजे ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र अशी व्यवस्था नाहीं, तो म्लेंच्छदेश समजावा. यावरून व इतर* ठिकाणीं म्लेंच्छदेशाबद्दल जे उल्लेख आहेत त्यावरून चातुर्वर्ण्य नसल्यानें बेबंदशाई असणार; कारण ब्राम्हणादि विद्वान् वर्ण नसल्यानें ज्ञान व शास्त्र यांचा अभाव. क्षत्रियादि नसल्यानें प्राणरक्षणाचा अभाव, सबब अशा देशांत गेलें तर प्राणभयाची शंका, यास्तव म्लेंच्छदेशांत जाऊ नये—असा निषेध केला आहे. म्लेंच्छाविषयींच्या इतर ठिकाणच्या आपल्या ग्रंथकारांच्या उल्लेखावरून म्लेंच्छदेश म्हणजे रानटी तेथें शास्त्र नाहीं, नियम* नाहीं, पशुधर्मानें लोक रहातात; इत्यादि आमचे लोकांचे म्लेच्छाविषयीं समज होते. परंतु हल्लींची म्लेंच्छदेशाची स्थिती अत्यंत सुधारलेली असल्या कारणानें तो जुना निषेध हल्लीं निरर्थक आहे, हें उघड आहे.

यावर कित्येक ह्मणतील कीं, हें तुमचें ह्मणणें खरें; परंतु म्लेंच्छप्राय देशांत स्वाचार रहाणेंच अशक्य. कारण त्यांचा संसर्ग इत्यादि अनेक अडचणी येणार; तस्मात् तेथें जाऊं नये असेंच ह्मणावें लागतें; परंतु हें बरोबर नाहीं. कारण भारतीय पुण्यभूमीमध्यें सुद्धां स्वाचार

---

*पहा परिशिष्ट नं २ अ. * पहा परिशिष्ट नं. ब.

स्मृतीमध्यें "न म्लेच्छदेशे गच्छेत् परनिपानेषु अपः पीत्वा तत्साम्य पगच्छतीति" याचा अर्थः—दुसऱ्याचें उदकप्राशन केलें असतां, ते तत्साम्याप्रत पावतो, म्हणून म्लेंच्छ देशांत जाऊं नये. याविषयीं विचार करतां मनुष्याची बुद्धि अपरिपक्क आहे. ज्या देशांत तो जातो तेथील लोकांचेच तो हळूहळू आचारविचार करूं लागतो; फार तर काय पण कालांतरानें त्यांचा धर्म सुद्धां तो स्वीकारतो. यास उदाहरण प्रत्यक्ष महाराष्ट्र वैष्णवांचें. अस्सल कर्नाटकांतून अतिशिष्ट जे वैष्णव महाराष्ट्रांत येऊन राहिले, त्यांचे आचार बदलत बदलत ते आतां ताटवाट्यांत जेवतात, कांदे खातात, कित्येक तर आपल्या मुली स्मार्तांस सुद्धां देतात, आणि मग त्या सद्वैष्णवांचे मुलींस ते स्मार्त मुद्दाम एकादशीस जेवूं घालतात, व हरितालिका, शिवरात्रीचे दिवशीं त्यांचेकडून उपवास व (करवितात. या प्रत्यक्ष उपलब्ध गोष्टींवरून आमचे स्मृतिकारांनी जो हेतु दाखविला आहे, तो पुष्कळ अंशीं बरोबर आहे, व अशाच रीतीनें आमचे देशांतून प्राचीन कालीं जे अनेक क्षत्रिय ग्रीस, जर्मनी वगैरे देशांत जाऊन राहिले, तेही कालांतरानें भ्रष्ट होत होत अगदीं तत्प्राय होऊन गेले. त्यांचीं यज्ञयागप्रधान धर्मपुस्तकें, भाषा वगैरे कांहीं साधनें मात्र त्यांची पूर्वीचीं आर्यत्वचिन्हें दर्शवितात. परंतु एतावता 'न म्लेच्छ देशे गच्छेत् परनिपानेषु अपः पीत्वा' इत्यादि स्मृत्यनुरोधानें 'द्विजस्याब्धौ' याचा अर्थ केला तर सिद्ध काय होतें कीं, म्लेंच्छ देशांत जाण्याबद्दल जो निषेध आहे तो सकारण आहे. तथापि, जे, आमचे आनंदीबाईप्रमाणें आपले आचारविचार पाळून परदेशांत राहू शकतात, त्यांना हा निषेध लागू पडत नाहीं. ही एक उपपत्ति झाली.

**दुसरी**—समुद्रयानानें प्रत्यंत देशांतून जाऊन आलेला ब्राह्मण असंग्राह्य खरा; पण तो कशाचे ठायीं? तर आमचे मताप्रमाणें श्राद्धकर्माचे ठायीं. कारण मनुस्मृतीमध्यें श्राद्धनिषिद्ध जे ब्राह्मण सांगितलें आहेत, त्यांत समुद्रयायी ब्राह्मणास श्राद्धास सांगू नये, असें म्हटलें आहे. आतां कित्येक शास्त्री लोकांचे अर्थाप्रमाणें समुद्रयायी ब्राह्मण जर मुळींच असंग्राह्य होय, तर श्राद्धकर्माचे ठायीं त्यांचा संभव तरी कसा? तस्मात्, त्या मनुवचनाचे अनुरोधानें " द्विजस्याब्धौ तु " या ठिकाणीं असंग्रहः—श्राद्ध कर्माणि असंग्रहः ह्मणजे अशा ब्राह्मणास श्राद्धास सांगू नये, असा अर्थ करणेंच शास्त्रीय रीतीनें योग्य दिसतें नाहीं तर मनुस्मृतिकारावर श्राद्धकर्माकडे ज्याचा अत्यंत असंभव त्याचा उगीच निरर्थक निषेध केल्याचा दोष येतो. या दोषापेक्षां अनुवादाचा दोष फार कमी आहे, तेव्हां आमचे मता प्रमाणें श्राद्ध कर्माचे ठायीं तो असंग्राह्य असा अर्थ करावा हेंच योग्य होय.

**तिसरी उपपत्ति**-" द्विजस्याब्धौ तु " हा श्लोक **आदित्य पुराणांतील** आहे आणि कलि धर्म प्रधान **पराशरस्मृतीमध्यें** असें ह्मटलें आहे कीं, " व सन् वा यत्र तत्रापि स्वाचारं न विवर्जयेत् ॥ षट्कर्माणि च कुर्वीरन् । इति धर्मस्य निश्चयः " कोठेंही राहून आपला आचार सोडूं नये; आणि षट्कर्में करावींत. आतां पुराणवाक्य आणि स्मृतिवाक्य यांचा परस्पर विरोध आला, तर स्मृतिवाक्य बलवत् असा सर्व शास्त्रकारांचा सिद्धांत आहे. **संग्रहांत** ह्मटलें आहे कीं, " श्रुतिस्मृतिपुराणेषु विरुद्धेषु परस्परं ॥ पूर्वं पूर्वं बलीयः स्यादिति न्यायविदो विदुः " तेव्हां **आदित्य पुराण** सांगतें कीं, समुद्रांतून, नौकायानानें म्लेंच्छ

जसे आपण होतां होईल तितके मराठी वगैरे भाषेंत इंग्रजी शब्द मिसळूं न देण्याविषयीं झटतो, तसेंच फारशी वगैरे शब्द भाषेंत न येऊं देण्यासाठीं 'न वदेत् यावनीं भाषां' वगैरे श्लोक लिहिले गेले असावेत. असो. यवनांस आमचे लोक निंद्य मानीत नसत, इतकेंच नव्हे, पण ऋषिवत् ही मानीत असत. शुक्रनीतींत जसे इतिहास पुराण वगैरेचें अध्ययन सांगितलें आहे, तसेंच ÷ यावनमताचेंही सांगितलें आहे, ज्या ६४ कलांचें ज्ञान प्राचीन मोठमोठे क्षत्रिय राजांस असे, त्या ६४ कलांमध्यें म्लेंच्छांच्या शास्त्रांचें ज्ञान ही एक कला मानली आहे. महाभारतांत × राजसूय यज्ञामध्यें म्लेंच्छ यवन राजांस आमंत्रणें होतीं, व ते सभेंत हजर होते. पाण्डव-कौरवांच्या लढाईत म्लेंच्छ राजांच्या फौजा लढत होत्या. चंद्रगुप्तानें म्लेंच्छ फौजेची मदत घेतली होती. वास्तविक जर यवन म्लेंच्छ ह्मणजे चाण्डालापेक्षां नीच असा त्यांचा समज असतां तर त्यावेळेच्या झालेल्या राजसूय यज्ञांत, सभेंत, युध्दांत वगैरे पाण्डवा सारख्यांनीं त्यांना येऊं दिलें नसतें हें उघड आहे. यवनांची उत्पत्ति जरी पाहिली, तरी ती वरूनही आह्मा वैदिकधर्मीयाशीं त्यांचा किती प्रेमसंबंध आहे तें उघड दिसून येईल. यवनांची उत्पत्ति वाल्मिकी रामायणांत सांगितली आहे ती येणें प्रमाणें. वसिष्ट ऋषिंची कामधेनू नांवाची गाय होती. तिच्या साहाय्यानें वसिष्ट ऋषी हजारो लोकांस पंचपक्वानांची सुध्दां भोजनें घालीत. एके दिवशीं विश्वामित्रांची स्वारी त्यांच्या आश्रमीं गेली. तेथें फक्त एक गाय, परंतु वेळेस हजारो पानांच्या भोजनाची सर्व यथास्थित तयारी; हें पाहून वसिष्ठ हें कोठून आणितो याचा विश्वामित्रांना शोध केला हें सर्व त्यांना गाईपासून मिळतें असें त्यांना कळलें. तेव्हां यानें बलात्कारानें गाईस घेऊन जाण्याचा यत्न केला. तेव्हां कामधेनूच्या

\+ पहा परिशिष्ट नं. ४ × पहा परिशिष्ट नं. ५ * पहा परिशिष्ट नं. ६.

रोमापासून यवनसैन्य तयार होऊन त्यांनीं विश्वामित्राचे फौजेचा पराभव करून त्यांची दाणादाण उडवून टाकिली. तात्पर्य, कामधेनूच्या रक्षणासाठीं परंपरेनें वसिष्ठ ऋषीचा मान ठेवण्यासाठीं यवन उत्पन्न झालेले असें असतां ते इतके निंद्य कां मानिले जावे याचे कारणाचा विचार करतां भारतीय अविचारी हिंदु लोकांचा छल करण्यासाठीं केलेले मुसलमानांचे यत्न हें उघडच आहे. परंतु आपणांस हिंदुधर्माचे छल करणाऱ्या मुसलमान लोकांचे देशांत ह्मणजे अरबस्थानांत जायाचें नाहीं. कलाकौशल्याचें ज्ञान संपादनासाठीं ज्या अमेरिका इंग्लंद वगैरे देशांत जाण्याचें आहे, ते लोक मुसलमानासारखे हिंदु लोकांचे हाडवैरी जुलमी व धर्मसंबंधीं जुलूम करणारे नाहींत. त्यांची राज्यपध्धति फार उदार व स्तुत्य आहे. तेव्हां अर्थातच त्या यवन म्लेंच्छांचा संपर्क निंद्य मानण्यास आपणास कांहीं विशेष कारणें नाहींत हें उघडच आहे. तेव्हां ज्या यवन म्लेंच्छांच्या पूर्वजांना धर्मराज श्रीकृष्ण वसिष्ठादिकांनीं निंद्य मानलें नाहीं. त्यांना आपण कां निंद्य मानावें हें आह्मांस बिलकूल समजत नाहीं. प्रतिपक्ष्यांचें असें एक ह्मणणें आहे कीं, म्लेंच्छांचे यवनांचे जे देश आहेत ते अपवित्र गमनानर्ह, सबब तेथें जाऊं नये. इंग्लंदादि देशाला प्रतिपक्षी कोणत्या आधारानें निंद्य समजत असतील तें कोण जाणें. आह्मास तर तें बिलकूल कळत नाहीं. कारण, श्रीमन्महाभागवत इत्यादि पुराणांमध्यें व अष्टादश पुराणांमध्यें जो भूगोल सांगितला आहे. त्यामध्यें या देशांना निंद्यत्व कोठें सांगितलेले आढळत नाहीं. तेव्हां आर्थातच प्रतिपक्ष्यांचें ह्मणणें भागवत १८ पुराणें यांचे विरुद्ध आहे हें उघड आहे. पुराणांत भूगोल सांगितला आहे. त्याचें संक्षिप्त टिपण याप्रमाणें.

प्रथम जंबुद्वीप, त्यांत ९ वर्षें. प्रत्येकांत कित्येक पर्वत, कित्येक नद्या सांगून त्यांत भगवान् नारायण रहातो ह्मणून सांगितलें आहे. भद्रवर्षामध्यें वासुदेवाची प्रिया हयशीर्षाची उपासना करतात.

हरिवर्षामध्यें भगवान् नरहरि रूपानें असतो. प्रल्हाद त्याच वर्षामधील. केतुमालामध्यें भगवान् कामदेवाचें रूप धरून लक्ष्मीशीं रममाण असतो. रम्यक वर्षामध्यें भगवान् कूर्मतनूतें धारण करितो.

कुरुवर्षामध्यें भगवान् यज्ञपुरुष वराह अवताराचें रूप धारण करितो. किंपुरुषवर्षामध्यें हनुमान रामचंद्राची उपासना करितो. भारत-वर्षामध्यें भगवान् नरनारायण राहतो. प्लक्षद्वीपाचा राजा इध्मजिव्ह यानें आपल्या द्वीपाचे ७ भाग केले; त्यांत ७ वर्षें आहेत, तीं त्यानें आपल्या सात पुत्रांना वाटून दिलीं. त्यांत शिव, पवयस, सुभद्र, शान्त, क्षेम, अमृत, अभय हीं वर्षें. प्रत्येकांत ७ पर्वत व अशाच ७ नद्या. पर्वतांचीं नांवें—मणिकूट, वज्रकूट, इन्द्रसेन ज्योतिष्मान्, सुपर्ण, हिरण्यष्ठी व मेघमाल हे पर्वत. अरुणा, नृम्णा, आंगिरसी, सावित्री, सुप्रभाता, ऋतंभरा, या ७ नद्या. शाल्मलद्वीप त्याचा राजा यज्ञबाहु त्यानेंही ७ पोरांना ७ वर्षें वाटून दिलीं. त्या देशांना नांवें आपल्या पुत्रांचींच दिलीं, तीं याप्रमाणें—सौमनस्य, सुरोचन, रमणक, देववर्ष, पारिभद्र, आप्यायन, अविज्ञात, त्यांत पर्वत सात—नद्याही ७ पर्वत स्वरस, शतशृंग वामदेव, कुंद, मुकुंद, पुष्पवर्ष, सहस्रश्रुति नद्या ७ अनुमती सिनीवाली, सरस्वती, कुहु, रजनी, नंदा, राका पुष्करद्वीप येथील राजा वीतिहोत्र.

६. याचप्रमाणें कमी जास्ती वर्णन निरानिराळ्या पुराणांतून आहे. अग्निपुराण, ब्रह्मवैवर्त, कुर्म, वायु, मार्कंडेय, लिंग, आणि मत्स्यपुराण, भागवत, विष्णु आणि पद्मपुराण यामध्यें सुद्धां अशाच प्रकारचें वर्णन आहे. जे इंग्रज लोक अत्यंत गर्विष्ट, व हिंदूलोकांस अडाणी असें समजणारे, त्यांच्यापैकींच विल्फोर्ड नावांच्या विद्वान् गृहस्थानें हल्लींच्या भूगोलप्रमाणें पुराणांतरीं सांगितलेले देश कोणकोणते असावेत असा शोध करतां प्लक्षद्वीप म्हणजे आशियामैनर, शाल्मली म्हणजे पूर्वयूरोप, क्रौंच म्हणजे जर्मनी, शक म्हणजे ब्रिटिशांचीं बेटें, आणि पुष्कर म्हणजे ऐसलंड असावींत. अशा प्रकारचा सप्रमाण शोध लाविला आहे. एकंदरींत इतकी गोष्ट निर्विवाद आहे कीं, पुराणांतील भूगोल कितीही ढोबळ असला तरी तो भरतखंडाचा भूगोल नव्हे तो सर्व पृथ्वीचा आहे. व त्यामध्यें भरतखंडाशिवाय इतर जीं द्वीपें वगैरे सांगितलीं आहेत त्यांतील देवताही पुराणकर्त्यांच्या मताप्रमाणें कोठें शिव, कोठें विष्णु, कोठें देवी, कोठें जनार्दन वगैरे जर आहेत, तर ज्या देशामध्यें अशा पवित्र देवतांचा वास आहे असे पुराणकर्ते सांगतात, तर ते देश निंद्य व गमनानर्ह कसे झाले हें आम्हास बिलकूल समजत नाहीं.

तात्पर्य, हे देश गमनानर्ह असें आमचे लोकांस वाटण्याचें वास्तविक कारण असें कीं, महंमदाचा जसजसा उदय होत गेला, तसतसा त्यानें इतर धर्मीयांवर जुलूम करून त्यांना धर्मभ्रष्ट करण्याचा जुलूम मांडला तेव्हांपासून ' न नीचो यवनात्परः ' असें लोक मानूं लगले

प्राचीनकाळीं मोठे मोठे राजेही सर्व पृथ्वी जिंकून ब्राह्मणास दान देत असत. अशा प्रकारची वर्णनें भारतांतून वगैरे शेंकडों ठिकाणीं आढळतात. सागर या नांवाचा जरी विचार केला तरी सुद्धां या प्रश्नाचा तेव्हांच खुलासा होईल. सागर शब्दाची उत्पत्ति * सगर पासून झालेला तो सागर अशी आहे याची कथा अशी कीं, सगर नांवाच्या राजाला शंभर पुत्र होते. त्यानें इंद्रपद मिळविण्यासाठीं १०० यज्ञ करण्याच्या हेतूनें ९९ यज्ञ केले, तेव्हां इंद्राला काळजी पडून त्यानें त्या राजाचा १०० रावा यज्ञ सुरू होतांच त्या यज्ञांतील अश्व घेऊन इंद्र पळून गेला. त्या घोड्याला हुडकून काढण्यासाठीं सगर राजाचे पुत्रानीं सर्व पृथ्वीवर शोध केला व पाताळापर्यंत जमीन खोदून काढिली. तेव्हां जागाजागा जेथें आज आपण; समुद्र पहातों; तेथें पूर्वीं जमीन होती व खणल्या जागेंत भरपूर भरलेल्या पाण्याचे योगानें ते समुद्र बनले. तात्पर्य सगराच्या मुलांनीं क्षत्रिय असतां आपले धर्माप्रमाणें सर्व पृथ्वीचा जय केला आणि हल्लीं जे समुद्र दिसतात ते सगराच्या मुलांनीं केलेले खळगे होत असें जर धर्मशास्त्राधारें सिध्द होत आहे, तर तेंच सागरयान हल्लीं निषिध्द कां मानलें जातें तें लोकांसच माहीत !

तात्पर्य, प्राचीन काळीं भरतखंडबाह्य देशीं जाण्या येण्यास कोणत्याही प्रकारचा प्रत्यवाय कोणाच्या स्वप्नांतहि येत नव्हता, हे महाभारतांतील षोडश राजीकथाख्यानामधील राजांच्या गोष्टी व वेदांतील समुद्रशब्दयुक्त व नौकाशब्दयुक्त ज्या शेंकडों ऋचा आहेत, त्यावरून सहज कळण्या जोगें आहे. कदाचित् कोणी ह्मणतील छे: हो; पृथ्वी ह्मणजे भरतखंडांतीलच निरनिराळे देश. तर हें ह्मणणें

* पहा परिशिष्ट नं. ८.

किती विरुद्ध आहे हें सहज विचारांतीं कळण्याजोगें आहे. विष्णुपुराण महाभारत या ग्रंथांमध्यें एके ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं " उदेति सविता यत्र यत्र च प्रतितिष्ठति । तत्सर्वं यौवनाश्वस्य मांधातुः क्षेत्रमुच्यते " ह्मणजे जेथें सूर्याचा उदय होतो व जेथें जेथें सूर्य प्रस्थान करितो ती सर्व मांधाता राजाची भूमि होय. यावरून उघड आहे कीं, पृथ्वीवरील सर्व प्रदेशांत मांधात्याचें राज्य होतें. जेथें आर्य रहातील तो आर्यावर्त व जेथें म्लेंच्छ रहातील तो म्लेंच्छ देश अशा र्गी तार्थाची जी मेधातिथीची टीका आहे तीच खरी होय. कारण आमच्या क्षात्रधर्माग्रणी काश्मीरचे आणि नेपाळचे राजांनीं लदाक प्रांत व भूतान तिबेट प्रांतांतील कित्येक मुलुख आपल्या राज्यास जोडले आहेत. त्या मुलखांमध्यें हजारो ब्राह्मण रहातात, व आपलीं स्नानसंध्यादिक कर्में विध्युक्त करितात; हीं प्रत्यक्ष उदाहरणें डोळ्यापुढें असतांना प्रत्यंत देशांत जाण्याबद्दल प्रायश्चित्त देण्याऱ्या मंडळींस काय म्हणावें हें आह्मास बिल्कूल समजत नाहीं. हा इतका वरील लेख लिहिला तो तुष्यतुदुर्जन न्यायानें इंग्रज ग्रीक जर्मनी आदि लोक मुळापासून म्लेंच्छ आहेत असें गृहीत घेऊन आम्ही लिहिला आहे, परंतु वास्तविक पहातां तसें नाहीं.

÷ इंग्रज ग्रीक, जर्मन, फ्रेंच, रशियन हे आर्य किंवा म्लेंच्छ याचा विचार प्रसंगानुसार अतिसंक्षेपांत केला असतां तो वावगा होईलसा वाटत नाहीं. तर इंग्रजग्रीकादि म्लेंच्छ कीं आर्य याचा विचार करूं या. कल्पना करा कीं, महाराष्ट्रदेशांतील १०० कुटुंबें,

---

÷ पहा परिशिष्ट नं. ९.

बंगाल्यांत १०० काश्मीरांत १००, नेपाळांत १००, गुजराथेंत वगैरे निरनिराळ्या देशीं गेलीं; तीं त्या लोकांत जाऊन मिसळलीं. त्यांचा धर्म कांहीं कालांतरानें सुटून गेला. कालांतरानें ते भाषाही ज्या ज्या देशांत गेले तेथीलच बोलू लागले. इतक्या सर्व गोष्टी जरी झाल्या तरी जो चतुर आणि शास्त्रदृष्टी आहे, त्यानें सूक्ष्मदृष्ट्या अवलोकन केलें असतां जरी हीं निरनिराळे ठिकाणीं रहाणारीं कुटुंबें निरनिराळी भाषा बोलत असलीं तरी त्यांच्या भाषेंतील कित्येक मराठी शद्ब, त्यांच्या महाराष्ट्र रीतिभाती वगैरेवरून त्याला हे मूळचे महाराष्ट्र असावेत असें सहज ओळखितां येईल. याला प्रत्यक्ष उदाहरण गोवें प्रांतांतील किरिस्ताव लोकांचे हे किरिस्ताव मूळचे हिंदु होते, त्यांत शेंकडों हजारों मूळचे ब्राह्मण. त्यांना बळजोरीनें पोर्तुगीज लोकांनीं ख्रिस्ती केले, त्याला आज ३००।४०० वर्षें होऊन गेलीं, तरी त्यांच्या रीतीभाति, त्यांचे आचार, त्यांचे विवाहसंबंधीं नियम वगैरे वरून ते मूळचे ब्राह्मण होते हें सहज ओळखितां येतें. त्याप्रमाणें हजारो वर्षां पूर्वीं आर्यावर्तांतून लक्षावधि जनसमूह जो तिकडील देशांत जाऊन राहिला, त्याला जरी शेंकडों हजारों वर्षें होऊन गेलीं तरी पूर्वीचे यज्ञयाग त्यांच्या देवता, त्यांची भाषा, यांचें सूक्ष्म अवलोकन केलें असतां, त्यांचे भाषेंत डॉटर, फादर, ब्रदर, अक्टोबर नोव्हेंबर डिसेंबर इत्यादि दुहितृ पितृ भ्रातृ अष्टन् दशन् शद्बांसारखे जे हजारो शद्ब आहेत त्यावरून विद्वान् लोकांनीं त्यांचे पूर्वज आर्य लोकांपैकींच होते हें सिद्ध केलें आहे. आतां त्यांचे आचार वगैरे भ्रष्ट झाले आहेत ही गोष्ट जरी निर्विवाद आहे तरी

त्यांचें आर्यत्व जाऊन ते म्लेंच्छ शद्बवाचक जरी झाले तरी ते निंद्य कसे हें आम्हास मुळींच समजत नाहीं. फ्रेंच जर्मनादि म्लेंच्छ लोकांचे पूर्वज आर्य होते हें सिध्द करण्यास वरील साधनेंच आहेत असें नव्हें. आपलें * विष्णु पुराण, मत्स्यपुराण वगैरे ग्रंथांत सुध्दां यवन हे तुर्वसू राजापासून झाले व म्लेंच्छ हे अनुराजापासून झाले असें सांगितलें आहे. येथपर्यंत जें विवेचन केलें त्यावरून धर्मशास्त्रद्दष्ट्यां कोणत्याही रीतीनें पाश्चात्य राष्ट्रांमध्यें जाण्यास हरकत नाहीं हें निर्विवाद सिध्द झालें आहे. आतां कलाकौशल्याचें ज्ञान किंवा त्या देशाची माहिती वगैरे मिळविण्यासाठीं इंग्लंड, अमेरिका वगैरे देशांत जाणें धर्म्य किंवा अधर्म्य आहे याचा विचार करूं.

ब्राम्हणांची स्नानसंध्या शमदमादिसाधनषट्कसंपन्नतपश्चर्या, सरहस्य वेदशास्त्राचा अभ्यास व त्याचें अनुष्ठान; या क्रिया उत्तम चालण्यास त्यांना उदर निर्वाहाचे चिंतेपासून मुक्त असलें पाहिजे हें उघडच आहे:—कारण एकीकडे पोटाचा धंदा व त्याचवेळीं स्नानसंध्या वेदाध्ययन, व त्याच वेळेस अनुष्ठान हीं दोन्हीं कार्यें एकसमयावच्छेदेंकरून चालणें अत्यंत दुःसाध्य आहेत. तेव्हां वेदवेदांगपारग धर्मानुष्ठानपर विद्वान् ब्राह्मणांचा निर्वाह उत्तम चालण्यास ज्या क्षत्रिय वैश्य शूद्रांचे ते गुरु आहेत, त्यांना पोटभर खाण्यास मिळून विद्वान् ब्राम्हणांस दान धर्म करण्या पुरता तरी पैसा त्यांचे जवळ असला पाहिजे हें स्पष्ट आहे. द्रव्य साधनाचें साधकतम कारण शिल्पज्ञान व कला होय. जर व्यवहारांतील धोतरें सुया, टांचण्या लोखंड तांबें

पहा परिशिष्ट नं. ९ अ.

इत्यादि सर्व जिनसा कीं, ज्या जिनसा तयार करण्यावर ब्राम्हणेतरांचा निर्वाह चालावयाचा त्या सर्व जिनसा यंत्रद्वारें पाश्चात्य राष्ट्रांतून तयार होऊन आल्या कारणानें बाजारांत अतिशय सवंग विकतात, त्यामुळें अर्थातच ब्राम्हणेतरांचे धंदे बसले. त्यांनाच जेव्हां पोटभर खायाला मिळेना, तेव्हां ते ब्राम्हणांना काय देणार ? बरें ब्राम्हणाला जर खायाला नाहीं, तर ते स्नानसंध्या तपश्चर्या कशी करणार ?

तात्पर्य, ब्राह्मणादिकांची स्नानसंध्या, वेदाध्ययन, अग्निहोत्रादि धर्मक्रिया यथासांग चालण्यास, त्यांचे पोषकवर्ग ज्या ब्राह्मणेतर जाती, त्यांच्या निर्वाहाचें साधन जें कलाकौशल्य, तें मिळविण्यासाठीं जे कोणी कचाप्रमाणें युरोपांत जातील, त्यांचे हातून वेळेस कितीही अधर्म झाला, तरी त्यांच्या जाण्यापासून जर हजारों लोकांचें साक्षात् परंपरा कल्याण आहे, त्यांच्या जाण्यापासून जर हजारों लक्षावधि किंवहुना कोट्यावधि लोकांनां जर अर्थ, धर्म, काम, मोक्ष, याचा साधकतम जो अर्थ, तत्साधनीभूत जें शिल्पज्ञान, त्याची प्राप्ती होऊन त्यांचें जाणें जर सहस्त्रावधि जनांचें पोषणसाधन होईल, तर या पेक्षां जगांत पुण्यतम गोष्ट कोणती आहे? कोणतीही नाहीं, हें उघडच आहे.

तस्मात् सहस्त्रावधि जनांचे पोषणसाधनादि शिल्पादिकांचें ज्ञान मिळविण्यासाठीं जे पाश्चात्य राष्ट्रांतच काय, पण कोठेंहीं जावोत, ते अति पुण्यवान् होत; सबब त्यांना मदत करणें व त्यांना ज्ञातींत घेणें हेंही युक्ततर होय. परंतु याचवेळीं हेंही सांगणें कीं, पाश्चात्य राष्ट्रांत जे कोणी केवळ चैनीसाठीं, विषयोप-

भोगासाठीं, यथेच्छ मद्यपानादि व्यवहार करण्यासाठीं जातील; ज्यांच्या गमनापासून साक्षात् किंवा परंपरा आमचे राष्ट्रास बिलकूल फायदा नाहीं, असें कोणी लोक तिकडून जाऊन आल्यास खरोखरच ते असंग्राह्य होत. व त्यांना पावन करणारेही अत्यंत पापी होत.

आतां कित्येक लोकांचें ह्मणणें कीं, जर्मन, फ्रान्स, अमेरिका देशांत मांसाहारावांचून चालत नाहीं. तेव्हां मांसाहार केला, ह्मणजे ब्राह्मणत्व जाऊन म्लेंच्छत्व येणार, तेव्हां त्या देशांत जाऊं नये. याचें उत्तर आह्मी इतकेंच देतों कीं, जो लोकापवाद आहे तो खोटा आहे, कारण त्या देशामध्यें मांसाहाराचा त्याग करून केवळ धान्यावर उपजीवन करणारे लोक हजारों आहेत. परंतु तेही तुष्यतु दुर्जनन्यायानें गृहीत केलें, तरी शास्त्रदृष्ट्या व रूढिदृष्ट्यां त्याचा विचार करूं या. धर्म ह्मणजे काय, व अधर्म ह्मणजे काय, याचा विचार अति सूक्ष्म आहे. व त्याचें समग्र विवेचन महाभारत व अष्टादशपुराणांमध्यें अति स्पष्ट केलें आहे. महाभारतामध्यें विश्वामित्राची * व श्वपचाची एक गोष्ट दिली आहे. तिचें तात्पर्य असें:—विश्वामित्र ऋषि दुष्काळांत सांपडले. फार भूक लागली, खायाला कांहीं मिळेना, तेव्हां एका श्वपचाचे घरीं कुत्र्याची मांडी त्याला सांपडली, ती खाऊन निर्वाह करावा. ह्मणून विश्वामित्र श्वपचास ती मागूं लागले, तूं ब्राह्मण, तूं मांस खाऊं नये, ह्मणून श्वपच त्यास उपदेश करूं लागला, परंतु विश्वामित्रानें सांगितलें, तुझ्यापेक्षां मला धर्म चांगला समजतो, प्राणरक्षणासाठीं आपत्कालीं मांस खाण्यास कांहीं हरकत नाहीं. अग-

\+ पहा परिशिष्ट नं. ११

स्तीला कांहीं खाण्यास मिळेना, तेव्हां त्यानें वातापि राक्षस खाल्ला. आगस्ति महान् ऋषि, तेव्हां मी जें आज प्राणरक्षणासाठीं मागतों, तें नवें नव्हे, शिष्टजनाचरितच हा मार्ग आहे, त्याचें अनुकरण मी करणार. तात्पर्य काय कीं, एका मनुष्यानें केवळ आपल्या एकट्याचें प्राणरक्षणासाठीं मांस खाणें जर सशास्त्र सिद्ध केलें व तें दूषणीय होत नाहीं, तर हजारो लक्षावधि लोकांच्या प्राणरक्षणासाठीं एखाद्या मनुष्यानें परद्वीपांत जर मांसाहार केला, तर तो निंद्य कसा हें आह्मांस समजत नाहीं. मनुस्मृतीमध्यें सुद्धां जेथें मांसाहाराचा निषेध सांगितला आहे, तेथें अनापदि असा शद्ब आहे. ह्मणजे आपत्ती ( अडचण ) वांचून जर मनुष्यानें चैनीसाठीं मांसाहार केला, तर अत्यंत निषिद्ध होय; असें सांगितलें आहे. त्यावरून उपाय नसतां, केवळ प्राणरक्षणासाठीं अत्यंत संकटावस्थेमध्यें मांसाहार करण्यास धर्मशास्त्रकारांनीं परवानगी दिली आहे, हें उघडच आहे. **नाद्यादविधिनामांसविधिज्ञोऽनापादिद्विजः मनु.** ६०८।२३। **अनापदि=प्राणात्यये देवताद्यर्चनमपिनापेक्ष्यम्** मेघातिथिः अनापदि=रोगाद्यसंपत्तौ—राघवानंदः—ही तर शास्त्राची गोष्ट झाली; परंतु रुढीप्रमाणें जरी पाहिलें तरी बंगाली ब्राह्मण, मैथिल ब्राह्मण, नेपाळी ब्राह्मण मांसाहार करतात; हें जगप्रसिद्ध असून त्या ब्राह्मणांचें ब्राह्मणत्व भ्रष्ट होऊन त्यांना म्लेंच्छत्व किंवा यवनत्व आल्याचें आमचे ऐकिवांत नाहीं. इतकेंच नाहीं पण त्यापैकीं शेकडों ब्राह्मणांना बडोदें संस्थानांत श्रावण मासांत योग्य सन्मान व सत्कार केलेला आह्मी प्रत्यक्ष पहातों. तेव्हां त्यांचा सत्कार करणारी मंडळी त्यांना त्यांचे मांसाहारामुळें पतित समजत नाहीं हें उघडच आहे. यावरून मांसाहार निषिद्ध नव्हे असें आमचें मत आहे असें कोणी समजूं नये.

साधारण मांसाहार काय ? पण यज्ञांत सुद्धां प्रत्यक्ष पशुवध न करतां पिष्ट पशूनें तें काम साध्य करावें, असें आमचें मत आहे. परंतु आमचें सांगणें एवढेंच कीं, त्यामुळें ब्राम्हणत्वापासून पतितत्व शास्त्रदृष्टचां किंवा रुढींत दृष्टीस पडत नाहीं. बाकी पाश्चात्य राष्ट्रामध्यें मांसाहारावांचून चालूं शकतें, हें अनेक लोकाचे अनुभवावरून सिद्ध आहेच. तेव्हां प्रतिपक्ष्यांचे पाश्चात्य राष्ट्रांत गेल्यास अभक्ष्यभक्षणादिक झाल्यास तो ब्राम्हण्यपतित होतो वगैरे ह्मणणें किती समंजस आहे, याचा वाचकच विचार करतील.

आतां कित्येक लोक ह्मणतील, हें तुह्मी शास्त्रीयरीत्या सिद्ध कारितां, पण म्लेंच्छ देशांत आमचे हिंदु लोक कधींही गेले नाहींत. तेव्हां तुमची नुसती कल्पना काय कामाची. परंतु हें ह्मणणें सुध्दां अत्यंत अज्ञानमूलक आहे. यांस प्रमाणें:—

राजा मानसिंग जयपूरचे क्षत्रियावतंस राजे यांनीं काबुलामध्यें कित्येक वर्षें सुभेदारीचें काम केलें होतें. महाराज रणजितसिंगांनीं तर "सब भूम गोपालकी है" हा न्याय स्वीकारून पेशावराचे पलीकडे काबुलांतील कांहीं मुलूख जिंकून तेथें आपलें राज्य स्थापून दोन किल्ले सुद्धां बांधिले. तसेंच क्षत्रियावतंस काश्मीरचे महाराज गुलाबसिंग यांनीं म्लेंच्छ देश जो तिबेट, त्यांतील लदाक प्रांत आपले राज्यास जोडिला आहे. तेथें महाराजांचे शेंकडों पंडित ब्राह्मण कामगार रहातात.

जावा बेटामध्यें अति प्राचीनकाळीं हिंदु लोकांनीं वसाहत केली आहे. तेथें अझून रामायण भारतादि पुस्तकें उपलब्ध होतात. कास्पिअन समुद्राजवळ बाकू ह्मणून शहर आहे; तेथें गणपतीचें देवालय आहे व तेथें ब्राह्मण राहतो. हजारों वाणी लोक अति प्राचीन काळापासून आफ्रिकेंतील झांझीबार येथें व्यापारासाठीं हल्लीं सुद्धां जात आहेत. फार लांब कशाला, इजिप्त, ब्रह्मदेश वगैरे देशांमध्यें लढण्यासाठीं जी फौज गेली होती, तींत हजारों ब्राह्मण पुरभय्ये गेले होते. फार लांब नको, परवां लिमडी, कच्छ, भावनगर, जोधपूर गोंडळ वगैरे संस्थानांतील कित्येक संस्थानचे मुख्य ठाकूर, कित्येकांचें प्रतिनिधि वगैरे शेंकडों लोक गेले होते. बंगाली लोक तर या कामांत फारच पुढें आहेत. कित्येक बाबू अमेरिका, इटाली, फ्रान्स, रशिया जर्मनी, हालंड वगैरे देशांत वर्षानुवर्षें राहून आले आहेत. महाराष्ट्र देशांतील सुद्धां अनेक ब्राह्मण इंग्लंडादि देशांत वर्षानुवर्षें राहून आले आहेत. त्यापैकीं कित्येकांनीं प्रायश्चित्त मुळींच घेतलें नाहीं, व त्यांच्याशीं लोकांचे भोजनादि व्यवहार यथास्थित चालू आहेत. अति प्राचीनकाळीं तर हिंदु लोक अमेरिकेंत सुद्धां जाऊन राहिले होते. हे बाबू केदारनाथ बाकू यांनीं आपल्या पुस्तकांत सविस्तर सिद्ध करून दाखविलें आहे.

येथपर्यंतच्या विवेचनावरून ब्राह्मणास इतर राष्ट्रांत जाण्या येण्यास हरकत नाहीं वगैरे सिध्द झालेंच; परंतु समाजाचे हल्लींच्या स्थितीचें अवलोकन करितां सहज लक्षांत येईल कीं, हल्लींच्या काळीं

इतर देशांत जाऊन शिल्पादि विद्येचें अध्ययन करून येणें हें ब्राम्हणांचें कर्तव्यकर्मच होय. आणि अशा वेळीं जर ते कर्तव्य न करतील तर हजारों, लक्षावधि किंबहुना कोट्यावधि लोकांचे प्राणनाशाचें पाप त्यांचे माथीं येईल. ज्याप्रमाणें राजा दुर्व्यसनासक्त झाला असतां, राष्ट्रांत जर चोऱ्या, दरोडे पडू लागले तर, त्यांत ज्या कांहीं हत्या, होतील त्यांचें पाप राजाचे माथीं. जसें लहान मुलास स्वच्छंद स्वेच्छाचरण करूं दिलें, त्याला योग्य शिक्षा करून त्याच्याकडून योग्य वयांत अभ्यास न करविला आणि मुलगा जर उनाड निघाला, तर त्याचा दोष बापाचे माथीं. त्याचप्रमाणें जोपर्यंत "वर्णानां ब्राम्हणो गुरुः" या न्यायानें ब्राम्हणांचें ठायीं सर्व वर्णाचें गुरुत्व आहे, तोंपर्यंत सर्वविद्यासंपादनाचा त्यांचाच अधिकार आहे, हें उघडच आहे. मन्वादि स्मृतीमध्यें आचार्या( गुरु)चें माहात्म्य आईबापापेक्षांही जास्त सांगितलें आहे. तेव्हां सर्व वर्णाचें आचार्यत्व जर ब्राम्हणांकडे आहे. तर सर्व वर्णांचें पोषणास साक्षात्कारण ज्या शिल्पादि विद्या त्यांचें अध्ययन करणें हें ब्राम्हणांचें कर्तव्य होय हें निर्विवाद होय. मनुस्मृतींत सांगितलें आहे कीं–

आददीत शुभां विद्यां अन्त्यादप्यवरादपि ।
अंत्यादपि परं धर्मं स्त्रीरत्नं दुष्कुलादपि ॥
समादेयानि शिल्पानि विविधानि च सर्वतः ।

याचें तात्पर्य हलक्या अगदीं नीच अशा मनुष्यापासून सुद्धां प्रत्यक्ष सिद्ध [ अर्थकरी ] अशी एखादि विद्या असेल तर तिचें हरएक

तऱ्हेनें संपादन करणें हें ब्राम्हणांचें कर्तव्यकर्म आहे. वाचकांस वाटेल कीं, या श्लोकाचा अर्थ असा कसा केला? आददीत याचा कर्ता ब्राम्हणच कां घ्यावा? तर त्याचें कारण मनुस्मृतींत पहिल्याच श्लोकांचे टीकेंत मनुस्मृतींतले धर्म वर्णत्रयाला ( ब्रा. क्ष. वै. लाच) लागू आहेत असें सांगितलें आहे हें होय; आणि जुन्या मताप्रमाणें कलींत कलावाद्यंतयो:स्थितिः या न्यायानें फक्त ब्राह्मण व शूद्र हे दोनच वर्ण होत. पैकीं शूद्र वर्णत्रयांतील नव्हे तेव्हां आददीत याचा कर्ता ब्राह्मणच असला पाहिजे. तेव्हां एतद्दृष्ट्या परराष्ट्रांत जाऊन शिल्पकलाध्ययन करणें हा ब्राह्मणांचा हल्लींच्या काळचा परम धर्म होय. व अशा ब्राह्मणांना परराष्ट्रांत जाण्यास द्रव्यद्वारां मदत करणें अतिपुण्य होय हें उघडच आहे.

यथा नद्यः स्यंदमानाः समुद्रेऽस्तं गच्छन्ति नामरूपे विहाय ( नद्या वहात वहात समुद्राशीं जाऊन तद्रूप होतात ) त्याप्रमाणें कोणतीही धर्मसंबंधीं गोष्ट घेतली तरी तिला राजाश्रय पाहिजे. चातुर्वर्ण्यव्यवस्था अबाधित चालण्यास, श्रोत्रिय ब्राह्मणांचे योगक्षेम चालण्यास, वेदशास्त्रादिकांचें अध्ययनाध्यापन यथाशास्त्र चालण्यास निदान हल्लीं जीं चार देशीं राज्यें आहेत, त्यांचें योगक्षेम असणें अत्यंत अवश्यक आहे, हें कोणीही साधारण भिक्षुक सुध्दां कबूल करील. आतां स्वराज्याचे रक्षणास युद्धकलेसंबंधीं सांगोपांग व्यूहज्ञानादि, तसेंच युद्धाचीं उपांगें आयुधें व आयुधांचे साधनीभूत लोखंडादि धातु, त्यांच्या खाणी, तत्संबंधीं शिल्पविद्या इत्यादि

शेंकडों कलांचें ज्ञान असणें अवश्य आहे. व यासाठीं यूरोप, अमेरिका वगैरे खंडांत जाणें जरूर आहे. या कलांचे ज्ञानावांचून राज्याचे योगक्षेम चालतील असें मानणें ह्मणजे अंतरिक्षांत आधारावांचून दुर्गप्रासादादि रचना करण्याप्रमाणेंच होय. कारण वरील कलांपैकीं युरोपखंडांत जाऊन शिकल्यावांचून हल्लीं एकही कला या देशीं साध्य होण्या जोगी नाहीं. तेव्हां धर्म, अर्थ, काम, मोक्षांचे आधारभूत स्वराज्याचे रक्षणार्थ युरोपांतून अगर कोणत्याही देशांतून वरील कलांचें ज्ञान मिळविणें स्वधर्मरक्षणास नाप्राप्त आहे, हें उघडच आहे. ह्मणूनच मनुस्मृतींत 'आददीत शुभां विद्यां अंत्यादप्यवरादपि' व 'समादेयानि शिल्पानि विविधानि च सर्वतः' असें सांगितलें. राज्याचे योगक्षेम चालण्यास जगतांमध्यें याच्यावत् अरिमित्र, मित्रमित्र, अरिमित्रमित्र, पार्ष्णिग्राहासार, आक्रन्दासार, मध्यम, उदासीन, विजिगीषु, इत्यादि द्वादश राजमंडळ, कित्येक नीतिशास्त्रकारांचे मताप्रमाणें जगांतील आसपासच्या ४२० राज्यांतील कोश, मंत्र, प्रकृति, देश, राष्ट्रावस्था वगैरेचे हमेशा ज्ञान प्रत्येक राजास असलें पाहिजे. व अशा तऱ्हेनें वर सांगितलेल्या राष्ट्रांचें ज्ञान मिळविण्यास प्रत्येक राजानें आपल्या राज्यांतील सर्व शास्त्रविशारद असे दूत आणि व्यापारी, बैरागी वगैरे लोक निरानिराळ्या मिषांनीं वरील ४२० राज्यामध्यें पाठवून नित्य त्यांच्याकडून सर्व राज्यांतील बातम्या आणविल्या पाहिजेत. व तदनुरूप नेहमीं आपल्या राज्यांत बंदोबस्त ठेविला पाहिजे, असें मनु, शुक्र, कामदकादि नीतिशास्त्रवेत्त्यांचें मत आहे. प्राचीनकाळीं वेदवेदांगपारग पुरोहित × सर्व राज्यकारभाराची मुख्य

---

+ पहा परिशिष्ट नं. १२.

मुख्य कामें करीत, व राजाला सल्ला मसलत देण्यास नेहमीं पुढारी असत. धर्मराजानें इतर राष्ट्रांची माहिती मिळविण्यासाठीं आपला पुरोहित पाठविला होता. तात्पर्य धर्मार्थकाममोक्षादिपुरुषार्थचतुष्टयाचें साधकतम जें स्वराज्य त्याच्या योगक्षेमास आपल्या नीतिशास्त्रकारांचें मताप्रमाणें सर्व राष्ट्रांत* दूत आणि चर पाठविले पाहिजेत. ते सर्व शास्त्रविशारद अनुरक्त, शुचि आणि दक्ष पाहिजेत. सर्वशास्त्रविशारदत्व ह्मणजे टीकाकारांचें मतें संस्कृत, प्राकृत, देशभाषा, धर्मशास्त्र इत्यादिमध्यें निपुणत्व; पैकीं धर्मशास्त्रज्ञत्व ब्राह्मणांवाचून नाहीं. तेव्हां भरतखंडबाह्यदेशीं ब्राह्मणांनीं जाऊं नये, असें ह्मणणें ह्मणजे मनु, शुक्र. कामंदकादि नीतिशास्त्रवेत्त्यांचे मताविरुद्ध आहे, इतकेंच नव्हे, परंतु धर्मार्थकाममोक्षादिपुरुषार्थचतुष्टयाचें साधकतम स्वराज्याचे रक्षणार्थ पर राष्ट्रांमध्यें सर्वशास्त्रविशारद दूत आणि चर ( बातमीदार ) यांचें संप्रेषण अति महत्वाचें असल्याकारणानें भरतखंडबाह्यदेशीं ब्राह्मणांनीं जाऊं नये असें ह्मणणें किंवा आग्रह करणें, धर्मार्थकाममोक्षादिपुरुषार्थचतुष्टयविघातक आहे हें उघड आहे.

विलायतेत वगैरे जाऊं नये असें जे ह्मणतात, त्यांचा समुद्रांतून जाणें येणें शास्त्रामध्यें फार निंद्य आहे, अशा प्रकारचा समज असला पाहिजे हें उघड आहे. तेव्हां अर्थातच या संबंधाचा विचार करतांना समुद्र हा खरोखर अगदीं अपवित्र व अमेध्य असा शास्त्रकारांनीं मानला आहे कीं कसें हें पाहिलें पाहिजे. वास्तविक पहातां जो कोणी धर्मशास्त्रग्रंथाचें थोडेंसें अवलो-

---

* पहा परिशिष्ट नं. १३.

रून करील, त्याला समुद्र हा अपवित्र आहे वगैरे हल्लींच्या लोकांचे समज खोटे आहेत इतकेंच नव्हे, परंतु प्राचीन प्रमाणग्रंथ पाहतां ऋषि जनांचा व शास्त्रकारांचा, समुद्र अपवित्र वगैरे समज मुळींच नव्हतां इतकेंच नव्हें परंतु उलटे ते लोक समुद्र हा पवित्र समजत. हें निर्णय सिंधूतील खालचें वचन ऋग्वेदांतील शेंकडो ऋचा पाहतां उघड दिसून येतें.

निर्णयसिंधु पान ९८ मध्यें.

॥ समुद्रे पर्वसु स्नायादमायां च विशेषतः ॥
॥ पापैर्विमुच्यते सर्वैरमायां स्नानमाचरन् ॥

पृथ्वीचंद्रोदयामध्यें:—

॥ पुनाति पर्वणि स्नानात्तर्पणैः सरितां पतिः ॥

पृथ्वीचंद्रोदय सौरपुराण—

॥ युगादौ तु नरः स्नात्वा विधिवल्लवणादधौ ॥
॥ गोसहस्त्रप्रदानस्य कुरुक्षेत्रे फलंहि यत् ॥
॥ तत्फलं लभते मर्त्योभूमिदानस्य यत्फलम् ॥
॥ अयं निर्णयःसर्वयुगेषु बोद्धव्यः ।

निर्णयसिंधू पान ७६.

समुद्रयान व प्रत्यंतदेशगमन करूं नये असें ह्मणणारे, त्या देशांत न जाण्याचें असें एक कारण सांगतात कीं, त्या प्रवासांत आगबोटींत एकसारखें ७–७।८–८ दिवस नुसतें समुद्रांतून जावें लागतें. आगबोटींत आसपास यवन, म्लेंच्छ, साहेब लोक वगैरे वसले असतात. त्यामुळें स्नानसंध्यादि करण्यास निराळा डबा घेतला तरी मोठी अड-

चण पडते. कारण पलीकडे यवनादिकांचा स्पर्श असतो. परंतु अशा तऱ्हेची अडचण दाखविणें ह्मणजे हिंदुधर्मशास्त्रकारांस अगदीं व्यवहारानभिज्ञ ठरविणें होय. आह्मी मागेंच सांगितलें आहे कीं, हिंदुधर्मशास्त्र हें कामधेनु ह्मणजे किंवा कल्पतरुप्रमाणें होय. सर्व इष्ट गोष्टी त्यांतून निघतात. धर्मशास्त्र बोलून चालून आप्तवाक्यें. आप्तवाक्यें ऋषिजनांनीं वर्षानुवर्षें अनुभव घेऊन लोकहितासाठीं लिहून ठेविलेलीं; लोकांना त्रास होण्यासाठीं नाहीं; तेव्हां लोकसुखसमृध्द्यर्थ निर्माण झालेल्या आर्षग्रंथामध्यें व अत्यंत व्यवहारदक्ष मन्वादिस्मृतिकारांचे ग्रंथामध्यें यःकश्चित् सामान्य अडचणीचें निवारण केलें नाहीं असें कसें होईल? अत्रिस्मृतींत सांगितलें आहे—

" देशयात्रा विवाहेषु यज्ञ प्रकरणेषु च ।
उत्सवेषु च सर्वेषु स्पृष्टास्पृष्टिर्न विद्यते ॥

या श्लोकाप्रमाणें देशांतरप्रवास, विवाह, यज्ञप्रकरण सर्व प्रकारचे उत्सव वगैरेमध्यें ( उदाहरणार्थ जगन्नाथ व्यंकटेशगिरी ) येथें स्पर्शास्पर्श दोष नाहीं. तेव्हां आगबोटीमध्यें यवनादिकांचा स्पर्श होईल, ही अडचण जी दाखविण्यांत येते त्यांत कांहींच तात्पर्य नाहीं हें, उघड आहे.

आतां कित्येकांचें असें ह्मणणें असेल कीं, प्रवासामध्यें स्पर्शास्पर्श दोष नाहीं असें शास्त्र असल्यास ती अडचण आह्मी दाखवीत नाहीं. परंतु प्रवासांत संध्यादि कर्में करण्यास मोठी अडचण पडते; सबब पाश्चात्य राष्ट्रांत जाणें अयुक्त होय. परंतु हेंही

ह्मणणें शास्त्रदृष्ट्यां बरोबर नाहीं; कारण मनुस्मृतीमध्यें सांगितलें आहे कीं, 'कुर्यादन्यन्नवाकुर्यात् मैत्रो ब्राह्मण उच्यते' ह्मणजे आपत्कालीं ब्राह्मण इतर विध्युक्त कर्में करो किंवा न करो त्यांनीं मित्र देवताक (सूर्यदेवताक) गायत्रीजप केला तरी बस्स आहे. त्यांतही मोठ्यानें जप करण्यापेक्षां 'साहस्रो मानसः स्मृतः' या वचनाप्रमाणें मानसिक जपामध्यें सहस्रपट पुण्य विशेष असल्या कारणानें कशीही अडचण असली, तरी भक्तियुक्त अंतःकरणानें श्रध्दापूर्वक एकाग्रमनसा मानसिक गायत्री जप करण्यास कोणतीही हरकत येईल असें वाटत नाहीं. प्रवास असल्याकारणानें स्पर्शास्पर्श दोष नाहीं, हें शास्त्रसिद्धच आहे. तेव्हां हल्लींच्या आगबोटींतून वगैरे पाश्चात्य राष्ट्रांत जाण्या येण्यानें कर्माचा लोप होतो; व अशा रीतीनें २०१२२ दिवस कर्माचा लोप झाला म्हणजे तो पतित होतो, वगैरे म्हणण्यांत विशेष तात्पर्य नाहीं, हें उघडच आहे. आतां घरच्याप्रमाणें आगबोटींत विध्युक्त ब्रह्मकर्में सांगोपांग होण्यास जरी कित्येक अडचणी असल्या, तरी पण मानसिक गायत्री जप करण्यास तशा अडचणी नाहींत हें वर सांगितलेंच आहे. प्रवासांत तेवढा विधि श्रद्धापूर्वक निष्पाप अंतःकरणानें केला, तर त्याच्या ब्राह्मणत्वाला वगैरे बिलकूल हानि पोंचत नाहीं असें मनुवचन असल्या कारणानें ब्राम्हण्य कायम रहाण्यास जितक्या कर्माची आवश्यकता आहे, तितकें कर्म यथास्थित करून, पाश्चात्य राष्ट्रांत वगैरे जाण्यास कोणत्याही प्रकारची हरकत नाहीं, हें शास्त्रदृष्ट्यां अगदीं स्पष्ट आहे, हें उघडच होय. कित्येक लोक म्हणतील कीं, इंग्लंड, अमेरिका वगैरे देशांत तुह्मी कलाकौशल्याचे संपादनार्थ

जाणार, परंतु त्या देशांतील लोक अत्यंत धर्मवेडे आहेत. ते तुम्हा हिंदुलोकांना परधर्मीय समजून तुमच्याशीं ते कधींही मोकळ्या मनानें वागणार नाहींत. आपण आपल्या भरतखंडांत इंग्रज, युरोशियन वगैरे लोकांचे हिंदु ख्रिश्चनांशीं जितकें सौहार्द असतें, तितकें त्यांचें हिंदु लोकांशीं नसतें हें प्रत्यक्ष पहातों. तेव्हां या वरून वरील म्हणणें केवळ अयथार्थ आहे असें म्हणतां येणार नाहीं. तेव्हां एकंदरींत शिल्पकलादिकांचें ज्ञान संपादण्यास पाश्चात्य राष्ट्रांचा हिंदुधर्माविषयीं जो तिरस्कार आहे, त्यामुळें मोठी अडजण पडेल, व इष्ट हेतु सिद्धीस जाईल कीं नाहीं, हा विषयही मोठा वादग्रस्त आहे. असो, असें जर कित्येकांचें म्हणणें असेल, व शिल्पकलादिकांचें ज्ञान संपादण्यास धर्मांतराची खरोखरच जर जरूर असेल, तर हल्लींच्या अडाणी लोकांच्या समजुतीप्रमाणें शिल्पकलादिकांचें ज्ञान हिंदु लोकांस मिळणें अशक्यच समजलें पाहिजे, असे कित्येक लोक समजत असतील. आमचे पंडितमन्य आंग्लविद्याविभूषित तर हिंदुधर्म सर्व सुधारणेस आड येतो, या धर्माचा सत्यानाश करून अठरापगड जाती एक करून जिकडे तिकडे ब्रम्हसमाज स्थापन झाल्यावांचून हिंदु लोकांची लेशमात्रही सुधारणा होणार नहीं, म्हणून रात्रंदिवस दांडोरा पिटीत आहेतच. व हल्लींच्या हिंदु धर्मशास्त्रानभिज्ञ शास्त्री मंडळींची धर्मसंबंधीं, समाजसंबंधीं, मतें व त्यांचे आग्रह वगैरे पाहिले असतां ब्रम्हसमाज, प्रार्थनासमाजवाल्यांचे ह्मणण्यांत बराच तथ्यांश असावा, व हिंदुधर्म व अर्थशास्त्र हे एकमेकांशीं अत्यंत विरुद्ध आहेत, असें पुष्कळांस वाटण्याचा संभव आहे खरा, व पुष्कळांस वाटतेंही; परंतु हिंदु धर्मशास्त्राचें ज्यांनीं सूक्ष्म अवलोकन केलें आहे, त्यांस वरील हिंदुधर्मशा-

स्त्रावरचे आक्षेप वृथा आहेत, व हिंदुधर्माचा, व्यवहार, अर्थशास्त्र व ऐहिक सुख यांशीं बिलकुल विरोध नाहीं, हें सहज कळण्याजोगें आहे. आतां ब्रह्मसमाजवाले म्हणतील, अहो तुम्ही हिंदुधर्माचे कैवारी, या असे पुढें आणि करा आमचें समाधान. तुमच्या शास्त्री मंडळांचे मताप्रमाणें शूद्राकडचें पाणी प्यालें कीं, झाला तो धर्मभ्रष्ट ! हीं जर तुमचीं मतें तर तुम्ही परदेशांत जाणार कसे? व कलाकौशल्यादि विद्या मिळविणार कसे तें आम्हांस सांगा? समाजवाल्यांचा हा प्रश्न सयुक्तिक व योग्य आहे. परंतु त्यांनीं खूप समजून ठेवावें कीं, हिंदु धर्माचा पाया ख्रिस्ती किंवा महंमदी धर्माप्रमाणें एका पुरुषावर नाहीं, हिंदुधर्म ही संज्ञा महाव्यापक आहे. हिंदु धर्मरूपी इमारत इतर धर्मांप्रमाणें एकेक पुरुषावर अवलंबून नाहीं. या इमारतीस शेंकडों ऋषि, मुनि, दर्शनकार, शास्त्रकाररूपी स्तंभाचा आधार असल्याकारणानें तिला फार दार्ढ्य आलें आहे.तात्पर्य समाजवाल्याचें मताप्रमाणें धर्मशास्त्र जरी विरुध्द वाटतें, तरी वास्तविक प्रकार तसा नाहीं. जरी आमचे आचार मूळचे फार कडक आहेत; तरी जसजशा अडचणी आल्या तसतसे त्यांत फेरफार होत गेले आहेत. हिंदुधर्मशास्त्रकार नीतिशास्त्रवेत्ते यांनीं हरतऱ्हेच्या अडचणी पडल्यास त्यांतून कसें पार पडावें याचें योग्य विवेचन करून ठेविलें आहे. ब्राह्मण नदीवर स्नानास गेला, तेथें स्नान झाल्यावर शूद्राचा स्पर्श झाला कीं, तो विटाळ मानितो व पुन्हां स्नान करतो ही गोष्ट खरी; परंतु यामुळें सर्वत्र त्याची अशी समजूत आहे असें मानणें मात्र खोटें होय. असें असतें तर रघुनाथराव पेशव्याचे वतीनें विलायतेस ब्राम्हण कधींही

गेले नसतें राजकारणा संबंधानें एका राजानें दुसऱ्या राजाचा पराभव करून त्या राजाचें राज्य त्यास राज्यभ्रष्ट करून घेतलें असतां, त्या राजानें काय करावें याचाउपाय सांगतांना सांगितलें आहे कीं, त्या राजानें अन्य बलवान् राजाचा आश्रय करून तो बलवान् राजा विधर्मी असल्यास त्याचे धर्माप्रमाणें वागून हरएक तऱ्हेनें त्याच्या हृदयांत शिरून त्याची मर्जी संपादन करावी व त्याचे मदतीनें इष्टकार्य साधावें, मूळ श्लोक.—

" तद्दर्शनोपास्तिकता नित्यं तद्भावभाविता "

त्याचप्रमाणें राजनीति प्रकरणांतही चरांनीं सर्व राष्ट्रांत साधु, बैरागी व धर्मसंबंधीं ढोंग करून परराज्यांतील लोकांची आपल्यावर श्रद्धा उत्पन्न करून त्यांचें सर्व इंगित समजून घेऊन, त्यांची सर्व बातमी आपले राजास द्यावी, वगैरे उपाय सांगितले आहेत. आतां चरांचीं लक्षणें पहातां ते फार धूर्त, हुशार. राजनीतिनिपुण असले पाहिजेत, हें उघडच आहे. आतां हे चर दुसऱ्या राष्ट्रांत मुद्दाम बोलून चालून त्या राष्ट्रांतील लोकांत कोणी शेतकऱ्याच्या मिषानें, कोणी व्यापाऱ्याच्या मिषानें, कोणी साधूच्या, कोणी कांहीं, कोणी कांहीं, सोंगें करून मिसळून तद्रुप होऊन हरएक तऱ्हेनें त्या राष्ट्रांतील बातमी काढण्यास जाणार हें उघडच आहे. आतां अशा कामासाठीं परराष्ट्रांत पाठविलेले चरांचे आचार विचार लेशमात्र तरी रहाण्याचा संभव आहे काय? नाहीं, हें उघडच आहे. कारण जर कां त्या चरानें सोवळें ओवळें किंवा तुझ्या हातचें मी खात नाहीं, किंवा मीं अमकें खात नाहीं, तमकें खात नाहीं म्हटलें कीं, तो पकडला जाईल व त्या विषयीं लगेच सं-

शय येईल, व अशा रीतीतें अलग राहणाऱ्या मनुष्यास (हेरास )पाहिजे तेथील बातमी कशी लागणार? तेव्हां चराचा आचार विचाराचा वगैरे सर्वच शास्त्रार्थ वेगळा हें युक्तिसिद्धच आहे. वर जी तदर्शनोपास्तिकता वगैरे राज्यभ्रष्ट राजांची गोष्ट सांगितली तेथें राज शब्द उपलक्षण होय. एका राष्ट्रांतील लोकांस दुसऱ्या बलाढ्य राष्ट्रानें पादाक्रांत केल्यास पादाक्रान्त झालेल्या राष्ट्राच्या लोकांनीं इतर विधर्मी, असलेल्या बलाढ्य राष्ट्रांत जाऊन, तेथील लोकांप्रमाणें, आचरण करून, त्यांच्या धर्माची उपासना करून, त्यांची मर्जी संपादून, त्यांच्या हृदयांत शिरून, आपलें इष्ट साध्य करावें हाच त्याचा भावार्थ आहे, हें उघड आहे. तात्पर्य जो आमचे राजनीतीचे व मन्वादि स्मृतिकारांचें व हल्लींच्या व्यवहारांचें सूक्ष्म अवलोकन करील, त्याची, हिंदुधर्म, सुधारणेस बिलकुल आड येत नाहीं, अशी खातरी झाल्यावांचून राहणार नाहीं. वर लिहिल्यावरून हिंदुलोकांस ख्रिस्ती किंवा मुसलमान धर्माची उपासना करण्यास हरकत नाहीं, असें आमचें मत आहे, असें कित्येक स्थूलदृष्टि जनांस वाटेल, परंतु तसें आमचें मत मुळींच नाहीं. आमचें एवढेंच म्हणणें कीं, राष्ट्रीय व राजकीय प्रकरण सामान्य प्रकरणापेक्षां अत्यंत भिन्न होय. तेव्हां या प्रकरणांतले शास्त्रार्थ अर्थातच अगदीं भिन्न होत. या राष्ट्रीय प्रकरणांत सामान्य लोक जो धर्म समजतात, तोच धर्म शास्त्रवेत्त्यांचें मतें मोठा अधर्म समजला जातो, व ज्यास सामान्य लोक अधर्म समजतात त्यास नीतिशास्त्रवेत्ते व महान् धर्मशास्त्रवेत्ते धर्म समजतात. मूळ श्लोक

॥ अधर्मतां याति धर्मो यात्यधर्मश्च धर्मताम् ॥

॥ धर्मोऽप्यधर्मतां याति यात्यधर्मश्च धर्मताम् ॥

तस्मादापत्स्वधर्मोऽपि श्रूयते धर्मलक्षणः ॥

महाभारत.

तात्पर्य, हिंदुधर्म, सुधारणेस आड येतो, हें म्हणणें व शिल्पादि ज्ञान यवनांचे देशांत असल्यामुळें हिंदु लोकांस त्यांचे आचार विचाराचे अडचणीमुळें मिळणें अशक्य वगैरे म्हणणें, अज्ञानमूलक आहे हें उघडच आहे. कारण ज्याकाळीं पाश्चात्य लोकांनीं व त्यांच्या इहलोक सुखोत्पादक यंत्रतंत्रादिकलांनीं आम्हांस अगदीं चीत् करून टाकिलें आहे. त्याकाळीं परदेशांत गेल्यास किंवा समुद्रयान केल्यास पतित होतो वगैरे शास्त्रार्थ सांगणें हा सामान्य लोकदृष्ट्या जरी धर्म मानिला जात असेल, तरी मन्वादिस्मृति पुराणें महाभारतादि ग्रंथ यांस अनुसरून विचार करितां अशा कालीं परदेशांत जाऊन हरतऱ्हेनें त्या देशांतील शिल्पादि ज्ञान वगैरे आणणें हें आमचे वैदिकधर्मरक्षणास अत्यंत नाप्राप्त आहे. मनुस्मृतींत ह्मटलें आहेः—

॥ नास्य छिद्रं परो विद्यात् विद्यात् छिद्रं परस्य तु ॥
॥ गूहेत् कूर्म इवांगानि रक्षेत् विवरमात्मनः ॥ मनु ॥

८०७ पान १०९ श्लोक.

राजानें नेहमीं आपले राज्यांतील छिद्रें गुप्त ठेऊन परकीय राज्यांतील सर्व छिद्रें पाहत असावें, आणि कूर्माप्रमाणें आपलीं अंगें गुप्त ठेवून आपल्या छिद्रांचें रक्षण करावें.

आमच्या दौर्भाग्यामुळें भारतीय जनसमूहाचा जो गुरुवर्ग त्यानें आजपर्यंत राष्ट्रसंबंधानें बाह्य देशाची माहिती मिळविण्याविषयीं स्वतः

खटपट केली नाहीं ती नाहींच. परंतु ती मिळवावी असा लोकांस उपदेशही केला नाहीं; इतकेच नव्हें, परंतु हल्लीं अशा प्रकारची माहिती मिळविण्यास कोणी परदेशांत गेल्यास त्याचे कडून हजारो रुपये काढून त्याची त्रेधा उडविण्याचा मात्र त्यांच्या जारी यत्न असतो. तात्पर्य, आमच्या राष्ट्रांचा शिरोभूत गुरुवर्ग आजपर्यंत अनेक कारणांनीं अज्ञानमग्न असल्यामुळें ' नास्य छिद्रं परो विद्यात् आपलें छिद्र दुसऱ्यास कळूं नये. ही गोष्ट तर आमच्या राजेरजवाड्यासंबंधीं किंवा राष्ट्रांसंबधानें आतां कोणीही स्वप्नांत सुद्धा आणूं नये. कारण आमच्या हतभाग्य भारतीयांच्या परम पूज्य मनु, शुक्र, कामदंक भारतादि ग्रंथप्रोक्त राजनीतिप्रमाणें आचरण करणारे आमचे राज्यकर्त्यांनीं आजपर्यंत निदान शेंदीडशें वर्षांत आमचे वेद, शास्त्र, पुराणें, तंत्रें, उपनिषदें, काव्यें, नाटकें, देश, काल, वनस्पति, भूमि, खाणी, धर्म, व्यवहार, आचार, लोकस्वभाव इत्यादि जें कांहीं आमचें ह्मणावयाचें त्या सर्वांचें ज्ञान अव्याहत परिश्रमानें मिळविलें आहे व मिळवीत आहेत. आह्मी मात्र उमरांतील किड्याप्रमाणें आमचे सर्वस्व गेलें तरी आमचीं शास्त्रें रात्रंदिवस आमचे कानांशीं अरे, परदेशाचें ज्ञान मिळवा, म्लेंच्छ शास्त्रकलांचें ज्ञान मिळवा, पृथ्वींतील कोणत्याही कां भांगातून होईना शिल्पज्ञान मिळवा, असें ओरडत असतांही तिकडे दुर्लक्ष करून धर्माधर्माचा वगैरे विलकुल विचार न करितां अज्ञजनचारितमार्गास अनुसरून अजुनहीं जडभरताप्रमाणें समाधिस्थ होऊन व्यवहार चालवीत आहों. तर आतां तरी शास्त्रांचे सूक्ष्मदृष्ट्यां अवलोकन करून प्राचीन धर्मशास्त्रकर्त्यांच्या वचनास मान देऊन परराष्ट्रसंबंधीं ज्ञान मिळविण्यस परमेश्वर आह्मास प्रेरणा करो. अशी जगन्नियंत्या परमेश्वरास प्रार्थना करून हा लेख पुरा करितों.

## परिशिष्ट नंबर १.

### प्राचीन क्षत्रिय राजे समुद्रवलयांकित पृथ्वी जिंकत व पृथ्वीच्या सर्व भागांत फिरून येत असत याविषयीं.

एतेन ह वा ऐन्द्रेण महाभिषेकेण तुरः कावषेयो जनमेजयं पारिक्षितमभिषिषेच तस्माद्उ जनमेजयः पारिक्षितः समंतं सर्वतः पृथ्वीं जयन् परीयाय अश्वेन च मेध्येन ईजे तदेषाभियज्ञगाथा गीयते.

आसं दीवति धान्याकं रुक्मिणं हरितस्त्रजम् ॥
अश्वं बंबंध सारंगं देवेभ्यो जनमेजयः ॥ इति

एतेन ह वा ऐन्द्रेण महाभिषेकेण च्यवनो भार्गवः शार्यातं मानवमभिषिषेच तस्माद्उ शार्यातो मानवः समंतं सर्वतः पृथ्वीं जयन् परीयाय अश्वेन च मेध्येन ईजे देवानां हापिसत्रे गृहपतिरास.

एतेन ह वा ऐन्द्रेण० सोमशुष्मावाजरत्नायनः शतानिकं सात्राजितमभिषिषेच तस्माद्उ शतानिकः सात्राजितः समंतं०

एतेन ह वा० पर्वतनारदौ आंबष्टमभिषिषिचतुः तस्माद्उ युधांश्रौष्ठिरौग्रसैन्यः समंतं सर्वतः०

एतेन वा ऐन्द्रेण० कश्यपो विश्वकर्माणं भौवनमभिषिषेच तस्माद्उ विश्वकर्मा भौवनः समंतं० भूमिर्ह जगावित्युदाहरान्ति न मामर्त्यः कश्चन दातु मर्हति विश्वकर्मन् भौवन मां दिदासिथ निमंक्ष्ये हं सलिलस्य मध्ये मोघस्त एष कश्यपायासंसगरः इति.

एतेन ह वा ऐन्द्रेण० वशिष्टः सुदासंपैजवनमभिषिषेच तस्माद्दु सुदासः पैजवनः समंतं०

एतेन ह वा ऐन्द्रेण० संवर्त आंगिरसोमरुत्तमाविक्षितमभिषिषेच तस्माद्दु मरुत आविक्षितः समंतं सर्वतः० तदप्येष श्लोकोऽभिगीतो 'मरुतः परिवेष्टारो मरुत्तस्या वसन् गृहे ॥ आवीक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवाः सभासद, इति.

एतेन ह वा ऐन्द्रेण० उदमयः आत्रेयोऽगंमभिषिषेच तस्मादु अंगः समंतं सर्वतः०

**भावार्थ**—कवष याचा मुलगा तुर यानें या इंद्रदेवताक महाभिषेकानें परिक्षितीचा मुलगा जनमेजय यांस अभिषेक केला. तदनंतर परिक्षितीचा मुलगा जनमेजय जिंकीत जिंकीत पृथ्वीच्या सर्व भागांत फिरून आला, आणि पवित्र अश्वमेध यज्ञ करिता झाला.

या संबंधानें अशी एक यज्ञगाथा आहे कीं,

सिंहासन घातलेल्या भूमींत जनमेजयानें देवासाठीं एक घोडा बांधिला होता; तो धान्य खात होता. त्याच्या ललाटाला एक भूषण बांधिलें होतें, आणि गळ्यांत पिवळ्या माळा घातल्या होत्या.

याच इन्द्रदेवताक महाभिषेकानें भृगूचा मुलगा च्यवन यानें मनूचा मुलगा शार्यात यास अभिषेक केला. तदनंतर शार्यात जिंकीत जिंकीत पृथ्वीच्या सर्व भागांत फिरून आला, आणि पवित्र अश्वमेधयज्ञ करिता झाला. तो देवाच्या यज्ञांत सुद्धां गृहपति होता.

याचप्रमाणें वाजरत्नाचा मुलगा सोमशुष्म यानें सत्राजिताचा मुलगा शतानीक यांस ऐन्द्र महाभिषेकानें अभिषेक केला. त्याचप्रमाणें पर्वत आणि नारद यां उभयतांनीं अंबष्ठास अभिषेक केला.

त्याचप्रमाणें पर्वत आणि नारद यांनीं उग्रसेनाचा मुलगा युधांश्रौष्टि व काश्यपानें भुवनाचा विश्वकर्मा यास ऐन्द्र महाभिषेक केला. याचप्रमाणें वशिष्ठानें पैजवनाचा मुलगा सुदास यास०

तसेंच अंगिरसाचा मुलगा संवर्त यानें अविक्षितीचा मुलगा मरुत्त यास व अत्रीचा मुलगा उदमय यानें अंग यास अभिषेक केला.

## परिशिष्ट नंबर २.

राजानं च पृथुं वैण्यं मृतं शुश्रुम सृजयम् ॥
यमम्यषिंचन् संभूय महारण्ये महर्षयः ॥ १३७ ॥

श्लो. शां. महाभारत.

ययातिं नाहुषं चैव मृतं शुश्रुम सृंजय॥
य इमां पृथिवीं कृत्स्नां विजित्य सहसागराम् ॥ ९४ ॥
अंबरीषं च नाभागं मृतं शुश्रुम सृंजय ॥
शतं राजसहस्राणि शतं राजशतानि च ॥
सर्वैरश्वमेधैराजानास्तेन्वयुर्दक्षिणायनम् ॥ १०३ ॥
शशिबिन्दुं चैत्ररथं मृतं० सृंजय ॥

यस्य भार्यासहस्त्राणि शतमासन् महात्मनः ॥
गयंचामर्तरयसंमृतं शुश्रुम सृजय ॥
रंतिदेवं च सांकृत्यं मृतं०

महाभारत शांतिपर्व. पान. ६६ अध्याय ९९ मध्यें षोडश रात्रीय आख्यानामध्यें पृथ्वीविजय केलेल्या राजांची संक्षिप्त हकीकत आहे.

पहा. परिशिष्ट. नंबर ३ चे शेवटीं परिशिष्ट. नंबर २ अ.

## परिशिष्ट नंबर ३.

### म्लेच्छ लोकांविषयीं.

मत्स्य पुराण पान १२.

ययाति राजानें शर्मिष्टेचे ठायीं गुप्तपणें संतति उत्पन्न केली, ही वातमी त्याची बायको देवयानी इच्याकडून तिचा बाप शुक्राचार्य यास कळली, तेव्हां त्यानें क्रुद्ध होऊन ययातीस शाप दिला कीं, " याबद्दल तूं जरेनें व्याप्त होशील " नंतर त्यानें पुष्कळ आर्जव केल्यावर बरें तर, मी शाप दिला तो माघारा फिरणारा नव्हे, परंतु तुला त्या जरेचें अन्याला संक्रमण करितां येईल.

तेव्हां त्यानें आपला वडील पुत्र, यदु यास तिचें ग्रहण करून स्वतःस यौवन देण्यास सांगितलें; तें त्यानें नाकारिलें. नंतर तुर्वला तीच गोष्ट विचारिली त्यानेंहि नकारच सांगितला, त्यावरून क्रुद्ध होऊन त्यास शाप दिला कीं, ज्याअर्थीं तूं माझे हृदयापासून उत्पन्न होऊन मला तारुण्य देत नाहींस. त्या अर्थीं—

## परिशिष्ट नंबर २ अ. परिशिष्ट नंबर २ ब.

संकीर्णश्चौरधर्मेषु प्रतिलोमचरेषु च ॥
पिशिताशिषु लोकेषु नूनं राजा भविष्यसि॥
गुरुदारप्रसक्तेषु तिर्यग्योनिरतेषु च ॥
पशुधर्मेषु म्लेंच्छेषु प्रभविष्यसि ॥
१२४ पा नं १४ श्लो. मत्स्यपुराण.

चौरधर्माचरण करणारे, प्रतिलोमजातींत फिरणारे, मांस भक्षण करणारे, असे जे लोक तेथें तू राजा होशील; तसेंच गुरुस्त्रीशीं गमन करणारे, पशुपक्ष्यांशीं रत आणि पशूंचा धर्म पाळणारे जे म्लेंच्छ लोक त्यांच्यावर तूं अंमल करशील. १२४ पान. १४ श्लो. मत्स्यपुराण.

## परिशिष्ट नंबर २ क.

### ब्राम्हण लोक समुद्रांत नावेंत बसून फिरत याविषयीं.

मं७ वर्ग २९ सूक्त ८८ ऋचा ४.

**वशिष्ठं ह वरुणो नाव्याधात्**
**ऋषिं चकार स्वपा महोभिः**
**स्तोतारं विप्रः सुदिनत्वे अन्हाम्**
**यान्नुद्यावस्ततनन्यादुषासः ॥ ४**

एवं वशिष्टेनात्मनोक्ते यवरुणेन कृतं तद्दर्शयति वशिष्टं ही वशिष्टं खलु वरुणो नाविस्वकीयायाद् अधात् आरोहयत् तथा तं ऋषिं अवोभिःरक्षणैःस्वपां स्वपसंशोभनकर्माणं चकार वरुणः कृतवान् इत्यादि.

तेव्हां वरुणानें वशिष्ठाला नावेंत बसविलें होते. आणि इत्यादि–

**वशिष्ट व वरुण समुद्रामध्यें नावेंत बसले याविषयीं**

मं ७ वर्ग २५ सू ८८.

आयद्रुहाव वरुणश्च नावम् ।
प्रयत् समुद्रमीरयाव मध्यम् ॥
अधियपां स्नुभिश्चराव ।
प्रप्रेंख इंखयावहै शुभेकम्. ॥ ३ ॥

**भाष्य.** यत् यदा वरुणं प्रसन्ने सति अहं वरुणश्च उभौ नावं द्रुममयीं तरणसाधनभूतां आरुहाव उभौ आरूढौ वभूविव. तां च नावं यत् यदा समुद्रं मध्यं समुद्रस्य मध्यं प्रति प्र ईरयाव प्रकर्षेण गमयाव- यत् यदा च अपां उदकानां अधि उपरि स्नुभिः गन्त्रीभिः अन्याभिरपि नौभिश्चराव वर्तावहै तदानीं शुभे शोभार्थं प्रेंखे नौरूपायां दोलायामेव प्रईखयावहै निम्नोन्नतैस्तरंगैःइतश्चेतश्च प्रविचलन्तौ संक्रीडावहै कं सुखं यथा भवति तथा.

वशिष्ट ह्मणतो—ज्या वेळेस मी वरुणासह नावेंत बसलों आणि आह्मी तिला समुद्राच्या मध्य भागीं ढकलिलें, आणि जेव्हां समुद्राच्या उसळणाऱ्या लाटांवर आह्मी चाललों, तेव्हां आह्मी मजेनें झोपाळ्यावर बसल्या सारखें सुख पावलों.

**समुद्रांतील नावें संबंधीं.**

अपां मध्ये तस्थिवांसंतृष्णाविदत् जरितारम्-
मृळासुक्षत्र मृळय

मंडळ ७ सूक्त ८९ ऋचा ४.

अपां समुद्रोदकानां मध्ये तस्थिवांसं स्थितवन्तामपि जरितारं तव स्तोतारं मां तृष्णा पिपासा अविन्दत् प्राप्तवती ॥ लवणोत्कटस्य समुद्रजलस्य पाना नर्हत्वात्। अतः तादृशं मां मृळय सुखय. पान २१८.

वशिष्ट व वरुण नावेंत असले त्या ऋचा मंडळ ७ वर्ग २५

सू. ८८ ऋचा ३

आयत् रुहाव वरुणश्च नावम्. ॥ ३

वशिष्ठं ह वरुणो नाव्या ऽधात् ॥ . ४

समुद्राच्या उदकामध्यें राहिलेला मी तुझें स्तोत्र करीत असतांना मला तृषा लागली इत्यादि; हे ईश्वरा, मजवर दया करा, वरील ऋचांवरून वेदकालीं ऋषिजन बेधडक समुद्रांतून नावांत बसून फिरत हे निर्विवाद सिद्ध होतें. ऋग्वेदामध्यें समुद्राचा व नावेचा उल्लेख पुष्कळ ठिकाणीं आहे; पैकीं समुद्राचा फारच ठिकाणीं आहे. ह्मणून नुसत्या नावेचा निदान ठळक ठळक ठिकाणच्या उपयोगाचें तारण देतों तें असें—

१–५५–२ । १–१८–२९    १–२५–७ । १–४६–७
१–४७–८ । १–९९–१    १–१३१–२ । २– ३९–४.
५–५४–४ । ५–५९–५    ८–४२–३ । ९–७०–१०

कृष्ण यजुर्वेदांत २३१–१ मध्यें नावचा उल्लेख आहे. भुज्याच्या प्रवासाच्या संबंधाचा उल्लेख ऋग्वेदांत—

१–११७–१४. १–११२–५. १–१५८–७. ७–६८–७. १०–१४३–५ इत्यादि ठिकाणीं आहे. त्यांवरून ब्राह्मण नावेंत बसून समुद्रांतून फिरत असत हें स्पष्ट आहे.

## परिशिष्ट नंबर ४. ५.

### राजसूय यज्ञास आलेले राजे.

प्राग् ज्योतिपश्च नृपतिः भगदत्तो महारथः ।
स तु सर्वैः सह म्लेच्छैः सागरानूपवासिभिः ॥
पार्वतीयाश्च राजानः राजा चैव बृहद्बलः ।
बाल्हीकाश्चापरे शूराः राजानः सर्व एव ते ॥

प्राग् ज्योतिष देशाचा राजा, महारथ, भगदत्त, समुद्र आणि समुद्रांतील बेटें वगैरे मध्यें राहणारे सर्व म्लेंच्छ राजे, पर्वतावरचे राजे, बृहद्बल, बाल्हीक देशाचा राजा आणि याचप्रमाणें दुसरे सर्व शूर राजे हे सर्व राजसूय यज्ञास आले होत.

अर्थशास्त्रं कामशास्त्रं तथा शिल्पमलंकृतिः ॥
काव्यानि देशभाषाश्चावसरोक्तिर्यावन मतम् ॥

शुक्रनीति.

अर्थशास्त्र, कामशास्त्र, शिल्प, अलंकार काव्यें, देशभाषा, अवसरोक्ति आणि यावन मत. यांचा अभ्यास करावा.

शुक्रनीति.

# परिशिष्ट नंबर ६.

## म्लेंच्छ व यवन यांचे उत्पत्तीविषयी.

इत्युक्तस्तु तया राम वशिष्टस्तु महायशाः ॥
सृजस्वेति तदोवाच बलं परबलार्दनम् ॥रामा. १०९ पान १७ श्लो.
तस्य तद्वचनं श्रुत्वा सुरभिरसृजत्तदा ॥
तस्याहुंकारवोत्सृष्टाः पल्हवाः शतकोटिशः ॥
नाशयान्ति बलं सर्वं विश्वामित्रस्य पश्यतः ॥
स राजा परमः क्रुद्धः क्रोधविस्फारितेक्षणः॥ १९ ॥
पल्हवान् नाशयामास अस्त्रैरुच्चावचैरपि ॥
विश्वामित्रार्दितान् दृष्ट्वा पल्हवान् शतशस्तदा ॥ २० ॥
भूय एवासृजत् घोरान् शकान् यवनामिश्रितान् ॥
तैरासीत् संवृता भूमिः शकैर्यवनमिश्रितैः ॥ २१ ॥
ततोऽस्त्राणि महातेजा विश्वामित्रो मुमोच ह ॥
तैस्ते यवनकांबोजा बर्बराश्चाकुली कृताः ॥ २४ ॥
ततस्तानाकुलान् दृष्ट्वा विश्वामित्रास्त्रमोहितान् ॥
वशिष्टश्चोदायामास कामधुक् सृजयोगतः ॥
तस्याहुंकारतो जाता कांबोजा रविसंनिभाः॥
उधसश्चाथ संभूता बर्बराः शस्त्रपाणयः ॥
योनिदेशाच्चयवनाः शकृद्देशात् शका स्मृताः॥
रोमकूपेष म्लेच्छाश्च हारीताः सकिरातकाः॥

तैस्तन्निषूदितं सर्वं विश्वामि  त तरः गात्॥
सपदातिगजं साश्वं सरथं र  ॥

राम. ग पा. ११० श्लो. ४.

कामधेनूनें असें भाषण केल्याबरोबर, महातपस्वी असा वशिष्ट कामधेनूला म्हणाला कीं, शत्रूचा नाश करणारें बल उत्पन्न कर.

वशिष्टाचें भाषण ऐकून धेनूनें सैन्य उत्पन्न केलें. तिच्या हुंकारानें शतश, पल्हव उत्पन्न झाले. त्यांनी क्षणामध्यें विश्वामित्राच्या सैन्याचा फडशा उडविला. विश्वामित्र अतिशय रागावला. त्यानें अस्त्राच्या योगानें पल्हवांचा नाश केला.

नंतर कामधेनूनें यवन आणि शक उत्पन्न केले. त्यांच्यावर विश्वामित्रानें बाण सोडिले. त्यायोगेंकरून ते यवन, कांबोज, बर्बर त्रासून गेले. यवनादिक त्रस्त झाले पाहून वशिष्टानें कामधेनूस पुनः फौज निर्माण करण्यास विनंति केली, तिच्या हुंकारापासून सूर्या सारखे कांबोज निर्माण झाले, तिच्या कासेपासून शस्त्रधारी बर्बरनि झाले. योनिप्रदेशापासून यवन आणि शकृतापासून शक झाले. रोमकूपापासून म्लेंच्छ, हारीत आणि किरात उत्पन्न झाले त्यांनीं ते सर्व विश्वामित्राचे सैन्य नष्ट करून टाकिलें.

रामायण पान ११०।४

## परिशिष्ट नंबर ७.

### पृथ्वीवरील अनेक द्विपांत भगवान नारायण एकच रूपानें रहातो याविषयीं.

नवमु अपि वर्षेषु भगवान् नारायणो महापुरुषः ॥

पुरुषाणां तदनुग्रहाय आत्मतत्त्व व्यूहेन आत्मना अद्यापि सान्निधीयते. भागवत पान २३ स्कंध ५

हरिवर्षे भगवान् नरहरिरूपेण आस्ते.

केतुमालेऽपि भगवान् कामदेवस्वरूपेण रमां रमयन् इन्द्रियाणि रमयते.

रम्यके च भगवतः प्रियतमं मात्स्यं अवतारखरूपं तद्वर्षपुरुषस्य मनोः प्राक् प्रदर्शितम्.

हिरण्मयेऽपि भगवान् निवसति कूर्मतनुं बिभ्राणः उत्तरेषु च कुरुषु भगवान् यज्ञपुरुषः कृतवराहरूपः आस्ते.

किंपुरुषे वर्षे भगवन्तं आदिपुरुषं लक्ष्मणाग्रजं सीताभिरामं रामं तच्चरणसन्निकर्षाभिरतः परमभागवतः हनुमान् सह किंपुरुषैः अविरतभक्तिः उपास्ते.

भारतेऽपि वर्षे भगवान् नरनारायणाख्यः आत्मवतां अनुग्रहाय अव्यक्तगतिश्चरति. स्कधं ५ पान २६.

शाल्मलः सुरोदेन आवृतः तद्द्वीपाधिपतिः प्रियव्रतात्मजः यज्ञबाहुः स्वसुतेभ्यः सप्तभ्यः तन्नामानि सप्त वर्षाणि व्यभजत्, सुरोचनम्, सौमनस्यम्, रमणकम्, देववर्ष, पारिभद्रम्, आप्यायनम्, अविज्ञातम्.

एवं घृतोदेन आवृतः कुशद्वीपः तद्द्वीपपतिः प्रैयव्रतो हिरण्यरेता नाम स्वं द्वीपं सप्तभ्यःस्वपुत्रेभ्यः यथाविभागं विभज्य स्वयं तपः

आतिष्टत. वसु वसुदानंदढरुचिनाभिगुप्तस्तुल्यव्रतिविवक्तवामेदवनामभ्यः कुशद्वीपौकसः रूपिणं जातवेदसं यजन्ते.

क्रौंचद्वीपः क्षीरोदेन आवृतः यस्मिन्नपि प्रैयव्रतो घृतपृष्ठो नाम अधिपतिः स्वे द्वीपे वर्षाणि सप्त विभज्य तेषु पुत्रनाम सुसप्तरिक्थादान् वर्षपान् निवेश्य स्वयं भगवान् भगवतः परमकल्याणयशसः आत्मभूतस्य हरेः चरणारविंदं उपजगामः आमो मधुरुहो मेघपृष्टः सुधामा भ्राजिष्ठो लोहितार्णो वनस्पतिरिति घृतवृष्ठसुताः तत्र आपोमयं देवं अपा पूर्णेन अंजलिना यजन्ते पुरस्तात् क्षीरोदात् शाकद्वीपः तस्यापि प्रैयव्रत एव अधिपतिः नाम्ना मेधातिथिः तत्र वाय्वात्मकं भगवन्तं आराधयन्ति दधिमंडोदात् परः पुष्करद्वीपः तस्याधिपतिः प्रैयव्रतो वीतिहोत्रो नाम. तद्वर्षपुरुषा ब्रह्मरूपिणमाराधयति.

भाषांतराचा सारांश मुळांत दिला आहे.

## परिशिष्ट नंबर ८.

महाभारत शांतिपर्व अध्याय २९ पान ६६.
सगरं च महात्मानं मृतं शुश्रूम सृंजय ॥
खानयामास यः कोपात् पृथ्वीं सागरांकिताम् ॥
यस्य नाम्ना समुद्रश्च सागरत्वमुपागतः ॥१३९.॥

हे सृंजया, महात्मा सगर मृत झाला असे एकितों; ज्यानें कोपानें सागरांकित पृथ्वी खणून काढिली, फार तर काय पण ज्याचे नांवानें आज समुद्र सागरत्वातें प्राप्त झाला.

# परिशिष्ट नंबर.९

## म्लेंच्छ हे क्षत्रिय व वैदिकधर्मी होते या विषयीं.

बाहु राजाला हैहयतालजंघानें जिंकल्या नंतर तो आपल्या राणीसह रानांत शिरला; त्यावेळीं त्याची राणी गर्भवती होती. तिनें प्रसूत होऊं नये. म्हणून त्यानें तिला औषध दिलें होतें; त्यायोगें तो गर्भ ७ वर्षें पोटांतच होता. तो बाहु राजा और्व ऋषीच्या आश्रमाजवळ मृत्यु पावला, तेव्हां त्याची राणी सती जाण्यास तयार झाली, तेव्हां भूत भविष्य जाणणारे और्व ऋषींनीं राणीस सांगितलें; हे राणी, तुझे उदरामध्यें अतिशय वीर्यवान्, पराक्रमी, मोठ मोठे यज्ञ करणारा, शत्रुपक्षाचा क्षय करणारा, आणि अखिलमंडलाचें राज्य करणारा. असा पुत्र होणार आहे. सबब प्राण देऊ नको. हें ऋषींचें म्हणणें त्या राणीनें मान्य केलें. ऋषीनें तिला आपल्या आश्रमांत नेलें तेथें कांहीं दिवसांनीं त्या राणीला मुलगा झाला. ऋषीनें त्याचें नांव सगर असें ठेविलें आणि त्याला धनुर्वेदविद्या, संपूर्ण शास्त्रं आणि भार्गवाख्य आग्नेय अस्त्र शिकवून ठेविलें.

मुलगा मोठा झाला तेव्हां त्यानें आईला विचारलें आई, माझ्या बापाचें नांव काय? असा मुलाचा प्रश्न ऐकून आईनें सर्व हकीकत सांगितली, ती ऐकून आपल्या वडिलांचें राज्यहरण करणारांवर तो अतिशय संतापला आणि त्यानें हैहय आणि तालजंघयांस ठार मारीन अशी प्रतिज्ञा केली. त्याप्रमाणें त्यानें हैहयांना ठार केलें; शक, यवन, कांबोज, पारद, पह्लव यांचा पराभव करून त्यांचा तो वध करू

लागला, तेव्हां ते कुलगुरु वशिष्टास शरण गेले. वसिष्टानें सांगितलें सगरा, हे जीवंत असून मेल्यासारखेच आहेत, यांना आतां कशाला मारितोस? मी तुझी प्रतिज्ञा खरी करण्यास्तव यांच्याकडून क्षात्रधर्माचा परित्याग करून ब्राह्मणांचा व त्यांचा सहवास तोडून टाकिला आहे. नंतर सगरानें गुरूच्या शब्दास मान देऊन त्यांचे वेश व चिन्हें मात्र बदलून टाकिलीं आणि ( यवनान् मुंडितशिरसः अर्धमुंडान् शकान् प्रलंबकेशान् पारदान्, पल्हवांश्चश्मश्रुधरान्, निःस्वाधायवषट्कारान्. एतानन्यांश्च क्षत्रियांश्चकार. ते च निजधर्मं परित्यक्त्वा ब्राह्मणैश्च परित्यक्ताः म्लेंच्छतां ययुः ॥ )

विष्णु पुराण. ४९४ पान

त्यानें यवनांना डोक्यांचीं मुंडनें करण्यास सांगितलीं. शकांना अर्धी मुंडनें सांगितलीं, पारदांना केंस लांब ठेवण्यास सांगितलें, पल्हवांना दाढ्या वाढविण्यांस सांगितल्या. त्याचप्रमाणें त्यांना व दुसऱ्यांना त्यांनीं स्वाध्याय व षट्कार करू नयेत असें ठरविलें. ते धर्मभ्रष्ट झाले असें पाहून ब्राह्मणांनींही त्यांना सोडलें, तेव्हांपासून ते म्लेंच्छवाच्य लोक झाले.

पान ४९५ विष्णु पुराण.

## परिशिष्ट नंबर ९ अ.

यदोस्तु यादवा जाताः तुर्वसोर्यवनाःसुताः ॥

द्रुह्यस्य तु सुता भोजा अनोस्तु म्लेंच्छजातयः ॥

यदूपासून यादव, तुर्वसूपासून यवन द्रुह्यापासून भोज आणि अनूपासून म्लेंच्छ झाले.

मत्स्य पु. पा. १२८ श्लो. ३०

यत्तु भारते राजधर्मेषु—

यवनाःकिराता गांधाराश्चीनाःशबरबर्बराः ।
शकास्तुषाराः कंकाश्च पल्हवाश्चैव मद्रकाः ॥
ब्रह्मक्षेत्रे प्रसूताश्च वैश्याः शूद्राश्च मानवाः ॥
कथं धर्मांश्चरिष्यन्ति सर्वे विषयवासिनः ॥
वेदधर्मक्रियाश्चैव तेषां धर्मो विधीयते ।
पितृयज्ञास्तथाकूपाः प्रपाश्च शयनानि च ॥
दानानि च यथाकालं द्विजेभ्यो विसृजेत् सदा ॥
दक्षिणा सर्वयज्ञानां दातव्या भूतिमिच्छता ॥
पाकयज्ञा महार्हाश्च कर्तव्याः सर्वदस्युभिः ॥
शनकैस्तु क्रियालोपादिमाः क्षत्रियजातयः ॥
वृषलत्वं गता लोके ब्राह्मणादर्शनेन च ॥

मनु ४८८ पान.

पौंड्रकाश्चौंड्रद्रविडाः कांबोजा यवनाः शकाः ॥
पारदापह्लवाश्चीनाः किराता दरदाः खशाः ॥
मुखबाहूरुपज्जानां या लोके जातयो बहिः ॥
म्लेंच्छवाचश्चार्यवाचःसर्वे ते दस्यवः स्मृताः ॥

यवन म्लेंच्छ वगैरेस आपण अत्यंत परकीय समजतों, व त्यांना वैदिकधर्मीय वेदबाह्य मानितात, परंतु ते वेदबाह्य नव्हेत, त्यांनीं वैदिक धर्माचें आचरण करावें, व ब्राह्मणांना दानें वगैरे द्यावीत, इत्यादि विधि महाभारतांतूनच नव्हे, पण अगदीं अर्वाचीन व खडतर जुन्या मताचा आधार जो निर्णयसिंधु त्यांतही वरील श्लोक सांपडतात.

महाभारतांत राधजर्म प्रकरणांत ह्मटलें आहे कीं, यवन, किरात, गांधार, चीन, शबर, बर्बर, शक, तुखार, कंक, पल्हव, मद्रक, वगैरे लोक, ब्रह्मक्षेत्रांत उत्पन्न झालेले, सर्व देशांत राहणारे वैश्य, शूद्र वगैरे यांनीं धर्माचें आचरण कसें करावें? उत्तर, त्यांनीं वेदधर्मक्रिया कराव्यात, पितृयज्ञ, कूप, आराम, पाणपोई, शयन इत्यादि दानें ब्राह्मणांना द्यावींत. व संपत्ति इच्छिणारानें सर्व यज्ञांची दक्षिणा द्यावी. व सर्व दस्यु जनांनीं मोठ्या मूल्याचे पाकयज्ञ करावे ते—

निर्णय सिंधु.

हळूहळू क्रियालोप झाल्यामुळें या क्षत्रिय जाती ब्राह्मणांचा सहवास नमल्या कारणानें शूद्रत्वाप्रत पावल्या. मनु ४८८ पान.

पौंड्रक, औंड्र, द्रविड, कांबोज, यवन, शक, पल्हव, पारद, चीन, किरात, दरद, आणि वर्णत्रयापासून झालेल्या ज्या म्लेंच्छ आणि आर्य जाति ते सर्व दस्यु समजावेत.

# परिशिष्ट नंबर १०.

## सर्वथा शरीराचें रक्षण करावें यासंबंधीं.

शंखस्मृति ३७२ पान.

सतो हि जीवतो जीवं सर्वपापमपोहति ।
व्रतैः कृच्छ्रैस्तथा दानैरित्याह भगवान् यमः ॥
शरीरं धर्मसर्वस्वं रक्षणीयं प्रयत्नतः ।
शरीराच्च्यवते धर्मः पर्वतात्सलिलं यथा ॥

महाभारत. शांतिपर्व. ३४३ पान. श्लो. ६१

येन येन विशेषेण कर्मणा येन केनचित्
अभ्युज्जीवेत् साद्यमानः समर्थो धर्ममाचरेत् ॥ ६२ ॥
यथा यथैव जीवेद्धि तत्कर्तव्यमहेलया ॥
जीवितं मरणात् श्रेयः जीवन् धर्ममवाप्नुयात् ॥ ६३ ॥
जीवन् धर्मं चरिष्यामि × × × ॥
सोहं जीवितमाकांक्षन्अभक्ष्यस्यापि भक्षणम् ॥
व्यवस्ये बुद्धिपूर्वं हि तद्भवाननुमन्यताम् ॥ ६४ ॥
जीवन् धर्मं चरिष्यामि प्रणोत्स्याप्यशुभानिवा ॥
तपोभिर्विद्यया चैव ज्योतिष्यैवमहत्तम ।
अगस्त्येनासुरो जग्धो वातापिः क्षुधितेन वै ॥
अहमापद्गतः क्षुत्तोभक्षयिष्ये श्वजाघनीं ॥

## सर्वथा शरीराचें रक्षण करावें याविषयीं.

शांकरभाष्य अ. ३. पाद ४. १०१४ सूत्र २८.

सर्वान्नानुमतिश्च प्राणात्यये तद्दर्शनात्

प्राणसंवादे श्रूयते छंदोगानां न ह वा एवंविदि किंच नानन्नं भवति तथा वाजसनेयिनां न ह वा अस्य अनन्नं जग्धं भवति नानन्नं प्रतिगृण्हीत इति सर्वमस्यादनीयमेव भवतीत्यर्थः किमिदं सर्वान्नानुज्ञानं शमादिवद् विद्यांगं विधीयते उतस्तुत्यर्थं संकीर्त्यते इति संशये विधिरिति तावत् प्राप्तम् तथाहि प्रवृत्तिविशेषकरः उपदेशो भवति अतः प्राणविद्यासंन्निधानात् तदंगत्वेन इयं नियमनिवृत्तिरुपदिश्यते.

एतदुक्तं भवति प्राणात्यये एवहि परस्यां आपदि सर्वमन्नमदनीयत्वेन अभ्यनुज्ञायते तद्दर्शनात् तथाहि श्रुतिः चाक्रायणस्य ऋषेः कष्टाया मवस्थायामभक्ष्यभक्षणे प्रवृतिं दर्शयति मटचीहतेषु कुरुषु इत्यस्मिन् ब्राह्मणे चाक्रायणः किल ऋषिः आपद्गतः इभ्येन स्वामिखादितान् कुल्माषान् चखाद अनुपानं तु तदीयमुच्छिष्टदोषात् प्रत्याचचक्षे कारणं चात्रोवाच नवा अजीविष्येमिमानखादन् इति कामो म उदपान इति च पुनश्चोत्तरेद्युस्तानेव स्वपरोच्छिष्टपर्युषितान् कुल्माषान् भक्षयां बभूव इति. तदेतत् उच्छिष्टोच्छिष्टपर्युषितभक्षणं दर्शयन्त्या श्रुतेराशया. तिशयो लक्ष्यते प्राणात्ययप्रसंगे प्राणसंधारणाय अभक्ष्यमपि भक्षयितव्यमिति स्वस्थायां तु तन्न कर्तव्यं विद्यावतापित्यनुपानप्रत्याख्यानात् गम्यते तस्मात् अर्थवादो न ह वा एवं विदि. अपिच स्मर्यते.

अपि च आपदि सर्वान्नभक्षणमपि स्मर्यते विदुषः अविदुषश्चाविशेषेण.

जीवितात्ययमापन्नो योऽन्नमत्ति यतस्ततः ॥<br>
लिप्यते न स पापेन पद्मपत्रमिवांभसा ॥

१०१८ सूत्र ३० शांकरभाष्य अ ३. पा. ४.

**सर्वथा शरीराचें रक्षण करावें याविषयीं.**

**मनुष्याचा जीव राहील तर पुढें नानातऱ्हेच्या व्रतांनीं,**

कृच्छ्रांनीं, किंवा दानांनीं सर्व पापें दूर करितां येतील; असें भगवान् यम बोलला.

शरीर हें धर्माचें सर्वस्व होय. म्हणजे शरीराचें जें रक्षण तें धर्माचें रक्षणें; त्याचें प्रयत्नेंकरून रक्षण करावें. पर्वतापासून जसें पाणी खालीं पडतें, त्याप्रमाणें शरीरापासून धर्म उत्पन्न होतो. पाण्याचा अधार जसा पर्वतो तसा धर्माचा आधार शरिर होय. शंखस्मृति ३७२ पान.

अडचणींत असले म्हणजे ज्या कोणतेही विशेष उपायानें जीवन होईल, त्या रीतीनें यत्न करावा. आणि पुढें शक्ति आली म्हणजे धर्माचें आचरणं करावें.

महाभारत. शां. ३४३ पान ६१.

हयगय न करितां, हरएक तऱ्हेनें प्राणाचें रक्षण करावें. मरणापेक्षां जगणं विशेष श्रेयस्कर होय. कारण जगल्यावर हरएक दुखें भोगून धर्म संपादन करितां येतो.

भा. शां. ३४३ । ६३.

म्हणून मी जीविताची इच्छा करून अभक्ष्याचें सुद्धां भक्षण करितों, तें अज्ञानानें करितां, असें नव्हें; बुद्धिपूर्वक करितों याला तूं संमति दे.

माझे प्राण वाचले तर मी धर्माचें आचरण करीन, आणि तपश्चर्या व विद्या यांचे योगानें अशुभकर्म नाहीसें करीन.

**अगस्त्यानें भूक लागली, तेव्हां वातापि राक्षस खाऊन टाकला. मी आतां भूकेनें संकटांत पडलों आहे तर श्वजंघा आण म्हणजे तिचें सेवन करीन.**

### प्राणात्ययाची वेळ आली असतां सर्वांपासून अन्न ग्रहण करावें. ( कारण असें श्रुतींत उदाहरण सापडतें म्हणून )

कुरु देशामध्यें चाक्रायण नांवाचा ऋषि संकटांत पडला होता. तेव्हां त्यानें महातानें खाल्लेले उष्टे चणे खाल्ले; पण पाणी मात्र उष्टे होतें, ह्मणून प्याला नाहीं. चणे मात्र उष्टे खाल्ले, आणि उष्टं पाणी कां प्याला नाहींस ? ह्मणून विचारिलें. तेव्हां तो ह्मणाला जर चणे खाल्ले नसते तर मी जिवंत राहिलों नसतों; परंतु पाण्यावांचून मी मरणार नाहीं. दुसरें दिवशीं त्याचप्रमाणें त्यानें ते उच्छिष्ट चणे खाल्ले. या अर्थाची जी श्रुति आहे; तिचें तात्पर्य असें कीं, प्राणात्यय प्रसंग आला असतां, अभक्ष्सुद्धां भक्षण करावें. प्रकृति स्वस्थ असली तर मात्र कधींहीं अभक्ष्यभक्षण करूं नये. हें तेथीलच अनुनांवाच्या प्रत्याख्यानावरून कळतें. शिवाय असेंही सांपडतें कीं, आपत्तिमध्यें विद्वान् आणि अविद्वान् या दोघांना सारखेंच कोणीही कां असेनात, अभक्ष्यभक्षण दोषरहित आहे.

जीविताचा नाश होण्याची वेळ आली असतां, कोठून कां होईना, जो अन्न भक्षण करितो त्याला कमळाच्या पानाला जसें पाणी लागत नाहीं तसें (त्या मनुष्याला) पाप लागत नाहीं.

शारीर भाष्य. १०१८ पान. अ. ३ पा. ४ सूत्र ३०.

## परिशिष्ट नंबर ११.

**युधिष्ठिर उवाच**—महाभारत. पान ३४१ शांतिपर्व. अ० १४१

हीने परमके धर्मे सर्वलोकाभिलंघिते ॥
अधर्मे धर्मतां नीते धर्मेचाधर्मतांगते ॥ १ ॥
मर्यादासु विनष्टासु क्षुभिते धर्मनिश्चये ॥
राजभिः पीडिते लोके परैर्वापि विशांपते ॥ २ ॥
सर्वाश्रमेषु मूढेषु कर्मसूपहतेषु च ॥
कामाल्लोभाच्च मोहाच्च भयं पश्यत्सुभारत ॥ ३ ॥
अविश्वस्तेषु सर्वेषु नित्यं भूतेषु पार्थिव ॥
निकृत्या हन्यमानेषु वंचयत्सु परस्परम् ॥ ४ ॥
संप्रदीप्तेषु देशेषु ब्राह्मणे चातिपीडिते ॥
अवर्षति च पर्जन्ये मिथोभेदे समुत्थिते ॥ ५ ॥
सर्वस्मिन्दस्युसाद्भूते पृथिव्यामुपजीवने ॥
केनस्विद् ब्राह्मणो जीवेद् जघन्ये काल आगते ॥ ६ ॥
अतितिक्षुः पुत्रपौत्रान् अनुक्रोशान्नराधिप ॥
कथमापत्सु वर्तेत तन्मे ब्रूहि पितामह ॥ ७ ॥

कथं च राजा वर्तेत लोके कलुषतांगते ॥
कथमर्थश्च धर्मश्च न हीयेत परंतप ॥ ८ ॥

भीष्म उवाच—

राजमूला महाबाहो योगक्षेमसमृद्धयः ॥
प्रजासु व्याधयश्चैव मरणं च भयानि च ॥ ९ ॥
कृतत्रेताद्वापरं च कलिश्च भरतर्षभ ॥
राजमूला इति मतिः मम नास्त्यत्र संशयः ॥ १० ॥
तस्मिंस्त्वभ्यागते काले प्रजानां दोषकारके ॥
विज्ञानबलमास्थाय जीवितव्यं भवेत्सदा ॥ ११ ॥
अत्राप्युदाहरन्तीममितिहासपुरातनम् ॥
विश्वामित्रस्य संवादं चाण्डालस्य च पक्कणे ॥ १२ ॥
त्रेताद्वापरयोःसंधौ तदादैवविधिक्रमात् ॥
अनावृष्टिरभूद्घोरा लोके द्वादशवार्षिकी ॥ १३ ॥
प्रजानामतिवृद्धानां युगान्ते समुपस्थिते ॥
त्रेतापिमोक्षसमये द्वापरे प्रतिवादने ॥ १४ ॥
नववर्षसहस्राक्षः प्रतिलोमो ऽभवद्गुरुः ॥
नावश्यायो ऽपि तत्राभूत् कुत एवाभ्रराजयः ॥
नद्यःसंक्षिप्ततोयौधाःकिंचिदन्तगतास्ततः ॥ १६ ॥
सरांसि परितश्चैव कूपाः प्रस्रवणानि च ॥
हतत्विषो न लक्ष्यन्ते निसर्गाद्दैवकारितात् ॥ १७ ॥
उपशुष्कजलस्थाया विनिवृत्तसमाप्रपा ॥
निवृत्तयज्ञस्वाध्याया निर्वषट्कारमंगला ॥ १८ ॥

उच्छिन्नकृषिगोरक्षा निवृत्तविपणापणा ॥
निवृत्तयूपसंभारा विप्रनष्टमहोत्सवा ॥ १९ ॥
अस्थिसंचयसंकीर्णा महाभूता रवाकुला ॥
शून्यभूयिष्ठनगरा दग्धग्रामनिवेशना ॥ २० ॥
क्वचित्चोरैः क्वचिच्छस्त्रैः क्वचिद्राजभिरातुरैः ॥
परस्परभयाच्चैव शून्यभूयिष्ठनिर्जना ॥ २१ ॥
गतदैवतसंस्थाना वृद्धलोकानिराकृता ॥
गोऽजमहिषीहीना परस्परपराहता ॥ २२ ॥
हतविप्राहतारक्षा प्रनष्टौषधिसंचया ॥
सर्वभूततमप्राया बभूव वसुधा तदा ॥ २३ ॥
तास्मिन् प्रतिभये काले क्षते धर्मे युधिष्ठिर ॥
बभ्रमु क्षुधितामर्त्या खादमानाःपरस्परम् ॥ २४ ॥
ऋषयो नियमांस्त्यक्त्वा परित्यज्याग्निदेवता ॥
आश्रमान् संपरित्यज्य पर्यधावानितस्ततः ॥ २५ ॥
विश्वामित्रो ऽथभगवान् महर्षिरनिकेतनः ॥
क्षुधापरिगतो धीमान् समंतात् पर्यधावत ॥ २६ ॥
त्यक्त्वा दारांश्च पुत्रांश्च कस्मिंश्चित् जनसंसदि ॥
भैक्ष्याभक्ष्यसमो भूत्वा निरग्निरनिकेतनः ॥ २७ ॥
सकदाचित् परिपतन् श्वपचानां निवेशनम् ॥
हिंस्राणां प्राणिघातानां असंसाद वने क्वचित् ॥ २८ ॥
विभिन्नकलशाकीर्णं श्वचर्मच्छेदनायुतम् ॥

वराहखरभग्नास्थिकपालघटसंकुलम् ॥ २९ ॥
मृतचैलपरिस्तीर्णं निर्माल्यकृतभूषणम् ।
सर्पनिर्मोकिमालाभिः कृतचिन्हं कुटीमठम् ॥ ३० ॥
कुक्कुटारावबहुलं गर्दभध्वनिनादितम् ।
उद्घोषद्भिः खरैर्वाक्यैः कलहद्भिः परस्परम् ॥ ३१ ॥
उलूकपक्षिध्र्वजिभिर्देवतायतनैर्वृतम् ।
लोहघंटापरिष्कारं श्वयूथपरिवारितम् ॥ ३२ ॥
तत् प्राविश्य क्षुधाविष्टो विश्वामित्रो महानृषिः ।
आहारान्वेषणे युक्तः परं यत्नं समास्थितः ॥ ३३ ॥
न च क्वचिदविन्दत् स भिक्षमाणोऽपि कौशिकः ।
मांसमन्नं फलं मूलमन्यद्वा तत्र किञ्चन ॥ ३४ ॥
अहो कृच्छ्रं मया प्राप्तमिति निश्चिल्य कौशिकः ।
पपात भूमौ दौर्बल्यात् तस्मिश्चाण्डालपक्कणे ॥ ३५ ॥
स चिन्तयामास मुनिः किन्नुमे सुकृतं भवेत् ।
कथं वृथा न मृत्युः स्यादिति पार्थिवसत्तम ॥ ३६ ॥
स ददर्श श्वमांसस्य कुतन्त्रीं विततां मुनिः ।
चांडालस्य गृहे राजन् सद्यः शस्त्रहतस्यवै ॥ ३७ ॥
संचिंतयामास तदा स्तैन्यं कार्यमितो मया ।
न हीदानीमुपायो मे विद्यते प्राणधारणे ॥ ३८ ॥
आपत्सु विहितं स्तैन्यं विशिष्टञ्च महीयसः ।
विप्रेण प्राणरक्षार्थं कर्तव्यमितिनिश्चयः ॥ ३९ ॥

हीनाददेयमादौ स्यात् समानात्तदनंतरम् ।
असम्भवे वाददीत विशिष्टादपि धार्मिकात् ॥ ४० ॥
सोऽहमन्त्यावसानाय हराम्येनां प्रतिग्रहात् ।
न स्तैन्यदोषं पश्यामि हरिष्यामि श्वजाघनीम् ॥ ४१॥
एतां बुद्धिं समास्थाय विश्वामित्रो महामुनिः ।
तस्मिन् देशे समुप्वाप श्वपचो यत्र भारत ॥ ४२ ॥
स विगाढां निशां दृष्ट्वा सुप्ते चाण्डालपक्कणे ।
शनैरुत्थाय भगवान् प्रविवेश कुटीमतः ॥ ४३ ॥
सुषुव इस चाण्डालः श्लेष्मापिहितलोचनः ।
परिभिन्नस्वरो रुक्षः प्रोवाचाप्रियदर्शनः ॥ ४४ ॥

श्वपच उवाच—

कः कुतन्त्रीं घटयति सुप्ते चांडालपक्कणे ।
जागर्मि नात्र सुप्तोऽस्मि हतोऽस्मीति च दारुणः ॥ ४५ ॥
विश्वामित्रस्ततो भीतः सहसा तमुवाच ह ।
तत्र व्रीडाकुलमुखःसोद्विग्नस्तेन कर्मणा ॥ ४६ ॥
विश्वामित्रोऽहमायुष्मन्न गतोऽहं बुभूक्षितः ।
मा वधीर्मम सद्बुद्धे यदि सम्यक् प्रपश्यासि ॥ ४७ ॥
चाण्डालस्तद्वचः श्रुत्वा महर्षेर्भावितात्मनः ।
शयनादुपसंभ्रान्त उद्ययौप्रति तं ततः ॥ ४८ ॥
स विसृज्याश्रुनेत्राभ्यां बहुमानात्कृतांजलिः ।
उवाच कौशिकं रात्रो ब्रह्मन् किन्ते चिकीर्षितम् ॥ ४९ ॥

विश्वामित्रस्तु मातंगमुवाच परिसान्त्वयन् ।
क्षुधितोऽहं गतप्राणो हरिष्यामि श्वजाघनीम् ॥ ९० ॥

क्षुधितः कलुषं यातो नास्ति ह्रीरशनार्थिनः ।
क्षुच्च मां दूषयत्यत्र हरिष्यामि श्वजाघनीम् ॥ ९१ ॥

अवसीदन्ति मे प्राणाः श्रुतिर्मे नश्यति क्षुधा ।
दुर्बलो नष्टसंज्ञश्च भक्ष्याभक्ष्यविवर्जितः ।
सोऽधर्मं बुध्यमानोऽपि हरिष्यामि श्वजाघनीम् ॥ ९२॥

अटन् भैक्ष्यं न विन्दामि यदा युष्माकमालये ।
तदा बुद्धिः कृता पापे हरिष्यामि श्वजाघनीम् ॥ ९३ ॥

अग्निर्मुखं पुरोधाश्च देवानां शुचिषाड्विभुः ।
यथावत् सर्वभुग् ब्रह्मा तथा मां विद्धि धर्मतः ॥ ९४ ॥

तमुवाच स चाण्डालो महर्षे श्रुणु मे वचः।
श्रुत्वा तत्वं तथा तिष्ठ यथा धर्मो न हीयते ॥ ९५ ॥

धर्मं तवापि विप्रर्षे शृणु यत्ते ब्रवीम्यहम् ।
शृगालादधमं श्वानं प्रवदन्ति मनीषिणः ।
तस्याप्यधमउद्देशः शरीरस्य श्वजाघनी ॥ ९६ ॥

नेदं सम्यक् व्यवसितं महर्षे धर्मगर्हितम् ।
चाण्डालस्वस्य हरणमभक्ष्यस्य विशेषतः ॥ ९७ ॥

साध्वन्यमनुपश्य त्वमुमायं प्राणधारणे ।
न मांसलोभात्तपसो नाशस्तेस्यान्महामुने ॥ ९८ ॥

जानता विहितं धर्मं न कार्यो धर्मसंकरः ॥
आस्मद्धर्मं परित्याक्षीस्त्वं हि धर्मं भृताम्वरः ॥ ५९ ॥
विश्वामित्रस्ततो राजन्नियुक्तो भरतर्षभ॥
क्षुधार्तः प्रत्युवाचेदं पुनरेव महामुनिः ॥ ६० ॥
निराहारस्य सुमहान्मम कालो ऽभिधावतः ॥
न विद्यते ऽप्युपायश्च काश्चिन्मे प्राणधारणे ॥ ६१ ॥
येन येन विशेषेण कर्मणा येन केन चित् ॥
अभ्युज्जीवेत् साद्यमानः समर्थो धर्ममाचरेत् ॥ ६२ ॥
ऐन्द्रो धर्मः क्षत्रियाणां ब्राह्मणानामथाग्निकः ॥
ब्रह्मवन्हिर्मम बलं भक्ष्यामि शमयन् क्षुधाम् ॥ ६३ ॥
यथा यथैव जीवेद्धि तत्कर्तव्यमहेलया ॥
जीवित मरणात् श्रेयो जीवन् धर्ममवाप्नुयात् ॥ ६४ ॥
सो ऽहं जीवितमाकांक्षन्न भक्षस्यापि भक्षणम् ॥
व्यवस्ये बुद्धिपूर्वं वै तद्भवा ननु मन्यताम् ॥ ॥ ६५
जीवन् धर्मं चरिष्यामि प्रणोत्स्याम्यशुभानि तु ॥
तपोभिर्विद्यया चैव ज्योतींषीव महत्तमः ॥ ६६ ॥

श्वपच उवाच—

नैतत् खादन् प्राप्नुते दीर्घमायुः ॥
नैवप्राणान्नामृतस्येव तृप्तिः ॥
भिक्षामन्याम् भिक्ष मा ते नमोऽस्तु ॥
श्वभक्षणे श्वाह्यभक्ष्यो द्विजानाम् ॥ ६७ ॥

विश्वामित्र उवाच—

न दुर्भिक्षे सुलभं मांसमन्यत्
श्वपाकनान्यन्मम चास्ति वित्तम् ॥
क्षुधार्तश्चाहमगतिर्निराशः
श्वमांसेऽस्मिन् षड्रसान् साधु मन्ये ॥६८ ॥

श्वपच उवाच—

पञ्च पञ्च नखा भक्ष्या ब्रह्मक्षत्रस्य वै विशः ॥
यथा शास्त्र प्रमाणन्ते मा भक्ष्ये मानसं कृथाः ॥ ६९ ॥

विश्वामित्र उवाच—

अगस्त्येनासुरो जग्धो वातापिः क्षुधितेन वै ॥
अहमापद्गतः क्षुत्तो भक्षयिष्ये श्वजाघनीम् ॥ ७० ॥

श्वपच उवाच—

भिक्षामन्यामाहरेति न च कर्तुमिहार्हसि ॥
न नूनं कार्यमेतद्वै हर कामं श्वजाघनीम् ॥ ७१ ॥

विश्वामित्र उवाच—

शिष्टा वै कारणं धर्मे तद्वृत्तमनुवर्तये ॥
परां मेध्याशनादेनां भक्ष्यां मन्ये श्वजाघनीम् ॥ ७२ ॥

श्वपच उवाच—

असता यत् समाचीर्णं न स धर्मः सनातनः ॥
नाकार्यमिह कार्यं वै मा छलेनाशुभं कृथाः ॥ ७३ ॥

विश्वामित्र उवाच—

न पातकं नावमतमृषिः सन् कर्तुमर्हति ॥
समौ च श्वमृगौ मन्ये तस्माद्भक्ष्ये श्वजाघनीम् ॥ ७४ ॥

श्वपच उवाच—

यद् ब्राह्मणार्थे कृतमार्थितेन तेनर्षिणातद्‍वस्थाधिकोर ॥
स वै धर्मो यत्र न पापमस्ति सर्वैरुपायैर्गुरवो हि रक्ष्याः॥७५॥

विश्वामित्र उवाच—

मित्रश्चमे ब्राह्मणस्यायमात्मा प्रियश्चमे पूज्यतमश्च लोके ॥
तं भर्तुकामोऽहमिमां जिहीर्षे नृशंसानामीदृशानां न बिभ्ये ॥७६॥

श्वपच उवाच—

कामं नरा जीवितं सन्त्यजन्ति,
न चाभक्ष्ये क्वचित् कुर्वन्ति बुद्धिम् ॥
सर्वान् कामान् प्राप्नुवन्तो ह विद्वन्,
म्रियस्व कामं सहितः क्षुधैव ॥ ७७ ॥

विश्वामित्र उवाच—

स्थाने भवेत् संशयः प्रेत्यभावे निसंशयः कर्मणां वै विनाशः ॥
अहं पुनर्व्रतनित्यः शमात्मा मूलं रक्ष्यं भक्षयिष्याम्यभक्ष्यम् ॥७८॥
बुध्यात्मके व्यक्तमस्तीति पुण्यं मोहात्मके यत्र यथा श्वभक्षे ॥
यद्यप्ये तत् संशयात्मा चरामि नाहं भविष्यामि यथा त्वमेव॥७९॥

श्वपच उवाच—

गोपनीयमिदं दुःखमिति मे निश्चिता मतिः ॥
दुष्कृतोऽब्राह्मणः सन्त्रं यस्त्वामहमुपालभे ॥ ८० ॥

विश्वामित्र उवाच—

पिवन्त्येवोदकं गावो मण्डुकेषु रुवत् स्वपि ॥
न तेऽधिकारो धर्मेऽ स्ति मा भूरात्मप्रशंसकः ॥ ८१ ॥

श्वपच उवाच—

सुहृद्भूत्वानुशासे त्वां कृपाहि त्वयि मे द्विज ॥
यदिदं श्रेय आधत् स्व मा लोभात् पातकं कृथाः ॥ ८२ ॥

विश्वामित्र उवाच—

सुहृन्मेत्वं सुखेप्सुश्चेदापदो मां समुद्धर ॥
जानेऽहं धर्मतोऽत्मानं शौनीसुतसृजजावनीम् ॥ ८३ ॥

श्वपच उवाच—

नैवोत्सहे भवतोदातुमेतां,
नोपेक्षितुं न्हियमाणं स्वमन्नम् ॥
उभौस्यावः पापलोकावलिप्तौ,
दाता चाहं ब्राह्मणस्त्वं प्रतीच्छन् ॥ ८४ ॥

विश्वामित्र उवाच—

अद्याहं मे तद् वृजिनं कर्म कृत्वा,
जीवं चरिष्यामि महापवित्रम् ॥

सपूतात्मा धर्ममेवाभिपत्स्ये,
यदेतयोर्गुरु तद्वै ब्रवीहि ॥ ८५ ॥

श्वपच उवाच—

आत्मैव साक्षी कुलधर्मकृत्ये,
त्वमेव जानासि यदत्र दुष्कृतम् ॥
यो ह्याद्रियाद्भक्ष्यमिति श्वमांसं,
मन्ये न तस्यास्ति विवर्जनीयम् ॥ ८६ ॥

विश्वामित्र उवाच—

उपादाने खादने चास्ति दोषः,
कार्यात्यये नित्यमत्रापवादः ॥
यस्मिन् हिंसा नानृतं वाच्यलेशो,
ऽभक्षक्रिया यत्र न तद्गरीयः ॥ ८७ ॥

श्वपच उवाच—

यद्येष हेतुस्तव खादनेऽस्य,
न ते वेदः कारणं नार्यधर्मः ॥
तस्माद्भक्षेऽभक्षणे वा द्विजेन्द्र,
दोषं न पश्यामि यथेदमत्र ॥ ८८ ॥

विश्वामित्र उवाच—

नैवातिपापं भक्षमाणस्य दृष्टं
सुरान्तु पीत्वा पततीति शब्दः ॥

अन्योऽ न्यकार्याणि यथा तथैव
न पापमात्रेण कृतं हिनस्ति ॥ ८९ ॥

**श्वपच उवाच—**

अस्थानतो हीनतः कुत्सिताद्वा
तद्विद्वांसं बाधते साधुवृत्तम् ॥
श्वानं पुनर्यो लभते ऽभिसंगा-
त्तेनापि दण्डःसहितव्य एव ॥ ९० ॥

**भीष्म उवाच—**

एवमुक्त्वा निववृत्ते मातंगः कौशिकं तदा ॥
विश्वामित्रो जहारैव कृतबुद्धिः श्वजाघनीम् ॥ ९१ ॥
ततो जग्राह स श्वांगं जीवितार्थी महामुनिः ॥
सदारस्तामुपाहृत्य वने भोक्तुमियेषसः ॥ ९२ ॥
तथास्य बुद्धिरभवत् विधिनाहं श्वजाघनीम् ।
भक्षयामि यथा कामं पूर्वं सन्तर्प्य देवताः ॥ ९३ ॥
ततोऽग्निमुपसंहृत्य ब्राह्मेण विधिना मुनिः ।
ऐन्द्राग्नेयेन विधिना चरुं श्रपयत स्वयम् ॥ ९४ ॥
ततः समारभत् कर्म दैवं पित्र्यञ्च भारत ।
आहूय देवानिन्द्रादीन् भागं भागं विधिक्रमात् ॥ ९५ ॥
एतस्मिन्नेव काले तु प्रवर्ष स वासवः ।
सञ्जीवयन् प्रजाः सर्वा जनयामास चौषधीः ॥ ९६ ॥
विश्वामित्रोऽपि भगवांस्तपसा दग्धकिल्बिषः ।

कालेन महता सिद्धिमवापपरमाद्भुताम् ॥ ९७ ॥
स संहृत्य च तत्कर्म अनास्वाद्य च तद्धविः ।
तोषयामास देवांश्च पितृंश्च द्विजसत्तम: ॥ ९८ ॥
एवं विद्वानदीनात्मा व्यसनस्थो जिजीविषुः ।
सर्वोपायैरुपायज्ञो दीनमात्मानमुद्धरेत् ॥ ९९ ॥
एतां बुद्धिं समास्थाय जीवितव्यं सदा भवेत् ।
जीवन् पुण्यमवाप्नोति पुरुषो भद्रमश्नुते ॥ १०० ॥
तस्मात् कौन्तेय विदुषा धर्माधर्मविनिश्चये ।
बुद्धिमास्थाय लोकेऽस्मिन् वर्त्तितव्यं कृतात्मना ॥ १०१ ॥

युधिष्ठिर बोलले. अत्यंत श्रेष्ठ जो धर्म तो हीनावस्थेप्रत प्राप्त झाला असतां, तसेंच सर्व लोकांनीं त्याचा त्याग केला असतां, अधर्म असतां, तोच धर्म आहे असें लोक समजत असतां, तसेंच धर्म्यकृत्यांस लोक अधर्म समजत असतां, जुन्या मर्यादा नष्ट होत असतांना, धर्माविषयीं निश्चय चलित झाला असतां, परकीय राजे लोकांकडून प्रजेस त्रास पोंचत असतां, सर्व आश्रम मूढ झालें असतां व लोकांचीं कृत्यें बंद पडलीं असतां, काम, लोभ आणि मन यांचे योगानें भय दृष्टीस पडत असतांना, सर्व प्राणिमात्रांचा एकमेकांवरचा भरंवसा नाहींसा झाला असतां, तसेंच कपटांनीं एकमेकांला मारीत असतां, व परस्परांला फसवीत असतां, देशाला आग लागून मोठा जाळ झाला असतां, ब्राह्मणांना अतिशय त्रास झाला असतां, पर्जन्य पडत नसतांना, तसेंच आपआपल्यांत फितुर झाला असतां, पृथ्वीवरचे सर्व जीवन दस्युजनांचे स्वाधीन झालें असतां, अशा शेवटच्या कालामध्यें ब्राह्म-

णांनीं उपजीवन कसें करावें? त्याचप्रमाणें हे धर्मराजा, आपत्ति प्राप्त झाली असतां, पुत्रपौत्रांवर न रागावतां, व त्यांना शिव्या न देतां, कसें वर्तन ठेवावें हें सांग; तसेंच लोकांचीं मनें कलुषित झालीं असतां, धर्म आणि अधर्म या संबंधानें लोकांचें नुकसान होत असतां, राजानें कसें वागावें हें मला सांगावें.

प्रजेमधील मरण, भय, व्याधि, योग आणि क्षेम हे सर्व राजमूलक होत.

कृत, त्रेता, द्वापार, आणि कलि हे सर्व राजमूलक होत. अशी माझी खातरी आहे. यांत मला लेशमात्रही संशय वाटत नाहीं.

प्रजांना दोषकारक असा तो काळ आला असतां, विज्ञान रूप-बलानें ( कार्याकार्य विचारानें ) उपजीवन करावें. याला चांडाळाच्या फळियामध्यें त्याच्याशीं विश्वामित्राचा संवाद झाला होता, तोच उदाहरणभूत आहे. त्रेता आणि द्वापार यांचे संधींत देवविधिक्रमानें लोकांमध्यें १२ वर्षें अवृष्टि झाली. प्रजा अतिशय वाढली, आणि दुष्काळ पडला, तेव्हां दंव सुद्धां पडलें नाहीं, मग आकाशांत मेघाचा थांग कोठून ? नद्यांचें पाणी सुकून गेलें, अशा अवृष्टिपासून सरोवरें तलाव, झरे वगैरे सर्व आटून गेले; भूतलावरचीं पाण्याचीं सर्व स्थलें आटून जाण्याच्या बेतांत आलीं, यज्ञ स्वाहाकार बंद पडले, स्वाध्यायाच्या नांवानें शून्य झालें; कृषि, गाई यांचें दर्शन होईना, बाजार वगैरे बंद पडले, यज्ञयाग तर नाहींसेंच झाले, मोठमोठे उत्सव बंद झाले,

हाडांच्या राशींच्या राशी जागोजाग दिसूं लागल्या, सर्वत्र मोठमोठीं जनावरें ओरडूं लागलीं, मोठमोठीं शहरें ओस पडलीं, गांवें जळून फस्त झालीं, चोरांच्या शस्त्रांच्या आणि सर्वांपेक्षां राजाच्या भितीनें लोक एकत्र जमेनासे झाले, देवतांचीं संस्थानें नाहीशीं झालीं, वृद्धलोक नाहींसे झाले, शहरांतून, गावांतून गाई, शेळ्या, मेंढ्या नाहींशा झाल्या, नगरींतील ब्राह्मण मरून गेले, औषधिसंचय नाहींसा झाला, याप्रमाणें पृथ्वीतलावर स्थिति झाली असतां, सर्व मनुष्यें बुभुक्षित होऊन इकडे तिकडे हिंडूं लागलीं; ऋषिजन नियम वगैरे गुंडाळून ठेवून अग्निहोत्र टाकून आपल्या आश्रमांना रजा देऊन, अन्नासाठीं इकडे तिकडे धांवून जाऊं लागले; असें असतां विश्वामित्र क्षुधेनें पीडित होत्साता बायका, मुलांना टाकून देऊन घर व अग्निहोत्र सोडून अन्नासाठीं फिरूं लागला, वनामध्यें फिरतां फिरतां, हिंसा करणारे व प्राण्यांचा घात करणारे असे जे चांडाळ त्यांच्या घरांजवळ आला. तेथें इकडे तिकडे मडकीं पडलीं होतीं, पलीकडच्या बाजूला कुतऱ्यांचीं कातडीं होतीं, दुसरीकडे डुक्कर, गाढवें यांच्या मोडलेल्या हाडांनीं भरलेले माठ होते. तिकडच्या बाजूला हरणांचीं कातडीं पडलीं होतीं, शिवाय आसपास सापाच्या कातांनीं त्यांचें घर वेष्टिलेलें होतें, कुतरीं, गाढवें, घुबडें यांचा अवाज चालला होता, अशा त्या घराजवळ विश्वामित्र ऋषि कांहीं तरी खावयास मिळावें या हेतूनें आला.

इतका वेळ विश्वामित्र ऋषींनीं पुष्कळ ठिकाणीं भिक्षा मागितली परंतु मांस, अन्न, फल, मूल, या पैकीं कांहीं एक मिळालें नाहीं.

कांहीं एक खावयास न मिळाल्यामुळें आपणांवर मोठें अरिष्ट आलें असें समजून, कौशिक ( विश्वामित्र ) ऋषि त्या चंडाळाच्या घरीं थकून भुईवर पडला, आणि मनांत ह्मणू लागला कीं, काय केलें असतां मला मृत्यु येणार नाहीं बरें? असा विचार तो करीत होता इतक्यांत चंडाळांच्या घरीं त्यानें शस्त्रानें काढलेली एक कुत्र्याच्या मांसाची लांब मांडी पाहिली. ती पाहून त्यानें मनांत आणलें कीं, आतां आपण ती चोरून न्यावी. कारण यावांचून प्राणधारण करण्यास दुसरा उपाय दिसत नाहीं आपत्तीमध्यें पूज्य मनुष्याला विशेषें-करून स्तैन्य विहितच आहे. ह्मणून ब्राह्मणानें प्राण रक्षणार्थ स्तैन्य करावें हाच धर्माचा निश्चय समजावा.

हीन मनुष्यापासून ग्रहण करावें, हा प्रथम पक्ष, समानापा-सून न घ्यावें हा त्यापेक्षां प्रशस्त मार्ग, आणि असंभव असेल तर विशेष धार्मिकांकडून ही ग्रहण करावें. तो मी शेवटीं प्रतिग्रहानें ही श्वजंघा ग्रहण करीन. या वेळेस चोरी केली तर स्तैन्य दोष मला नाहीं, तेव्हां कुत्र्याची जांघ आतां मी हरण करितों.

विश्वामित्र असा विचार करून जेथें तो चांडाळ निजला होता तेथें गेला. ती घोर रात्र होती, चांडाळाचे घरांतील मनुष्यें निजलीं होतीं. तेव्हां विश्वामित्र मुनि जवळच्या झोंपडींत शिरले तों चांडाळ झोंपीं गे-ल्या सारखा पलिकडे पडला होता. तो ह्मणाला, चांडाळाच्या फाळिया-मध्यें सर्व निजले असतांना हा कोण हात लावित आहे असें वाटतें, चांडाळाची ती अवस्था पाहून विश्वामित्र भिऊन आपण चौर्यकर्माला

प्रवृत्त झालों, असें मनांत घेऊन परम लज्जायमान होऊन, मोठ्या दुःखानें चांडालास ह्मणाला कीं, हे चांडाला, अत्यंत बुभुक्षित झालेला हा विश्वामित्र ऋषि आहे. हे सद्बुद्धे चांगला विचार कर आणि मला मारूं नको.

त्या महर्षीचें तें भाषण ऐकून चांडाल घाबरा होऊन अंथरुणावरून उठून त्याकडे गेला, आणि डोळ्यांस पाणी आणून बहुमानानें हात जोडून ह्मणाला कीं, हे विश्वामित्र ऋषे, आपण रात्रीं कां आलां? आपला काय हेतु आहे? विश्वामित्र मातंगाचें सांत्वन करून ह्मणाला कीं, मी क्षुधित आहें. माझे प्राण भुकेनें व्याकुल आहेत, मी कुतऱ्याची जांघ घेऊन जातों, मनुष्य क्षुधित झाला ह्मणजे त्याचे हातून पाप होतें, कारण अशनार्थी जो असतो त्याला लाज नाहीं, या वेळेस क्षुधेनें मी पीडिलों आहें, मी कुतऱ्याची जांघ घेऊन जातों.

माझे प्राण व्याकुळ झाले आहेत, भुकेनें मला आतां ऐकूंही येत नाहीं, मी दुर्बल झालों आहें, मला मुर्छा येत आहे, तेव्हां या वेळेस भक्ष्य काय व अभक्ष्य काय, याचा विचार मी सोडून दिला आहे, आणि मी करीत आहे, हा अधर्म आहे असें मी समजतों तरी पण, मी कुतऱ्याची जांघ हरण करणार.

त्याला चंडाळ ह्मणला, हे महर्षे माझें थोडें बोलणें ऐक. आणि नंतर जेणेंकरून धर्म भ्रष्टतां येणार नाहीं तसें कर, हे महर्षे, मी तुला धर्म सांगतों तो तूं ऐक. शृगालापेक्षां कुत्रा अधम होय, आणि कुतऱ्याच्या शरीरांतला तरी जांघ ह्मणजे अधम भागच. हे महर्षे

अभक्ष्य असें जें चांडालधन त्याचें हरण करणें खरोखर धर्मदृष्टीनें निंद्य होय, प्राणधारण करण्यासाठीं तूं दुसरा एखादा चांगलासा उपाय शोधून काढ. हे महामुने, मांसाच्या लोभानें तुझ्या तपश्चर्येचा नाश होऊं नये, तूं धर्मज्ञाता आहेस, तुझेकडून धर्मसंकर होऊ नये. धर्मज्ञांमध्यें तूं श्रेष्ठ आहेस, तूं धर्माचा त्याग करूं नको नंतर विश्वामित्र बोलला, पुष्कळ वेळपावेतों माझ्या पोटांत अन्न नाहीं आतां यावेळीं प्राण धारण करण्यास मला कांहीं उपाय दिसत नाहीं, जेणेंकरून प्राण धारण होईल, त्या क्रमाचें आचरण करावें आणि शक्ति आली ह्मणजे धर्माचें आचरण करावें, क्षत्रियांचा धर्म इंद्रदेवताक आहे, ब्राह्मणांचा अग्निदेवताक आहे, आणि ब्रह्मवन्हिमिश्र माझें बळ होय ह्मणून मीं क्षुधेचें शमन करून मग भक्षण करीन.

जेणेंकरून प्राणाचें रक्षण होईल, त्याची अवहेलना न करितां त्या मार्गाचें अनुसरण करावें. मरणापेक्षां जीवित श्रेष्ठ होय, कारण जर आपण जगलों तर पुनः पाहिजे तितका धर्म संपादन करूं, ह्मणून मीं जीविताचे इच्छेनें अभक्ष्य जरी आहे, तरी त्याचें भक्षण बुद्धिपूर्वक करितों, त्याला तुझें अनुमत असावें; माझे प्राण वांचले ह्मणजे मी माझ्या पापकर्मांचें तप, विद्या आणि तेज यांच्या साहाय्यानें निवारण करीन.

चांडाळ ह्मणाला, हें खाल्लें ह्मणजे दीर्घायुष्य प्राप्त होतें, असें नाहीं. याच्या योगानें प्राणाची अमृताप्रमाणें तृप्ति होत नाहीं. तूं दुसरीकडे भिक्षा माग, कुतरा ब्राह्मणांना निषिद्ध आहे. त्याच्या मांसाचें भक्षणसंबंधांतून तूं मन काढ.

विश्वामित्र—हे चांडाळा, दुर्भिक्षामध्यें दुसरे मांस विकत मिळत नाहीं. आणि मज जवळ पैसेही नाहींत. मी क्षुधार्त आहें. मला दुसरी गति नाहीं, मी निराश झालों आहें. तेव्हां या श्वमांसामध्येंच उत्तम षड्रस आहेत, असें मी समजतों.

श्वपच—ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य यांनां पंचनख प्राण्यांच्या मांसभक्षणाची अनुज्ञा आहे. शास्त्र तुला प्रमाण आहेच. तेव्हां अभक्ष्याकडची बुद्धि टाकून द्यावी.

विश्वामित्र ह्मणाला, अगस्त्यानें क्षुधित होऊन वातापि असुर खाल्ला. मी आपत्तींत आहे. मी श्वजाघनी खाणार.

श्वपच—तूं दुसरी भिक्षा आण. येथें असें करणें योग्य नाहीं. मग तुला वाटेल तसें कर, आणि श्वजंघा खुशाल घे.

विश्वामित्र—धर्माचे बाबतींत शिष्ट प्रमाण होत. मी शिष्टांना ( अगस्ति वगैरेंला )अनुसरतों. ह्मणूनच ह्या श्वजंघेला मी भक्ष्य आणि पवित्र मानितों.

श्वपच—दुष्टांनीं जें आचरण केलें, तो सनातन धर्म नव्हे. अयोग्य गोष्ट कधींही योग्य होऊं शकत नाहीं. तूं लटपट करून अयोग्य कर्म करूं नको.

विश्वामित्र—ऋषिजन पातक आणि तिरस्कृत गोष्टी करीत नाहींत. मी श्वा ( कुतरा ) आणि मृग सारखेंच समजतों. ह्मणन श्वजंघा भक्षण करूं इच्छितों.

श्वपच--त्या ऋषीनें त्यावेळेस ब्राह्मणासाठीं तें केलें; जेथें पाप नसतें तो धर्म. सर्व उपायांनीं ( हरतऱ्हेनें ) ब्राह्मणाचें रक्षण करावें.

विश्वामित्र—या ब्राह्मणाचा आत्मा हा मित्र आहे. आणि लोकांत तो परमपूज्य आहे. त्याचें पोषण करण्याच्या इच्छेनें मी ही श्वजंघा हरण करूं इच्छितों; अशा प्रकारच्या क्रूर कृत्यांना मी भीत नाहीं.

श्वपच--सुजन प्राणाचा त्याग करितात, परंतु अभक्ष्यभक्षणाचें मनांतही आणीत नाहींत. विद्वान् लोकांनीं क्षुधेचा जय केला, ह्मणजे त्याचे सर्व संकल्प परिपूर्ण होतात. तर तूंही आहार न करितां आपली इच्छा परिपूर्ण करून घे.

विश्वामित्र—होय, अभक्ष्यभक्षण न करतां, जर मेलों तर तें यशस्कर खरें; परंतु जीवन्त जर रहायाचें असलें, तर मात्र माझ्या विकल शरीरानें मला दुःख होईल, व धर्मक्रिया होणार नाहींत. ह्मणून धर्माचें मूळ जें शरीर तें रक्षावें. व्रताचरण हा माझा नित्य धर्म आहे. शांति हा माझा आत्मा आहे. मला सर्व धर्माचें मूळ जें शरीर तें रक्षण केलें पाहिजे. ह्मणून मी अभक्ष्यभक्षण करितों. विचार केला तर असें वाटतें कीं, आपत्कालीं जंघा भक्षण केली तरी पुण्यच आहे. कारण ज्ञानोत्पत्तीला योग्य अशा या शरीराचें कुमार्गानें सुद्धां रक्षण करावें. मी श्वजंघा घेतली तरी तुझ्यासारखा श्वपच होऊन जाणार नाहीं. कारण मी तें सर्व पाप तपानें दूर करीन.

श्वपच—हें दुःख खरोखर गोपनीय आहे. जो मी तुला दोष देतों, तो मी दुष्ट आणि अब्राह्मण आहें.

विश्वामित्र—बेडूक ओरडत असले, तरी गाई पाणी पितातच. हे चांडाळा, धर्मनिर्णयाचे बाबतींत तुला अधिकार नाहीं. उगीच बढाई मारूं नको.

श्वपच—मी तुझा मित्र ह्मणून तुला उपदेश करितों. तुझ्यावर माझी कृपा आहे. येवढें माझें तूं ऐक, आणि मला यश दे. लोभानें पापाचरण करूं नको.

विश्वामित्र—जर तूं माझा मित्र असशील ,आणि मला सुख व्हावें, असें इच्छित असशील, तर मला आपत्तींतून काढ, धर्माचरण मला समजतें तूं श्वजंघा दे.

श्वपच—मी तुला श्वजंघा देऊं इच्छित नाहीं. माझें अन्न तूं घेशील, तर मी त्याची उपेक्षा करणार नाहीं. कारण मी देणारा व तूं घेणारा दोघेही पातकी होऊं.

विश्वामित्र—आज मी हें पापकर्म करून प्राणधारण करीन, नंतर पवित्र आचरण करून शुद्ध होईन आणि धर्मार्जन करीन, या उभया पैकीं [ अधर्म न करतां मरावें किंवा अधर्म करून जगून पुण्य करावें ] महत्वाचें कोणतें तें सांग ?

श्वपच—कुलधर्मकृत्यांमध्यें तुझा तूंच साक्षी आहेस. पाप काय आहे तें तुलाच माहीत. श्वमांस ज्याला भक्ष्य वाटतें, त्याला कांहीं वर्ज असेल, असें मला वाटत नाहीं.

विश्वामित्र—अरे, मांस ग्रहण करणें अथवा खाणें याला दोष आहे, परंतु आपत्ति हा मात्र अपवाद आहे. अरे, प्राणात्ययामध्यें हिंसा आणि अनृत यांत सुद्धां पातक नाहीं. मग त्यापेक्षां अमक्ष्य भक्षणांत कांहीं जास्ती पातक आहे काय ?

श्वपच—प्राणरक्षण हा जर तुझ्या खाण्याचा हेतु असला, तर मग अभक्ष्यभक्षणाचा निषेध तुला लागू नाहीं. म्हणून श्वजंघाभक्षणाचा दोष तुला आहे, असें मला वाटत नाहीं.

विश्वामित्र—मांसभक्षणाचें हिंसेप्रमाणें फार पाप नाहीं. सुरापानाचें मात्र फार पाप आहे. तेथें ( सुरापान करणाराचे बाबतींत ) मात्र पतित हा शब्द लागतो, मैथुनादिक कृत्यें जशीं पापावह आहेत, तसें हें ( आपत्कालीं मांसभक्षण ) नाहीं. यांत थोडेसें पातक आहे, परंतु ब्राह्मण्यहानि होण्या जोगें पातक नाहीं.

श्वपच—तूं चंडालाचे घरांतून चौर्यानें न देणाऱ्या अशा कृपण मनुष्याकडून आग्रहानें श्वजंघा मागून घेतोस. यामुळें तुझ्या साधुवृत्ताला कलंक लागत आहे. हा सर्व दोष घेणारावर आहे, त्यानें त्याचा दंड सोसावा, दात्याला त्याचा दोष नाहीं.

भीष्म ह्मणाले—याप्रमाणें मातंग कौशिकाशीं भाषण करून निघून गेला. विश्वामित्रानें आपत्तींत अभक्ष्यभक्षणाचा दोष नाहीं, असा निश्चय करून श्वजंघा घेतली, नंतर त्या मुनीनें जीवित वांचविण्यासाठीं ती श्वजंघा घेऊन आपल्या बायकोस वनांत बोलावून त्यानें जेवण्याची तयारी केली. इतक्यांत त्याला आपण श्वजंघा खायाची

खरी पण शास्त्रोक्तविधानानें देवतांना अर्पण करून खावी. ( अर्च-यित्वा पितॄन् देवान् खादन् मांसं न दोषभाक् । ह्मणजे पितर व देव यांना अर्पण करून त्यांची पूजा करून द्विजांनीं मांस खाल्लें, तर दोष नाहीं. याज्ञवल्क्य ) नंतर मुनीनें ब्राह्मविधीनें अग्नीचा उपसंहार करून ऐन्द्राग्न विधीनें चरु श्रपण करून इंद्रादिदेवांला यथाक्रम बोलावून, त्यांचा भाग देऊन, दैव आणि पित्र्य कर्म आरंभिलें. इतक्यांत जिकडे तिकडे सुवृष्टि झाली, त्यामुळें प्रजा व औषधी यांचे संजिवन झालें.

विश्वामित्र ऋषीनें पुढें तपश्चर्येनें सर्व पाप दग्ध करून टाकिलें. आणि मोठी सिद्धि मिळविली. त्यानें त्या कर्माचा उपसंहार करून त्या हवीचा स्वाद न घेतां देव आणि पितर याना संतृप्त केलें, तात्पर्य याप्रमाणें संकटसमयीं न घाबरतां प्राण धारण करण्याविषयीं झटावें, आणि हरएक उपायानें दीन आत्म्याचा उद्धार करावा. येथें निरूपण केल्याप्रमाणें नेहमीं मनुष्यमात्रानें प्राण रक्षण करावें; कारण प्राण राहिलें तर पुढें कल्याण होणार. ह्मणून हे धर्मराजा, विद्वानानें धर्म आणि अधर्म यांचा निश्चय करते वेळीं, मोठी अक्कल खर्च केली पाहिजे. तशा प्रकारचा विचार करून मनुष्यानें मनाचें समाधान करून घेऊन, लोकांत वर्तन करावें.

महाभारत ३४६ पान

शांतिपर्व आपद्धर्मानुपर्व विश्वामित्रसंवाद १४१ अध्याय.

------

## परिशिष्ट नं. १२.

### राजाच्या पुरोहिताविषयीं.

राज्ञा पुरोहितः कार्यो भवेद्विद्वान् बहुश्रुतः ॥
उभौ समीक्ष्य धर्मार्थौ अप्रमेयौ अनंतरम् ॥ १ ॥
धर्मात्मा मंत्रविद् येषां राज्ञां राजन् पुरोहितः ॥
राजा चैवंगुणो येषां कुशलं तेषु सर्वतः ॥ २ ॥
उभौ प्रजा वर्धयतो देशान् सर्वान् सुतान् पितॄन् ॥

महाभारत १७७ पान शां.

मिथो भेदात् ब्राह्मणक्षत्रियाणां ॥
प्रजा दुःखं दुःसहं चाविशान्ति ॥
एवं ज्ञात्वा कार्य एवेह नित्यं ॥
पुरोहितो नैकविद्यो नृपेण ॥

महाभारत शां० पा १७९ श्लो २८

योगक्षेमोहि राष्ट्रस्य राजन्यायत्त उच्यते ॥
योगक्षेमोहि राज्ञोहि समायत्तः पुरोहिते ॥

महाभारत शां० पान १८० श्लो० १

आत्मा विज्ञानसंपन्नः तपस्वी सर्वधर्मवित् ॥
स्वामी सर्वस्य राष्ट्रस्य धीमान् मम पुरोहितः ॥

महा० शां० १८६ पान २४ श्लो.

हें केकयराजाचें भाषण आहे.

राजानें विद्वान् आणि बहुश्रुत असा पुरोहित राखावा. उभयतांनीं धर्म आणि अर्थ यांचा विचार करावा. ज्या राजाजवळ धर्मात्मा आणि मंत्रविद् ( मसलत जाणणारा ) पुरोहित आहे, व राजाही धर्मात्मा व मंत्रविद् आहे, त्या प्रजांना सर्वदा सौख्य असतें. कारण वरील गुणांनीं युक्त पुरोहित व राजा हे दोघे मिळून देव, सुत, पितर आणि प्रजा यांचें रक्षण करितात.

ब्राह्मण आणि क्षात्रिय यांच्यांत फुटाफूट असली ह्मणजे प्रजांना दुःसह दुःखें भोगावीं लागतात. हें राजानें जाणून नेहमीं [ एकाच विद्येंत निपुण ] असा पुरोहित ठेवूं नये [ अनेक शास्त्रांची व राजव्यवहराची माहिती असणारा पुरोहित असावा. ]

राष्ट्राचें योगक्षेम राजाचे स्वाधीन, आणि राजाचें योगक्षेम पुरोहिताधीन आहे.

केकय नांवाच्या राजानें एके प्रसंगीं ह्मटलें आहे—

माझा पुरोहित आत्मज्ञान, व्यवहारज्ञान यांनीं युक्त आहे, त्याचप्रमाणें तो तपस्वी; सर्व धर्म जाणणारा, बुद्धिमान् आणे सर्व राष्ट्राचा स्वामी आहे.

हल्लींच्या आमच्या देशी संस्थानांतील राजे लोकांजवळ जे पुरोहित असतात, त्यांचें शास्त्रज्ञान, राजनीतिज्ञान अगदीं बेताबाताचेंच असतें. शास्त्रग्रंथांची व त्यांची ओळख क्वचितच सांपडते. ईश्वरकृपेनें हल्लींच्या कारकीर्दींत राजकार्यामध्यें सल्ला मसलती संबंधांत त्यांचें अंग फारच कमी असतें. तरी पण धर्मसंबंधांत त्यांचा संबंध

बराच राहतो; यामुळें देशी राजे विलायत वगैरे ठिकाणीं गेले असतां, आमचे पुरोहित प्राचीन पुरोहिताप्रमाणें राजनीतिनिपुण व शास्त्रज्ञ नसल्याकारणानें राजे लोकांना कित्येक वेळां ५—१० हजारांचें घोळांत पडावें लागतें ! इतक्यांत भागून नाइलाजास्तव तरी परवानगी मिळते, हें आमचें राजांचें भाग्यच ह्मणायाचें! असे पुरोहित चीन किंवा जपानांत असते व त्यांच्या मताप्रमाणें तेथील बादशाह, प्रधान, मंत्रिमंडळ व सरदार मंडळ चालते, तर तीं राष्ट्रें सफई ठार होऊन केव्हांच राशीया किंवा फ्रान्स वगैरेंच्या जबड्यांत सापडतीं.

आमचे देशांत पेशव्यांचे वेळीं शास्त्राप्रमाणें राजनीति निपुण व व्यवहार निपुण, धर्मशास्त्री व पुरोहित इत्यादि असते तर कदाचित् आमचें राष्ट्रही चीन किंवा जपानासारखें विलक्षण स्थित्यंतर पावतें, व अजूनही नेपाळासारख्या स्वतंत्र राष्ट्रांत जर राजनिति निपुण पुरोहित धर्मशास्त्री वगैरे निपजतील तर त्या राष्ट्राचें जपाना सारखें स्थित्यंतर होण्यास उशीर लागणार नाहीं.

## परिशिष्ट नं. १३.

### परदेशांत दूत ठेवण्याविषयीं.

मनु ७०६ पान.

दूतं चैव प्रकुर्वीत सर्वशास्त्रविशारदम् ॥

इंगिताकारचेष्टज्ञं शुचिं दक्षं कुलोद्गतम् ॥ ६३ श्लो अ. ७.

**कुल्लुक**—दृष्टादृष्टार्थशास्त्रज्ञं. **राघवानंद.** संस्कृतप्राकृतदेशभाषाधर्मशास्त्रकरपल्लवादि तत्र विशारदम् ।

कुल्लूकभट्टीटीकेचा अर्थ—दृष्टअदृष्टविषयक शास्त्र जाणणारा. राघवानंदीचा अर्थ–संस्कृत, प्राकृत, देशभाषा, धर्मशास्त्र, करपल्लवादि भाषा जाणणारा.

अनुरक्तः शुचिर्दक्षः स्मृतिमान् देशकालवित् ॥
वपुष्मान् वीतभीर्वाग्मी दूतो राज्ञः प्रशस्यते ॥ १ ॥
संधिविग्रहकालज्ञान् समर्थान् आयतिक्षमान्
वैरैरहार्यान् शुद्धांश्च धर्मतः कामतोऽर्थतः ॥ २ ॥
समाहर्तुं प्रकुर्वीत सर्वशास्त्रविपश्चितः ॥
कुलीनान् वृत्तिसंपन्नान् निपुणान् कोशवृद्धये ॥ ३ ॥
आयव्ययस्य कुशलान् गणितज्ञानलेलुपान् ॥
नियोजयेत् धर्मनिष्ठान् सम्यक्कार्यार्थचिंतकान् ॥ ४ ॥
कर्माणि चातिकुशलान् लिपिज्ञान् आयतिक्षमान् ॥
सर्वविश्वासिनः सत्यान् सर्वकार्येषु निश्चितान् ॥ ५ ॥
अकृताशान् तथा भर्तुः कालज्ञांश्चप्रसंगिनः ॥
कार्यकामोपधाशुद्धान् बाह्याभ्यंतरचारिणः ॥ ६ ॥
कुर्यादासन्नकार्येषु ग्रहसंरक्षणेषु च ॥
अमात्ये दण्ड आयत्तो दण्डे वैनयिकी क्रिया ॥ ७ ॥
नृपतौ कोशराष्ट्रे च दूते संधिविपर्ययौ ॥ ६५ ॥
दूत एव हि संधत्ते भिनत्त्येव च संहतान् ॥
दूतस्तत्कुरुते कर्म भिद्यन्ते येन मानवाः ॥ ६६ ॥
बुध्द्वाच सर्वं तत्वेन परराज्यचिकीर्षितम् ॥
तथा प्रयत्नमातिष्ठेत् यथात्मानं न पीडयेत् ॥ ६८

दृष्टार्थ आणि अदृष्टार्थ शास्त्रें जाणणारा ( राघवानंदाचे मतें संस्कृत, प्राकृत, देशभाषा, धर्मशास्त्र, करपल्लवादि जाणणारा. ) इंगित आकार आणि चेष्टा समजणारा, निष्कपटी, दक्ष आणि कुलीन, असा दूत राजानें करावा.

## दूताचें दुसरें एक लक्षण.

स्वामीशीं अनुरक्त, निष्कपटी, दक्ष, स्मृतिमान्, देशकाल समजणारा, धिप्पाड आणि कशासही न भिणारा असा दूत असावा.

त्यांना संधि किंवा विग्रह केव्हां करावा, हें समजलें पाहिजे; ते मोठे समर्थ, अन्तःकरणाचे शुद्ध, धर्मापासून अर्थ मिळविणारे, सर्वशास्त्रांमध्यें निपुण, कुलीन, वृत्तिसंपन्न, आणि कोशसिद्धि करण्यांत प्रवीण, जमाखर्चांत हुशार, गणितज्ञाना साठीं लोलुप, धर्मनिष्ठ, सर्वकार्यांच्या बाबतींत विचार करणारा, आपल्या कामांत कुशल, लिपि जाणणारे, पुढचें समजणारे, सर्व रीतीनें विश्वास ठेवण्यास योग्य, खरेपणानें वागणारे, सर्व कामांत निश्चित बुद्धि ठेवणारे, ज्यांना फार आशा नाहीं, आपल्या यजमानावर कोणत्यावेळीं कसा प्रसंग आहे ते समजणारे, कार्य, काम आणि कपट या विषयीं शुद्ध अशा प्रकारेच, बाहेर देशीं आणि आपले राज्यांत फिरणारे लोक, गृहसंरक्षण आणि अगदीं जरूर अशा राजकार्यासाठीं ठेवावेत.

---

हस्त्यादिबल सेनापतीच्या हातांत असतें. परकीय राष्ट्राचा विनय वगैरे स्वतःच्या मर्दुमकीवर अवलंबून असतो, खजिना आणि

राष्ट्रस्थिति ही राजावर अवलंबून असते, आणि संधि ( तह ) आणि विग्रह ( युद्ध ) दूतावर अवलंबून असतात.

दुसऱ्या राजाशीं विघडेल, तर त्याचा संधि दूतच करितो, तसेंच दुसऱ्या राजाचे जरी सौमनस्य असलें, तरी त्यांचा भेदही दूतच करितो, तसेंच फितुरीचीं वगैरे जीं कामें होतात, तीं दूतच करितो. [ कुल्लूक. भट्ट. स्नेह असतांना वांकडें येतें हें दूतच करितो. ] दुसऱ्या राजांचे काय काय बेत चालले आहेत, हें बातमीनें दूतद्वारा काढून त्या-संबंधीं बरोबर ज्ञान मिळवून परकीय शत्रु ज्या रीतीनें आपल्याला पीडा करणार नाहीं तशी तजवीज ठेवावी.

## परदेशाची बातमी काढण्यासाठीं चर कसे ठेवावेत याविषयीं.

मनु पान ८२६ अ ७. श्लो. १५१

मध्यं दिने ऽर्धरात्रे वा विश्रान्तो विगतक्लमः॥
चिन्तयेत् धर्मकामार्थान् सार्धं तैरेक एव वा ॥ १५१ ॥
परस्परविरुद्धानां तेषां च समुपार्जनम्
कन्यानां संप्रदानं च कुमाराणां च रक्षणम् ॥ १५२ ॥
दूतसंप्रेषणं चैव कार्यशेषं तथैव च ॥
अंतःपुरप्रचारं च प्रणिधीनां च चेष्टितम् ॥ १५३ ॥
कृत्स्नं चाष्टविधं कर्म पंचवर्गं च तत्वतः ॥
अनुरागापरागौ च प्रचारं मण्डलस्य च ॥ १५४ ॥
[ वने वनेचराः कार्याः श्रमणाटविकादयः ]
[ परप्रवृत्तिज्ञानार्थं शीघ्राचारपरंपराः ]

[ परस्य चैते बोद्धव्यास्तादृशैरेवतादृशाः ]
[ चारसंचारिणः संस्थाः शठाश्चागूढसंज्ञिताः ]
मध्यमस्य प्रचारं च विजिगीषोश्च चेष्टितम् ॥
उदासीनप्रचारं च शत्रोश्चैव प्रयत्नतः ॥ १५५ ॥
एताः प्रकृतयो मूलं मण्डलस्य समासतः ॥
अष्टौ चान्याः समाख्याता द्वादशैव तु ताः स्मृताः ॥

पान ३० श्लो १५६.

अमात्यराष्ट्रदुर्गार्थदण्डाख्याः पंच चापराः ॥
प्रत्येकं कथिताह्येता संक्षेपेण द्विसप्ततिः ॥ १५७ ॥

मनु. पान ८३३

## तथाह कामंदक.

अरिर्मित्रमरेर्मित्रं मित्रमित्रमतः परम् ॥
तथारिमित्रमित्रं च विजिगीषोःपरः स्मृतः ॥ २ ॥
पार्ष्णिग्राहस्ततः पश्चात् आक्रंदस्तदनंतरम् ॥
आसारावनयोश्चेति विजिगीषोस्तु मण्डलम् ॥ ३ ॥
अरेश्च विजिगीषोश्च मध्यमो भ्राम्यनन्तरम् ॥
अनुग्रहे संहतयोर्व्यस्तयोर्निग्रहे प्रभुः ॥ ४ ॥
मण्डलाद्बहिरेतेषामुदासीनोबलान्वितः ॥
अनुग्रहे संहतानां व्यस्तानां चैव यो प्रभुः ॥ ५ ॥
अमात्यराष्ट्रदुर्गाणि कोशो दण्डश्च पंचमः ॥
एताः प्रकृतयस्तज्ज्ञैर्विजिगीषोरुदाहृताः ॥ ६ ॥

द्वादशानां नरेन्द्राणां पंच पंच पृथक् पृथक् ॥
अमात्याद्यास्तु प्रकृतीरामनन्तीह मानवाः ॥
माला द्वादश चैता अमात्याद्यास्तथा च याः ॥
सप्तविधाधिकाश्चेपाः सर्वाः प्रकृतिमण्डलम् ॥ ८ ॥
अनंतरमरिं विद्यात् अरिसेविनमेव च ॥
अरेरनंतर मित्रं उदासीनं तयोः परम् ॥ १५८ ॥
तान् सर्वान् अभिसंदध्यात् सामादिभिरुपक्रमैः
व्यस्तैश्चैवसमस्तैश्च पौरुषेण नयेन च ॥ १५९ ॥
संधिं च विग्रहं चैव यानमासनमेव च ॥
द्वैधीभावं संश्रयं च षड्गुणांश्चिन्तयेत् सदा ।१६० ॥

मनु. ८२९ पान.

१५४-१६० श्लोकांची टीका कुल्लूकभट्टी टीकाः—कापटिकोदास्थितगृहपति वैदेहिकतापसव्यंजनात्मकं पंचविधं चारवर्गं पंचवर्गशब्दवाच्यं तत्वतः चिन्तयेत्. तत्र परमर्मज्ञः प्रगल्भछात्रः कपटव्यवहारिकत्वात् कापटिकः तं वृत्त्यर्थिनं अर्थमानाभ्यां उपसंगृह्य रहसि राजा ब्रूयात्, यस्य दुर्वृत्तं पश्यसि, तत् तदानीमेव मयि वक्तव्यमिति प्रव्रज्यारूढ पतित उदास्थितः तं लोकेषु विदितदोषं प्रज्ञाशौचयुक्तं वृत्यर्थिनं कृत्वा रहसि राजा पूर्ववद् ब्रूयात्, बहूत्पत्तिकमठे स्थापयेत्. प्रचुर सस्योत्पत्तिकं भूम्यन्तरं च तद्वृत्त्यर्थमुपकल्पयेत् स च अन्येषामपि प्रव्रजितानां राजाचारकर्मकारिणां ग्रासाच्छादनादिकं दद्यात्.

कर्षकः क्षीणवृत्तिः प्रज्ञाशौचयुक्तो गृहपतिव्यंजनःतमपि पूर्ववद्कृत्वा स्वभूमौ कृषिकर्म कारयेत्, वाणिजकः क्षीणवृत्तिः वैदे-

हिकव्यंजनः तं पूर्ववत् उक्त्वा धनमानाभ्यां आत्मकृत्य वाणिज्यं कारयेत्.

मुण्डो जटिलोवा वृत्तिकामः तापसव्यंजनः सोऽपिकचिदाश्रमे वसन् बहुमुण्डजटिलाभ्यन्तरे कपटशिष्यगणवृतः गुप्तराजोपकल्पितवृत्तिः तापस्यं कुर्यात्. मासद्विमासान्तरितं प्रकाशं बदरादिमुष्टि मश्नीयात्, रहसि च राजोपकल्पितं आहारं कल्पयेत्, शिष्याश्च अस्य अतीतानागतज्ञानादिकं ख्यापयेयुः तेन बहुलोकवेष्टनं आसाद्य सर्वेषां विश्वसनीयत्वात्. सर्वं कार्यं अकार्यं च पृच्छन्ति अन्यस्य कुक्रियादिकं कथयान्ति एवं रूपं पंचवर्गं यथावत् चिन्तयेत्. एवं पंचवर्गं प्रकल्प्य तेनैव पंचवर्गद्वारेण प्रतिराजस्य आत्मीयानां च अनुरागविरागौ ज्ञात्वा. तदनुरूपं चिन्तयेत् वक्ष्यमाणस्य राजमण्डलस्य प्रचारं कः संध्यर्थी को वा विग्रहार्थीत्यादिकं चिन्तयेत्. तं च ज्ञात्वा तदनुगुणं चिन्तयेत्.

मनु अ. ७. १५४ श्लो. पान ८२९.

सर्वज्ञनारायणः—मंडलस्य अरिमित्रारिमित्रमित्रमित्रारिमित्रमित्रपार्ष्णिग्राहाक्रन्दपार्ष्णिग्राहासाराक्रन्दासारमध्यमोदासीनविजिगीषुरूपद्वादशनृपसमुपायस्य प्रचारं प्रवृत्तिम् १५४. श्लो.

दुपारी किंवा मध्यरात्रीं विश्रान्ति घेऊन, श्रमरहित होऊन, शांतपणानें एकट्यानें किंवा आपल्या सचिवासह धर्म, काम आणि अर्थ याविषयीं विचार करावा. १५१ श्लो.

परस्पराशीं विरुद्ध ( अति द्रव्य संपादन केलें तर धर्माचा बिघाड होतो. अति धर्माचरण केलें तर कामाची हानी होते, तेव्हां

असें न करतां ) असे जे धर्म, अर्थ आणि काम यांचें संपादन करावें. तसेंच मुलींच्या दानाविषयीं व मुलांच्या रक्षणाविषयीं वर सांगितल्या वेळीं विचार करावा. त्याचप्रमाणें परराष्ट्रांतून बातमी आणावयासाठीं दूतास पाठविणें, बाकी राहिलेल्या कामाचा विचार करणें, जनानखान्यांत काय काय खटपटी होत आहेत, त्याची दासी वगैरेंच्या द्वारांनीं माहिती मिळविणें, तसेंच परराज्यांतील बातमी काढण्यासाठीं पाठविलेल्या चरांच्या ( बातमीदारांच्या ) कृत्यांचा दुसरे चर पाठवून शोध करणें, इतक्या बाबतींचा विचार करावा.

त्याचप्रमाणें कर घेणें, चाकरांना वेतन देणें, दुष्ट नोकरांना काढून टाकणें, कामगारांवर देखरेख ठेवणें, गुन्हेगार लोकांना शिक्षा करणें, वर्णाश्रमाप्रमाणें आचरण चाललें आहे कीं नाहीं; यावर देखरेख ठेवणें, तंट्याचा निकाल करणें, पराजित राजांनीं कांहीं गडबड केली असल्यास त्याबद्दल सूड उगविणें, व त्यांवर जरब बसविणें वगैरे याप्रमाणें अष्टविध कर्माचा त्याठिकाणीं बसून विचार करावा.

तसेंच सचिवानें परम धर्मज्ञ व ज्याचे शिष्य उत्तम आहेत असे कापटिक [ कपटानें बातम्या वगैरे काढणारे ] चर ठेवून त्यांना पैसे पोंचवून, राज्यांत लोक माझ्याबद्दल अथवा राजाबद्दल जें कांहीं वाईट बोलत असतील, तें त्वरित येऊन मला कळविलें पाहिजे, असें सांगावें, संन्यासभ्रष्ट पतित जे लोक, त्यांतील हुशार हुडकून काढून,

त्यांला, जिच्या योगानें खाण्यापिण्याची काळजी राहणार नाहीं, अशी चांगलीशी जमीन देऊन, त्यांच्याकडून [ कोणा तरी आफिसराचे घरीं ] दासकर्म करवावें. आणि तद्द्वारा तेथील बातमी काढावी. त्या मोठ्या दिलेल्या जमिनीच्या उत्पन्नांतून त्यानें शेंकडो संन्याशांस जेवणास घालावें. व त्यांला अनुकूल करून घेऊन त्यांच्याकडून बातम्या काढून राजाकडे पोंचवाव्यात. त्यांतील संन्याशांनीं पुनः दुसऱ्या संन्याशांकडून बातमी काढून सरकारास कळवावी. त्याचप्रमाणें शेतकरी किंवा वाणी लोकांपैकीं गरीब, हुशार, चाणाक्ष लोकांकडून ज्या देशांतील बातमी पाहिजे असेल, त्या देशांस त्यांस गरीब शेतकरी किंवा वाणी या नात्यानें पाठवून, त्यांच्याकडून तेथें कृपिकर्म आणि व्यापार करवून, तद्द्वारें त्या देशांतील बातमी काढावी. तसेंच संन्याशी, बैरागी यापैकीं कित्येक लोकांस साधूचे सोंग घेऊन परक्या देशांत पाठवावें. त्यांनीं तेथें जाऊन मठ बांधावेत, शिष्यगोळा करावे. त्या शिष्यांनीं गांवांत धर्मोपदेश करावेत, शिष्यानीं शाळा घालाव्यात, आणि शत्रूच्या देशांतील लोकांना भलभलतें सांगून त्यांना लोभ उत्पन्न करावा. उदाहणार्थ गरीबांना सांगावें पहा, ईश्वराच्या घरचीं सर्व मनुष्यें सारखीं असतांना सरदार श्रीमंत कां? व तुह्मी भिकारी कां ? इत्यादि ( कपटतापसैःअध्यापकत्वादिना संभाव्यतद्द्वारा परपक्षं कुबुद्ध्या प्रलोभयेत्. राघवानंद ) ( ब्राह्मण व तदितर यांचेमध्यें द्वेष उत्पन्न करणारे हें या राजनीतीचें तत्व पूर्ण ओळखितात) पान ८२९.मनु

याप्रमाणें बातमीदार ठेवून आपले राज्यांतील व परकीय म्हणजे अरि, मित्र, अरिमित्र, मित्रमित्र, अरिमित्रमित्र, पार्ष्णिग्राह-आक्रंद, पार्ष्णिग्रहासार, आक्रंदासार, मध्यम, उदासीन, आणि विजिगीषुरूप जे द्वादश राजमंडळ त्यांच्या अमात्य, राष्ट्र, दुर्ग, कोश आणि दण्ड यासंबंधीं माहिती मिळवून त्यापैकीं संधीची इच्छा करणारे कोण व विग्रहाची इच्छा करणारे कोण वगैरे सर्व माहिती व बातमी चरद्वारां काढावी.

समाप्त.